सहज चुकी होण्याजोगी आहे, ती होऊं देऊं नये. उदाहरणार्थ, क्राम्वेलच्या वेळीं व त्याच्यापूर्वी एलिझाबेथ राणीच्या वेळीं व्यापाराला उत्तेजन धर्मसुधारणेपासून प्राप्त होत होतें, असें वाटण्याचा संभव आहे. तसेंच पुनरपि त्या शतकाचे अखेरीस दोन दर्यावर्दी राष्ट्रांचें युद्ध (इंग्लंड आणि हॉलंड) समाप्त होऊन त्यांचा फ्रान्सचे विरुद्ध कट झाला. तेव्हां ही कार्यकारणभावासंबंधीं वरच्या प्रमाणेंच चुकी होण्याचा संभव आहे. कारण, हा कट दोन मोठ्या लढाया घडून येईपर्यंत व दोन इंग्रजी राजांच्या कारकीर्दी संपेपर्यंत चालला होता. तेव्हां त्या दोन राष्ट्रांचें सख्य १६७४ पासून १६८८ तील राज्यक्रांतीपर्यंत इतकें दृढ असण्याचें कारण काय, याचा विचार करीत असतां, असें आपणांस सहज वाटण्याचा संभव आहे कीं, क्याथोलिक धर्मी फ्रेंच राष्ट्राचा पाडाव करण्याकरितां या दोन प्रॉटेस्टंट धर्मी राष्ट्रांचें सख्य झालें होतें. असें वाटण्याचें दुसरें असें एक कारण आहे कीं, सर्व इतिहासांत अजब व विलक्षण अशी एक प्रतिक्रिया त्या वेळीं ह्मणजे ह्या १७ व्या शतकांत घडून आली. नान्ट्स् येथील ठराव त्यावेळीं फ्रान्सांत मोडला* गेल्यामुळें सोळाव्या शतकांतल्याप्रमाणें सर्व युरोपाचे राजकीय व्यवहार ह्या सतराव्या शतकांत पुनः घडूं लागल्याप्रमाणें दिसले. इंग्लंडमध्यें दुसरा जेम्स नांवाचा क्याथोलिक धर्मी राजा राज्यपदारूढ झाला, त्याच वेळेचे सुमारास नान्ट्स् येथील ठराव मोडला जाऊन, त्याचे योगानें सर्व राष्ट्रांस धर्मसंबंधीं मोठी दहशत बसली. सर्व इतिहास एक एक शतक मागें हटला, असा भास झाला. तीस वर्षांपूर्वी वेस्टफालिया येथें तह होऊन सर्व धर्मसंबंधीं तक्रारी पूर्णपणें मिटल्या असून, वसाहतींची वृद्धि करण्याकडे सर्व राष्ट्रांची पूर्ण प्रवृत्ति झाली असतांही सोळाव्या शतकां-

* टीप.—[पान २२२ पहा.

तील बलाढ्य राजे दुसरा फिलिप* आणि वुइल्यम धि सायलेंट† हेच पुनः भूतलावर उदयास आले व त्यांनीं आपली जूट केली, असें वाटूं लागलें. कोल्बर्ट यानें काढलेल्या कल्पना एकदम विसरून गेल्या सारख्या होऊन त्यानें जें द्रव्य जमा केलें होतें, तें भलत्याच कामांत खर्चून गेलें. त्यानें जें आरमार तयार केलें होतें, त्याचा लेहाग येथें नाश होण्याचा समय आला. अशा प्रकारें क्याथेलिक धर्माचें पुनरुज्जीवन होऊं लागलें, म्हणूनच इंग्लंड आणि हालंड या दोन राष्ट्रांनीं प्रथम एकमेकांशीं सल्ला केला.

अशा प्रकारें अमेरिकेसंबंधीं तंटे थोडेसे मागें पडलेसें वाटूं लागलें, परंतु हा प्रकार अगदीं क्षणिक असून, हें केवळ त्याचें बाह्यस्वरूप होतें. खरोखरीचें स्वरूप असें नव्हतें. एक गोष्ट घेऊन तिच्यापासून पुढें काय काय परिणाम झाले, असा विचार न करितां, कोणकोणत्या प्रकारांनीं ती घडून आली, असा आपण विचार करीत गेलें, म्हणजे वरील खऱ्या प्रकारची चांगली समज पडेल. युट्रेक्ट‡ येथील तह झाल्यापासून त्या तहाचे पूर्वी चालू असलेल्या लढाईंत विजय पावलेल्या दर्यावर्दी राष्ट्रांचें सख्य कां होतें, तें आपण पाहूं. हें सख्य

---

* दुसरा फिलिप (१५२७–१५९८) हा पांचव्या चार्लसनंतर स्पेनच्या गादीवर बसला. ह्यानें इंग्लंडची राणी मेरी हिच्याशीं लग्न केलें होतें. ह्यानेंच अजिंक्य आरमारानिशीं एलिझाबेथ गादीवर असतां इंग्लंडवर स्वारी केली होती.

† वुइल्यम धि सायलेंट (१५३३–१५८४) हा फ्रान्सांतील आरेंज प्रांताचा राजा होता. तो आपल्या गादीवर १५४४ त आला. जेव्हां स्पेनचा राजा दुसरा फिलिप ह्यानें प्रोटेस्टंट लोकांची कत्तल उडवावयाचा आपला बेत त्याजला सांगितला, तेव्हां तो बाह्यतः त्याजला मिळाला, परंतु आंतून तो त्या लोकांच्या तर्फेनें प्रयत्न करी. १५६८ पासून पुढें तर तो उघड स्पेन व फ्रान्स ह्यांच्या विरुद्ध वागूं लागला. ह्यासाठीं स्पेनच्या राजानें त्यावर मारेकरी घालून त्यास मारविलें.

‡ टीप.—* पान ६७ पहा.

अगदीं निराळ्याच तऱ्हेनें दिसून येतें. ऐतिहासिक गोष्टींच्या अविच्छिन्नतेचा भंग झाला असें मानण्यास कांहीं एक कारण नाहीं. तिसऱ्या वुइल्यम राजाची जो पद्धत होती, तीच पुढें मालेब्रो याचीही होती. हालंड व इंग्लंडचें सख्य त्या वेळींही चौदाव्या लुईचे विरुद्धच झालें होतें. तरी त्या युद्धाचें प्रथमारंभीं दिसणारें धर्मसंबंधीं स्वरूप कसें बदललें, हें युट्रेक्ट येथील तह पाहिला असतां चांगलें समजतें. तें स्वरूप व्यापारसंबंधीचेंच होतें, असें त्या तहावरून ह्मणावें लागतें. इंग्रजी इतिहासांत या युद्धाचें मोठें वैभव वर्णन केलें आहे. त्याला स्पेनच्या गादीच्या वारसासंबंधाचें युद्ध* हें मोठें नांव मिळाल्यामुळें त्याची एवढी प्रतिष्ठा वाढली आहे, कीं त्यांत अनेक राजे गुंतून गेल्यामुळें इतिहासकारांनीं ह्या युद्धाविषयीं चमत्कारिक मजकूर लिहिला आहे. ते ह्मणतात कीं, प्राचीन काळच्या युद्धांप्रमाणें विलक्षण रानटी स्थितींतल्या राष्ट्रांसच केवळ शोभणारें असें हें युद्ध झालें असून, त्यांत विनाकारण अतोनात पैशाचा मात्र व्यय झाला. लहान पीटर किन यानें याच लढाईबद्दल असा प्रश्न केला कीं, "या युद्धापासून शेवटीं कोणास काय बरें फायदा झाला?" खरें पाहूं गेलें असतां हें युद्ध मुळींच विलक्षण नसून, सर्वांमध्यें फारच शिस्तवार व निव्वळ उपयुक्त उद्देशाकरितां सुरू झालें होतें. इंग्रज व डच लोकांच्या व्यापारास फ्रेंचांकडून पुष्कळ धक्का बसून त्यांचें मिळविलेलें अन्न हातांतून जाण्याचा समय आला होता. अमेरिकेचा शोध लागल्यापासून वसाहतींसंबंधीं नाना तऱ्हेचे प्रश्न निघून सर्व यूरोपभर तंटे माजले होते. इतक्यांत फ्रान्स आणि स्पेन हीं राष्ट्रें एकत्र झालीं. फ्रेंच लोक त्या वेळीं मिसिसिपी नदीच्या कांठच्या प्रदे-

* टीप.—* पान ६७ पहा.

शाचा शोध लावीत होते. तेव्हां या दोन राष्ट्रांची एकी झाल्यामुळें सर्व इंग्रज व डच व्यापाऱ्यांस अमेरिकेंत मुळींच थारा नाहींसा झाला. तेव्हां अर्थातच वरील सर्व तंट्यास विलक्षण तऱ्हेचें महत्व प्राप्त झालें. सर्व राजकीय विषयांचें बाह्य स्वरूप कितीही भिन्न दिसलें, तरी व्यापाराचे उद्देश सर्व राष्ट्रांस जितके महत्वाचे या वेळेस वाटूं लागले, तितके पूर्वी कधीं वाटले नव्हते, व पुढेंही तेच उद्देश एकसारखे फार महत्वाचे चालत आल्यामुळें त्या वेळीं सुरू होत असलेल्या शतकास एक प्रकारचें कंटाळवाणें स्वरूप प्राप्त झालें आहे.

ही लढाई चालू असतां एक ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट घडून आली. या गोष्टीनें आमच्या ह्मणण्यास पूर्णपणें पुष्टीकरण येतें. स्काटलंड आणि इंग्लंड हे देश सर्व कायद्याचे बाबतींत एकत्र जोडले गेले. या गोष्टीचा इतिहास बर्टन साहेबानें लिहिला आहे तो पहा, ह्मणजे असें दिसून येईल कीं, इंग्लंडच्या अर्वाचीन इतिहासाचा आरंभ जसा स्पानिश आरमेडापासून* होतो, तसाच स्काट्लंडच्या अर्वाचिन इतिहासास आरंभ दोन्ही देश जोडले गेल्यापासून होतो. त्या गोष्टीच्या योगानें अमेरिकेसंबंधीच्या तंट्यांत स्काट्लंडचा प्रवेश जाहला. ही एकी होण्याचेपूर्वी स्काट्लंडची स्थिति अशी होतीः—त्याचा अमेरिकेशीं बिलकुल संबंध नव्हता. तरी लोकसंख्येच्या मानानें अमेरिकेपासून स्काच लोकांस जितका फायदा झाला आहे, तितका दुसऱ्या कोणत्याही राष्ट्रास झालेला नाहीं. इंग्लंडच्या व्यापारांत त्यांचा मुळींच प्रवेश होत नव्हता, व स्वतः फार गरिब असल्यामुळें स्वतःचेच बळावर इतर राष्ट्रांशीं व्यापारांत सामना करून त्यांस यश येण्यासारखें नव्हतें. तिसऱ्या वुइल्यम

---

* टीप.—† पान. १५४ पहा.

राजाचे कारकीर्दीत इतर राष्ट्रांच्या तऱ्हेप्रमाणें त्यांनींही एक प्रयत्न करून पाहिला. अमेरिकेतील कांहीं भाग आपल्या ताब्यांत आणण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. डेरियन नांवाची कंपनी त्यांनीं स्थापन केली; व स्पेनच्या अमलाखालीं अमेरिकेंत जो पुष्कळ मुलूख होता, त्यापैकीं कांहीं आपल्या ताब्यांत घेण्याचा त्यांचा इरादा होता. परंतु ह्या कृत्यांत त्यांचें अतोनात नुकसान झालें, त्यामुळें स्काच लोकांत फार गडबड उडाली; व सर्व देशभर व्यापारानें उन्नति मिळविण्याची निराशा झाली. त्यामुळें इंग्लंडनें एकीचें बोलणें सुरू केलें. त्याचा परिणाम दोन्ही देशांचें एकीकरण झालें. याचे योगानें स्काच लोकांचा अमेरिकेंत प्रवेश झाला. इंग्लंडालाही असा एक फायदा झाला कीं, दुसऱ्या राष्ट्राशीं लढाई चालू असतां स्वदेशशत्रूंपासून त्यास भीति नाहींशी झाली.

इंग्लिश राष्ट्राच्या विस्ताराचा इतिहास लिहूं लागलें ह्मणजे त्यांत एक मोठी महत्वाची गोष्ट यूट्रेक्ट* येथील तह होय. ज्याप्रमाणें स्पॅनिश आरमेडा ह्मणजे इंग्लंडच्या विस्ताराची सुरवात, त्याचप्रमाणें हा तह ह्मणजे इंग्लंड देश इतर सर्व राष्ट्रांत श्रेष्ठ होऊं लागण्याचा आरंभ. आरमेडाचे वेळेसच इंग्रज लोक प्रथम इतर राष्ट्रांच्या शर्यतींत जाऊं लागले; यूट्रेक्टच्या तहाचे वेळेस इंग्लंडनें शर्यत जिंकली. नंतर स्वतःपेक्षां फार मोठें असलेल्या राष्ट्रास मोठ्या धिटाईनें इंग्लंडनें जुमानलें नाहीं, व त्यास जें यश आलें त्याजमुळें इंग्लंडचें नांव पुढें येऊन इतर मोठ्या राष्ट्रांमध्यें याची गणना होऊं लागली. तेव्हांपासून इंग्लंडचें पाऊल सारखें पुढेंच पडत चाललें आहे. सतराव्या शतकाच्या प्रथमार्धीत हालंडचा पगडा वर असून लोकांचें लक्षही हालंडकडेच होतें.

---

* टीप.—* पान ६७ पहा.

उत्तरार्धांत फ्रान्सकडे लोकांचें लक्ष विशेष लागलें. सुमारें १६६० या वर्षांपासून तों इ. स. १७०० पर्यंत सर्व राष्ट्रांवर फ्रान्सचा पगडा होता, यांत बिलकुल संशय नाहीं. परंतु यूट्रेक्ट येथील तहानें इंग्लंडचा नंबर पहिला आला इतकेंच नाहीं, तर प्रथम कांहीं दिवस इंग्लंडास प्रतिस्पर्धीही कोणी नव्हते. या वेळेपासूनच इंग्रज लोकांची चोहोंकडे प्रसिद्धि झाली. भाषाविषय, तत्वज्ञान, शास्त्रें, कला, व विद्वत्ता या सर्वांमध्यें इंग्रज लोक याच वेळेपासून फार प्रवीण झाले. या बुद्धिमत्तेच्या विंषयांत फ्रेंच लोक पूर्वी फार नांवाजलेले होते, त्याचप्रमाणें इंग्रज लोक यापुढें झाले. यापैकीं कांहीं वैभव थोडाच वेळ टिकलें, तरी इंग्लंडचा पगडा त्या वेळेपासून पूर्वीपेक्षां कधींही कमी झाला नाहीं. तेव्हांपासून सर्व लोक असें मानूं लागले कीं, इंग्लंडाइतकें प्रबळ राष्ट्र दुसरें नाहीं. निदान व्यापार, संपत्ति, समुद्रावरील सत्ता या गोष्टींत तरी इंग्लंडची दुसऱ्या कोणाच्यानें बरोबरी होणारी नव्हती. असें व्हावें हें उघड आहे, कारण एक तर इंग्लंडानें आपल्या शत्रूंचा पूर्ण पाडाव केला, व नंतर इंग्लिश लोक स्वतः होऊन पुढेंच सरसावत गेले.

या वेळेपासून हालंडची उतरती कळा लोकांस दिसूं लागली. तिसरा वुइल्यम जिवंत असेपर्यंत त्याच्या पराक्रमावर हालंडचा बोज राहिला होता. परंतु मार्ल्बरोच्या वेळेपासून पुढें मग हालंडांत आळस शिरला, व त्या देशास विश्रांति हवीशी वाटूं लागली. इंग्लंडबरोबर आपलें वजन कायम राखण्यांत व फ्रान्सबरोबर लढाई करण्यांत हालंडच्या शक्तीस फारच ताण बसला. तेव्हांपासून हालंडर्स लोकांची शक्ति कधीं दृष्टोत्पत्तीस आली नाहीं. येणेंकरून हालंड मागें पडला. इंग्लंडचा नवीन शत्रु फ्रान्स, परंतु पुष्कळ दिवसांच्या लढाईंत मोठमोठीं अरिष्टें गुजरून, फ्रान्सचीही गाळण झाली. तीस वर्षांपूर्वी प्रसिद्ध मुत्स-

ही कोल्बर्ट यानें फ्रान्सच्या जमाखर्चाची फारच उत्तम व्यवस्था लावून दिली होती. तरी ह्या वेळीं फ्रान्सचें पुन्हां दिवाळें निघालें; व ही स्थिति भावि राज्यक्रांतीपर्यंत तशीच राहिली. अमेरिकेंतील व्यापार बळकावण्याचा फ्रेंचांनीं एक जोराचा प्रयत्न केला. परंतु त्यांस यश आलें नाहीं. त्यांनीं स्पेन देश जिंकला खरा, तरी स्पेनचा जो खरोखरी मौल्यवान मुलूख, त्याच्या वसाहती, तो कांहीं त्यांच्यानें जिंकवला नाहीं. यापैकीं कांहीं नुकसान थोडा वेळ भरून आल्यासारखें वाटलें. वसाहती करण्यांत कांहीं वेळपर्यंत फ्रेंचांनीं मोठें शौर्य व कुशलता दाखविली. हिंदुस्थानांत डुप्ली, कानडांतला गालिसोनेर, समुद्रावर बेली सफ्रेन या सर्वांनीं मिळून जिकडे तिकडे फ्रान्सची कीर्ति जागृत ठेविली. कांहीं वेळ इंग्लंडबरोबरही चांगली टक्कर फ्रान्सनें मारिली. परंतु असे पराक्रम फ्रेंचांचे हातून घडतील, असें युट्रेक्टच्या तहाचे वेळेस मुळींच वाटण्यासारखें नव्हतें. कारण त्या वेळीं इंग्लंडास नवीन यश आल्यामुळें तेंच राष्ट्र पूर्वीपेक्षां फार प्रबळ दिसत होतें.

या वेळीं इंग्लंडचा निव्वळ फायदा ह्मणजे आकेडी, किंवा नोवास्कोशिया, व फ्रेंचांकडील न्यूफाउंडलंड हे प्रांत, व असियन्टो कांपाक्टप्रमाणें* स्पेनकडून मिळालेला गुलामांचा व्यापार हा होय. ह्मणजे अकेडी, कानडा, लुसिआना, या ज्या फ्रान्सच्या तीन मोठ्या वसाहती उत्तर अमेरिकेंत होत्या, त्यांपैकीं अकेडी इंग्लंडकडे गेल्यानें फ्रान्सच्या विस्तृत राज्याचा याच वेळीं नाश झाला. तसेंच स्पेनचा अंमल इतका कडक असे कीं, मध्य व दक्षिण अमेरिका यांमध्यें व्यापारासंबंधानें दुसऱ्या कोणाचाही शिरकाव होत नसे. तो मुलूख हा फ्रान्सचा कमी झाल्यानें होऊं लागला. स्पॅनिश लोकांच्या अमेरिकेंतील मुलुखांत गुलामां-

* टीप.—* पान ६९ पहा.

चा व्यापार करण्याची परवानगी इंग्रजांस मिळाली, व गुलामांचा व्यापार सुरू होतांच, इतर जिनसांचाही व्यापार हळूहळू गुप्त रीतीनें सुरू झाला.

या ठिकाणीं एक सामान्य विचार कर्तव्य आहे. इंग्रज लोक इतर चार राष्ट्रांशीं झगडून शेवटीं सर्वांवर वरचढ झाले, यांत, इतर राष्ट्रांपेक्षां ते जास्त नीतिमान अगर शूर होते, असें आमचें बिलकुल ह्मणणें नाहीं. तसेंच इंग्लंडचें राष्ट्र विस्तृत होत असतां जे जे मुलूख इंग्रजांनीं जिंकले, ते अगदीं न्यायानेंच जिंकले, अगर ते ज्या साधनांनीं जिंकले, तीं साधनें अगदीं न्याय्यच होतीं, असेंही आमचें ह्मणणें नाहीं. हें वरील हकीकत वाचून सहजीं समजणारें आहे. ड्रेक, हाकिन्स, कामनवेल्थ, अगर क्राम्वेल किंवा दुसरा चार्लस यांचे कारभार चांगले तारीफ करण्याजोगे होते, असें मानण्यास आह्मीं आमच्या वाचकांस भीड घालीत नाहीं. इंग्रजांच्या पराक्रमांत कांहीं गोष्टी जरी फार स्तुत्य आहेत व जरी स्पॅनिश लोकांपेक्षां इंग्रज वसाहती करणारांच्या हातून घडलेलीं कृत्यें कमी दोषार्ह व कमी अघोर आहेत, तरी इंग्रजी राज्याचा विस्तार करणाऱ्या गृहस्थांचें वर्तन चांगलेंच होतें, असें प्रतिपादन करणें सोपें नाहीं. या वेळीं आह्मी अशा गृहस्थांचीं चरित्रें लिहीत नाहीं. चरित्रकार, अगर कवि, अगर नीतिशास्त्रवेत्ते या नात्यानें आह्मी या पुरुषांच्या कृत्यांचा येथें विचार करीत नाहीं. आमचा संबंध केवळ एकच प्रकारचा आहे, ह्मणजे कार्यकारणभाव शोधून काढण्याचा आहे. आमच्यापुढें नेहमीं असा प्रश्न आहे कीं, वसाहती करण्याचें एवढें धाडसाचें कृत्य कोणीं कसें हातीं घेतलें, व त्यांत यश कोणास कसें मिळालें? या प्रश्नाचा विचार करण्याचा हेतु, ज्या पुरुषांच्या हातून तशीं कृत्यें घडलीं, त्यांचें आपण अनुकरण करावें, असा नव्हे; तर ज्या नियमांनीं राष्ट्रें प्रबळ होऊन वृद्धि पावतात, अगर भरभराटीस येऊन शेवटीं लयास जातात, ते नियम शोधून

काढणें, हा होय; व ज्या विशिष्ट राष्ट्रासंबंधीं हा विचार आह्मीं प्रस्तुत चालविला आहे, त्याजविषयीं असा विचार आह्मी करणार आहों कीं, जर हें राष्ट्र आज एवढें विस्तृत आहे, तर त्याची पुढें अशीच भरभराटी होत जाणार, किंवा हें आतां लयास जाणार. कदाचित् कोणी असें ह्मणतील कीं, राष्ट्र जर अन्यायानें स्थापन झालें असेल, तर त्याची भरभराटी होणें आपल्यास इष्ट नसावें. परंतु इतिहासांतल्या गोष्टी ज्या ईश्वरानें घडविल्या, तो ईश्वर नेहमीं या ह्मणण्यासारखाच न्याय करतो असें नाहीं. आज अन्यायानें दुसऱ्याचें हिरावून घेतलेलें राज्य उद्यां नाहींसेंच होतें, असें इतिहासांत नेहमीं आढळून येत नाहीं. एखाद्या मुलुखावर अंमल करणें व एखाद्या मालमत्तेचा उपभोग घेणें, या दोन गोष्टी अगदीं निराळ्या असल्यामुळें, थोड्याबहुत अन्यायानें एखाद्या राष्ट्रानें आपला फायदा करून, जें दुसऱ्याचें नुकसान केलें असेल, तें नुकसान त्यानें भरून दिलेंच पाहिजे, असें बिलकुल नाहीं. फ्रान्स देशांतील नार्मन लोकांनीं इंग्लंड देश आरंभीं केवळ अन्यायानें जिंकला होता, तरी तो देश त्यांच्याच अमलाखालीं आजतागायत भरभराटीस आला आहे. इंग्रज लोकांनाही इंग्लंड देश, साक्सन ह्मणून ज्यांचे लोक होते, त्यांजकडून मिळाला. कोणत्याही राष्ट्राचा अंमल आरंभीं कसा स्थापन झाला, हें स्पष्टपणें कळेल तर मुळांत जबरदस्ती आणि मारामारी झालेली आहे, असेंच आढळेल. इंग्लंडचा जो एवढा विस्तार झाला आहे, तो ह्या ऐतिहासिक नियमांस अनुसरून, अंशतः जुलमानें व अन्याय्य मार्गानें झालेला आहे; तरी इतर राष्ट्रांचा विस्तार होतांना झालेल्या अन्यायापेक्षां इंग्लंडचा अन्याय फार कमी आहे. जीं राष्ट्रें आज पुरातनचीं व सुदृढ आहेत, त्यांनीं जे अन्याय आरंभीं केले असतील, त्यांजपेक्षां हे अलीकडचे अन्याय फारच हलक्या प्रतीचे आहेत, असें ह्मणावें लागतें. इतर राष्ट्रांचें मूळ व

इंग्लिश राष्ट्राचें मूळ यांची तुलना करून पाहिली असतां, असें दिसतें कीं, इतरांप्रमाणेंच इंग्लिश साम्राज्याचीही उत्पत्ति आहे. ज्या गृहस्थांनीं तें स्थापन केलें, त्यांचे हेतु इतरांसारखेच होते. हे सर्वदा न्याय्यच होते असें नाहीं, तर सर्वत्रांनीं आपल्या कृत्यांत जसें मोठें शौर्य तसें मोठें लोभिष्टपणही प्रगट केलें आहे.

आपसांतल्या वर्तनांत त्यांच्या हातून कितीही आत्मसंयमन घडलें असलें, तरी निदान शत्रूंशीं व प्रतिस्पर्ध्यांशीं व्यवहार करतांना न्यायदेवतेनें त्यांच्या मनास विरळां टोंचलें असेल. इंग्लिश साम्राज्यांत व आह्मांस उत्पत्ति माहित असलेल्या इतर राष्ट्रांत इतकें साम्य आहे, तरी एकंदरीनें पाहतां, इतर राष्ट्रांपेक्षां इंग्लिश राष्ट्राचे इतिहास अन्याय्य कृत्यांनीं कमीच कलंकित आहेत, जास्त दूषित नाहींत. स्पेनच्या इतिहासांस निर्दयता व लुटारूपणा यांचाच अतोनात डाग लागला असल्यामुळें त्यांजपेक्षां इंग्लंडचे इतिहास फार निर्मळ आहेत. केव्हां केव्हां तरी इंग्लिश इतिहासांत विचारगांभीर्य, मनाचा मोठेपणा, व सद्वर्तनेच्छा आढळांत येतात. हे गुण वसाहतींच्या इतिहासांत फारसे दृष्टीस पडत नाहींत. कांहीं कांहीं पुरुष तर इतके चांगले होते कीं, त्यांजवरून अब्रहाम* अथवा ईनिअस† यांची आठवण झाल्याशिवाय राहत नाहीं. ह्मणून जे अन्याय इंग्रजांकडून वसाहती करतांना झाले असतील, ते बहुतेक सर्व राष्ट्रांस सामान्य असेच होते.

इतकें या ठिकाणीं लिहिण्याचें प्रयोजन एवढेंच आहे कीं, या वर सांगितलेल्या अन्यायांपैकीं एक अन्याय आह्मांस या ठिकाणीं नमूद करणें आहे. गुलामांच्या व्यापारांत एलिझाबेथच्या वेळेपासूनच इंग्लंडचें

* अब्रहाम हा एक महान साधु होता.

† ईनिअस हा एक दैविक पुरुष होता.

अंग होतें. या व्यापारांत क्रूरपणा दाखवून आपलें नांव प्रथम गाजविलें असा इंग्लिश पुरुष जान हाकिन्स हा होय. हाक्ल्यूट* यानें याची गोष्ट दिलेली आहे. इ. स. १५६७ या वर्षी आफ्रिकेंतलि एका खेड्यांत हा हाकिन्स गेला. त्या खेड्यांतील घरें ताडाच्या पानांनीं आच्छादिलेलीं होतीं. त्या घरांस हाकिन्स यानें आग लावली. तेथील राहिवासी सुमारें ८००० होते; त्यांपैकीं त्यानें पुरुष, बायका, मुलें मिळून २५० लोक गुलाम करून नेले. तथापि या वेळेपासून गुलामांचा व्यापार कायद्यानें बंद होईपर्यंत या व्यापारांत इंग्लंडचें अंग विशेष होतें असें नाहीं. त्या वेळीं व पुढेंही पन्नास वर्षेपर्यंत गुलामांचा व्यापार चालेल, अशा वसाहती इंग्लंडकडे नव्हत्या. बरें, पुढें अशा वसाहती ताब्यांत आल्यावरही त्यांत खाणींचें उत्पन्न व्हावयाजोगें नसल्यामळें गुलामांच्या कामाची त्यास जरूर लागणारी नव्हती. कारण, गुलामांचा उपयोग खाणींच्या कामास पुष्कळ करून घेतां येत असे. स्पेनचे लोक याच कामाकरितां गुलामांचा व्यापार करीत असत. ज्याप्रमाणें सतराव्या शतकांत इंग्रजांच्या वसाहती हळू हळू वाढत चालल्या, त्याचप्रमाणें गुलामांचा व्यापारही हळू हळू वाढत चालला. यूट्रेक्टच्या तहानें हा गुलामांचा व्यापार उत्पन्न झाला. तेव्हांपासून हाच व्यापार इंग्रजांचा मुख्य व्यवसाय होता. या वेळेपासून मात्र इंग्लिशांनीं या व्यापारांत पुढारीपण घेतलें, व राक्षसी क्रूरपणाचीं मोठमोठीं कृत्यें करून स्वतःच्या लौकिकास, इतर राष्ट्रांपेक्षांही, जास्त डाग लावून घेतला.

याचा अर्थ इतकाच कीं, इतर राष्ट्रांपेक्षां या कामांत इंग्रजांची

---

* रिचर्ड हाक्ल्यूट (१५५३–१६१६) हा एक प्रसिद्ध भूगोलवेत्ता इंग्लंडांत होता.

† टीप.—* पान ६७ पहा.

नीतिमत्ता जास्त नव्हती, आणि जगांतील व्यापारोत्तेजक राष्ट्रांमध्यें पहिली जागा मिळवून, स्पेनच्या लोकांशीं लढून मनगटाच्या जोरावर त्यांजकडून असियन्टो ठराव करून घेतला. तसेंच प्रसंगवशात् या निर्दय कृत्यांतही पुढारीपणाच त्यांच्या वांट्यास आला. गुलामांचा व्यापार बंद करण्याविषयीं ज्या मंडळीनें खटपट केली, त्यांनीं, कानांनीं ऐकण्या-सही दुःसह, अशा गुलामांच्या कित्येक गोष्टी प्रसिद्ध केल्या होत्या, त्या वाचतांना ही वरील हकीकत आपण लक्षांत ठेविली पाहिजे. इंग्लंडकडून जसा अन्याय झाला, तसाच इतर वसाहत करणाऱ्या राष्ट्रांकडूनही झाला होता, हें विसरतां नये. हा अन्याय मूळ सुरू करणारे इंग्रज लोक नव्हते, आणि कांहीं काळपर्यंत इतर राष्ट्रांपेक्षां इंग्रजांकडून जर जास्त अन्याय घडला असेल, तर त्यांत एवढेंच समाधान आहे कीं, इंग्रजांनीं आपलीं कृत्यें इतरांप्रमाणें गुप्त न ठेवतां उघडकीस आणिलीं व या कृत्यांबद्दल त्यांस फार पश्चात्ताप होऊन शेवटीं तो व्यापार त्यांनीं सोडून दिला. यूट्रेक्ट येथील तहांतली प्रत्येक गोष्ट इंग्रजांस अनुकूळ अशीच असल्यामुळें काय परिणाम झाला पहा! प्रत्येक पदार्थ उत्पन्न करण्यांत सृष्टिकर्त्याचा दूरवर कांहीं तरी हेतु आहे, व पारमार्थिक सद्गु-णांचें आचरण करून हा हेतु प्रत्येकानें तडीस नेला पाहिजे, हे विचार इंग्रज लोकांच्या मनातून समूळ नाहींसे होऊन, जबरदस्तीनें ऐहिक उप-भोगाकडेसच सर्व वस्तूंचा उपयोग करण्याची त्यांची प्रवृत्ति जितकी या वेळीं झाली, तितकी पूर्वीं कधींही झाली नव्हती. यूट्रेक्टच्या तहानंतर पुढें तीस वर्षेंपर्यंत दुष्ट हेतु जितके बलवत् झाले, तितके त्याच्या पुढें व पूर्वीं कधींही झाले नाहींत. धर्मावर व दृढीभूत आचारांवर इतकी अश्रद्धाही कधीं झाली नव्हती. हें दुर्वर्तन या वेळीं घडलें नसून, याच्या पूर्वींच पुष्कळ वेळ घडलें होतें, असें दाखविण्याची व त्याचें कारणही

भलतेंच दाखविण्याची चाल पडली आहे. अशा प्रकारचा रानटीपणा आणि दुष्टपणा सुरू झाला, तो, दुसरा चार्लस यास इंग्लंडचें राज्यपद मिळालें* तेव्हां झाला नसून, सन १६८८ च्या राज्यक्रान्तीनंतर† व विशेषेंकरून आन राणीचे कारकीर्दीनंतर‡ झाला आहे. "रेस्टोरेशनच्या§ वेळचे हास्यरसप्रधान नाटकाचे ग्रंथकार" या विषयावर मेकाले साहेबांनीं एक निबंध लिहिला आहे. त्यांत ते धडधडीत असें ह्मणतात कीं, विचरले, कांग्रीव्ह, व्हान्ब्रग आणि फारकर या चार ग्रंथकारांचे ग्रंथांत जो रानटीपणा दिसून येतो, तो रेस्टोरेशनच्या वेळचा आहे. वास्तविक पाहतां या चौघांपैकीं तिघांनीं आपले ग्रंथ राज्यक्रांतीनंतरही कित्येक वर्षेपर्यंत लिहिले नव्हते.

इंग्रज लोक आपल्या राष्ट्राचा विस्तार करीत असतां, जगांतील इतर राष्ट्रांमध्यें व्यापार व दर्यावर्दीपणा यासंबंधानें सर्वांत प्रथम पद इंग्लंडाचें ज्या वेळीं झालें, तेथपर्यंत इतक्या वेळच्या विवेचनानें आह्मी येऊन पोंचलों. हें पद इंग्लंडाला प्राप्त होण्यास मुख्य कारण अमेरिका खंडाशीं त्याचा संबंध, हें उघड आहे. तरी सर्व साधारण लोकांस इंग्लंडची खरी स्थिति वरप्रमाणें वाटली नव्हती. विस्ताराच्या मानानें पाहिलें तर इंग्लंडच्या ताब्यांतील मुलूख पोर्तुगालच्या मुलखापेक्षां बराच कमी असून स्पेनच्या मुलखाशीं तर याची तुलनाही नव्हती, असें ह्मटलें तरी चालेल. उत्तर अमेरिकेंतील अट्लांटिक महासागराच्या किनाऱ्यावर एक लहान पट्टी, पश्चिमेकडील थोडीशीं बेटें, व हिंदुस्थानांतील कांहीं व्यापाराचीं ठिकाणें, इतकाच मुलूख या वेळीं त्याच्या ताब्यांत होता. मध्य

---

* इ. स. १६६०

† टीप.—* पान ३९ पहा.

‡ कारकीर्द—(१७०२—१७१४).

§ टीप.—* पान२७० पहा.

व दक्षिण अमेरिका येथें स्पेनच्या ताब्यांत जे मोठमोठे विस्तीर्ण प्रदेश होते, त्यांच्या मानानें हे इंग्लिश लोकांचे मुलूख फारच क्षुल्लक होते. तसेंच हेंही वर सांगण्यांत आलें आहे कीं, फ्रान्सच्या वसाहती इंग्लंडच्यापेक्षां या वेळीं जास्त असून त्यांची वसाहत करण्याची पद्धत जास्त टिकाऊ व अखेरीस तिलाच यश येण्याचा संभव असणारी अशी दिसत होती.

याच्यापुढच्या इंग्लंडच्या विस्ताराच्या स्थितीचा विचार पूर्वीच करण्यांत आला आहे. या वेळीं हालंड देशाचा मोड झाला असल्यामुळें इंग्लंडची स्पर्धा यापुढें स्पेन आणि फ्रान्स या दोहोंबरोबरच चालू होती. स्पेन आणि फ्रान्स हे दोनही देश राजकुलसख्याचे* (फॅमिलि कॉम्पॅक्टाचे) योगानें एक होते. तथापि लढाईचें सर्व ओझें फ्रान्सवरच पडे. कारण, हिंदुस्थानांत आणि अमेरिकेंत इंग्रजी मुलखाला जोडून

---

* राजकुलसख्य (धि फॅमिलि कॉम्पॅक्ट) या नांवाचा एक गुप्त ठराव इ. स. १७३३ या वर्षीं फ्रान्स आणि स्पेन यांजमध्यें झाला. त्या वेळीं फ्रान्स देशांत चौदावा लुई राजा राज्य करीत होता. नुकत्याच झालेल्या "स्पेनच्या वारसासंबंधींच्या युद्धानें" फ्रान्स व स्पेन या दोघांसही पुष्कळ नुकसान सोसावें लागलें असून, त्याचा सूड उगविण्याचा दोघांचाही इरादा होता. फ्रान्साचें नुकसान इंग्लंडकडून झालें असून फ्रान्साचा सर्व व्यापारही बुडाला होता, व स्पेनच्या ताब्यांतील इटलींतील मुलुख आस्ट्रियाकडे गेल्यानें आस्ट्रियाकडून स्पेनचें नुकसान झालें. सन १७३३ या वर्षीं स्पेन व फ्रान्स यथील दोन्ही गाद्यांवर बुर्बोन घराण्यांतील पुरुष गादीवर होते. ते एकाच वंशांतले असल्यामुळे त्यांनीं आपसांत एकमेकांस नेहमीं मदत करण्याचा एक फार गुप्त करार केला. त्यामुळेच 'राजकुलसख्य' असें नांव आहे. हा ठराव पुष्कळ दिवस कोणास समजला नाहीं. तरी पुष्कळांस याजबद्दल संशय येत असे. इ. स. १७६१ या वर्षीं ह्या ठरावास पुनरुत्तेजन मिळालें कारण, या वेळपर्यंत स्पेनचे राजानें आपलें वचन पूर्णपणें पाळलें नव्हतें. सिसिली, नेपल्स, पिआसेन्झा, वगैरे ठिकाणचे राजे त्याच घराण्यांतले असल्यामुळें त्या सर्वांचा एक करार झालाच पाहिजे. त्या प्रसंगीं एकमेकांस मदत करावी व कोणी कोणास सोडूं नये असा सर्वांनीं निश्चय केला.

फ्रान्सचाच मुलूख होता. आह्मीं पूर्वी वर्णन केलेल्या इंग्लंड व फ्रान्स ह्यांच्यामधील युद्धांत निश्चयात्मक परिणाम असलेल्या गोष्टी ह्मणजे सात वर्षांचें युद्ध* आणि सन १७६२ तील प्यारिसचा तह† ह्या होत. हाच अठराव्या शतकांतील इंग्लिश सत्तेचा कळस. इतकेंच नाहीं, तर इतर राष्ट्रांच्या मानानें इंग्लंडची सत्ता यापुढें कधींही जास्त वाढली नाहीं. कांहीं वेळ असें वाटण्याचा संभव आहे, कीं कदाचित् सर्व अमेरिका इंग्लंडच्या ताब्यांत जाऊन विस्तृत इंग्लिश राज्याचाच एक मुख्य भाग होईल. असें झालें असतां स्पॅनिश साम्राज्यापेक्षां इंग्लिश साम्राज्य विस्तारानें मोठें झालें असतें, इतकेंच नाहीं, तर त्याची खरोखर शक्ति आणि सत्ता हींही अतोनात वाढलीं असतीं. स्पेनच्या महाराष्ट्राचा मुख्य दोष हा होता कीं, त्याच्यांतील रहिवासी लोक नुसते युरोपियनच नव्हते. जे थोडेसे युरोपियन होते, तेही युरोपामध्यें ऱ्हास होत असलेल्या जातीचे होते. ह्मणून बहुतेक लोकसंख्या कांहीं अंशीं केवळ रानटी लोकांची व कांहीं अंशीं रानटी लोकांशीं संयोग पावलेल्या युरोपियन लोकांची होती. इंग्लिश साम्राज्यांत गुलामांची लोकसंख्या खेरीजकरून बाकीचे सर्व लोक सुधारलेले युरोपियनच होते, व गुलाम लोक दिवसभर काबाडकष्ट करून अडाणीपणानें पृथक् रहात असल्यामुळें सुधारलेल्या राष्ट्रांत न खपण्याजोगे नाहींत, हें प्राचीन इतिहासांवरून व्यक्त होतें. परंतु रानटी लोकांशीं सुधारलेले लोक संयोग पावून उद्भवलेल्या लोकसंख्येमध्यें फारच दोष असतात.

ह्मणून ज्याप्रमाणें सतराव्या शतकामध्यें स्पेन अगर फ्रान्स ह्या देशांविषयीं इतर राष्ट्रांच्या मनांत मत्सर व भीति असे, त्याचप्रमाणें ह्या

* टीप —* पान ५६ पहा.

† टीप.—पान ५७ शेवट पहा.

अखेरच्या स्थितींत इंग्लंडविषयीं इतर राष्ट्रांचा मत्सर सुरू झाला, व कांहीं अंशीं त्यांस इंग्लंडची भीतिही वाटूं लागली. वसाहतींसंबंधीं फ्रान्स-बरोबर लढून इंग्लंड देशाला जेव्हां प्रथम जय मिळत गेले, तेव्हां 'समुद्रावरील जुलमी अंमल' असा इंग्लंडविषयीं बोभाट होऊं लागला. इसवी सन १७४५ त लुईबर्ग* नांवाचें शहर इंग्लिशांनीं घेतलें. तेव्हां सेंटपीटर्सबर्ग येथील फ्रेंच वकिलानें एक पत्र लिहिलें होतें, त्यांत तो असें ह्मणतो कीं, "समुद्रावर इंग्लिश लोकांनीं फार जुलूम मांडला आहे. इतर सर्व राष्ट्रांचे व्यापार व जलपर्यटन बंद करावें, असा त्यांचा इरादा दिसतो. ह्या कामांत सर्व राष्ट्रांचो समतोलता राखण्याकरितां आपण इंग्लंडच्या विरुद्ध कट केला पाहिजे." हालंडचें व इंग्लंडचें पूर्वी सख्य होतें, तरी हालंडचीही त्या वेळीं अशीच कुरकुर होती. कारण, ह्या वेळीं 'आमस्टर्डाम येथील एका नगरवाशाचा अर्ज' ह्या नांवाचें एक लहानसें पुस्तक हालंडांत बाहेर पडलें होतें. त्यांत 'इंग्लंडचा नाश केला पाहिजे' अशी ओरड मॉबर्ट नांवाच्या एका गृहस्थानें केली होती. पूर्वी शाफ्ट्स्बरी यानें अशीच ओरड हालंडच्या विरुद्ध केली होती. मॉबर्ट यानें असें लिहिलें होतें कीं, "फ्रान्साला बरोबर घेऊन आपण ग्रेट ब्रिटनची बरोबरी करूं. जे अन्याय इंग्लंडानें केले आहेत, व तेथील मूर्ख महत्वाकांक्षी मुत्सद्यांनीं जीं दुर्वर्तनें केलीं आहेत, त्यांचाच आपण-ही स्वीकार करून त्यांच्यासारखे आपण सधन होऊं." नौकानयनाचा† जो कायदा त्या वेळीं चालू होता, तो मोडण्याविषयीं आपण

* लुईबर्ग हें शहर फ्रेंचांचे ताब्यांत होतें. केप ब्रेटन ह्मणून अमेरिकेंत एक बेट आहे, त्यांत हें एक मोठें शहर आहे. फ्रेंचांचे ताब्यांत जो अमेरिकेंत एकंदर मुलूख होता, त्यांत लष्करी उपयोगाचें असें एवढेंच ठिकाण होतें.

† इ. स. १६५१ चे सुमारास हालंड व इंग्लंड यांजमध्यें लढाई सुरू झाली.

सर्व असामी एकत्र जमून विचार करणें विशेष जरूर आहे, असें त्या वकिलानें सुचविलें होतें. त्या वेळेपासून तों इ. स. १८१९ पर्यंत इंग्लंडविषयीं इतर सर्व राष्ट्रांचा मत्सर हाच तत्कालीन युरोपीय राज्य-कारस्थान घडून आणविण्यांत मुख्य हेतु होय. अमेरिकेच्या भांडणांत व 'सायुध ताटस्थ्य*' (आर्म्ड् न्यूट्रॅलिटि) नांवाच्या ठरावांत फ्रान्सला पडण्याचें कारण हेंच होय. पाहिल्या नेपोलियनच्या मनांत एवढा राग उत्पन्न होण्याचेंही कारण हेंच, व स्वतःची इच्छा नसतांही सर्व युरोप जिंकण्यास जी त्याची प्रवृत्ति झाली ती ह्याच वरील कारणामुळें होय.

येथपर्यंत आह्मी एकसारख्या अव्याहत चालत असलेल्या विस्ता-रांचें वर्णन केलें. त्यावरून हळू हळू व धिमेपणानें इंग्लंडचें राष्ट्र कसें

त्या वेळीं डच लोकांचा व्यापार सर्व जगभर पसरला होता व मालाची नेआण, तेच करीत असत. इंग्रजांस हें न आवडून त्यांनीं इ. स. १६५१ या वर्षीं एक कायदा केला. त्यांत असें ठरविलें कीं, इंग्लंडांत कोठूनही माल आणणें झाल्यास तो इंग्लिश तारवांतूनच आणला पाहिजे; किंवा तो माळ ज्या देशांत उत्पन्न झाला असेल त्या दे-शाच्या तारवांतून आलेला असला पाहिजे. ह्या कायद्यानें डच लोकांचे व्यापारास धक्का बसून युद्ध सुरू झालें.

* "सायुध ताटस्थ्य" (आर्म्ड न्यूट्रॅलिटि) या नांवाचा एक ठराव युरोपीय प्रमुख राष्ट्रांकडून इ. स. १७८० या वर्षीं करण्यांत आला. इंग्रज लोकांचें ह्मणणें असें होतें कीं, जें गलबत एकाद्या विशिष्ट राष्ट्राचें असें मानलें जात नसून समुद्रावर फिरेल, त्यांत शिरून तें तपासण्याचा व त्यांत लढाईचे उपयोगाचें सामान असेल तर तें जप्त करण्याचा आपला अधिकार आहे. या ह्मणण्यास इतर राष्ट्रें अनुकूल नव्हतीं. रशिया-मध्यें दुसरी क्याथराईन राणी राज्य करीत होती, तिनें असें प्रसिद्ध केलें कीं, "समु-द्रावर फिरणारीं गलबतें तटस्थ समजावीं, व अशा प्रकारच्या गलबतांवर जे कोणी हल्ला करतील, त्यांजवर आह्मी शस्त्र धरूं." या ह्मणण्यास फ्रान्स, प्राशिया, स्वीडन, डेन्मार्क, आस्ट्रिया, स्पेन, वगैरे सर्व राष्ट्रें कबूल होऊन सर्वांचें इंग्लंडचे विरुद्ध एकमत ठरलें व त्या सर्वांनीं तदनुसार ठराव केला. ताटस्थ्य याचा अर्थ असा आहे कीं, सर्व गलबतें कोणत्याही पक्षापासून तटस्थ मानिलीं जावीं व तीं अशीं न मानिलीं जातील, तर इतर राष्ट्रें सायुध होऊन लढाईस सज्ज होतील, असें समजावें. या वेळीं इंग्लंडची थोडीशी पिछेहाट झाली.

वाढत गेलें, तें वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. परंतु पुढें ह्या वाढत्या अमदानींत एक विलक्षण गोष्ट घडून आली. तिच्या योगानें इंग्लंडच्या शक्तीस एकाएकीं मोठा धक्का बसला. युरोपांतील प्रतिस्पर्धी राष्ट्रांशिवाय दुसरेंच एक राष्ट्र अमेरिकेंत उदयास आलें. अमेरिकेंतील वसाहती इंग्लंडपासून स्वतंत्र झाल्या. ह्या गोष्टीचें अमर्याद महत्व त्या वेळींही लोकांस कळल्याशिवाय राहिलें नव्हतें. ह्या गोष्टीपासून नानातऱ्हेचे परिणाम घडून येतील, असें जें त्या वेळीं वाटलें तें खोटें नाहीं. तरी त्या वेळीं अपेक्षित जे परिणाम तसेच मात्र पुढें घडून आले नाहींत. कोलंबसानें शोध लावल्यापासून, व स्पेनच्या वसाहत करणारांनीं त्या वेळीं थोडीबहुत असलेली सुधारणा दुष्टपणानें नाहींशी करून टाकल्यापासून, अमेरिकेचें आयुष्य जणूं संपल्यासारखें झालें होतें. ती निर्जीवता जाऊन अमेरिकेस नवीन चेतना प्राप्त झाली, व त्याचे परिणाम आतां पुढें उघडकीस आले. युरोपीय सुधारणेच्या तत्वास अनुसरून युरोपियन तऱ्हेची राज्यक्रान्ति अमेरिकेंत घडून आली, ही एक अजब गोष्ट आहे. कदाचित् फ्रान्समध्यें जी राज्यक्रान्ती पुढें लागलीच घडून आली, व जिच्याकडे जगाचें लक्ष तटस्थ लागून राहिलें होतें, त्या फेंच राज्यक्रान्तीपेक्षां ही गोष्ट वस्तुतः मोठी ह्मटली तरी चालेल. इंग्लंडचें सर्व विस्तृत राष्ट्र अगदीं नाहींसें झाल्यासारखें वाटेल, कारण जे तेरा प्रांत त्या वेळीं स्वतंत्र झाले, त्याच कायत्या इंग्लंडच्या त्या वेळच्या सर्व वसाहती होत्या. आणि त्या स्वतंत्र झाल्या त्यावरून त्या वेळीं असें लोकमत सिद्ध झालें कीं, तशा प्रकारचें इंग्लिश साम्राज्य असणें हें सृष्टस्वभावविरुद्ध असून, तसें कधीं उत्पन्न झालें तर तें अल्पायुषीच असावयाचें. पण ह्या गोष्टीस शंभर वर्षे होऊन गेलीं आहेत, व अद्यापि पूर्वीपेक्षां फारच विस्तृत असें इंग्लंडचें साम्राज्य हयात आहे. या गोष्टीचा पुढील प्रकरणीं विचार करूं.

प्रकरण आठवें.

ब्रिटिश साम्राज्याची फाटाफूट.

निरनिराळ्या दृष्टीनें एकाद्या गोष्टीकडे पाहिलें ह्मणजे ती गोष्ट निरनिराळ्या तऱ्हेची दिसूं लागते. त्याचप्रमाणें एखाद्या देशाच्या इतिहासासही निरनिराळी तऱ्हा देतां येईल. सतराव्या आणि अठराव्या शतकांतील इंग्लंडच्या इतिहासाच्या ज्या मर्यादरेषा आह्मीं वर दिल्या आहेत, त्या बहुतेक इतिहासकारांच्या मर्यादरेषांहून अगदीं भिन्न आहेत. कारण, ज्या दृष्टीनें इंग्लंडच्या इतिहासाकडे आह्मीं पाहत आहों, त्या दृष्टीस इतर इतिहासकारांस क्षुल्लक वाटणाऱ्या गोष्टी, महत्वाच्या दिसतात. इतिहासकारांस ज्या गोष्टी हलक्या प्रतीच्या वाटत होत्या, त्याच आह्मांला मुख्य मर्यादरेषा झाल्या आहेत. व ज्या गोष्टी त्यांस मर्यादरेषा अशा वाटत, त्या आह्मांस केवळ निरर्थक वाटल्या आहेत.

असें आहे, तरी पुष्कळ लोकांचें मत असें आहे कीं, इतिहासाच्या मर्यादरेषा नेहमीं पक्क्या ठरलेल्या असून, त्या कधींही बदलावयाच्या नाहींत. ह्या मर्यादरेषांच्या आंतल्या जागेची भरती करून चित्राला संपूर्णता आणणारे तपशील देण्यामध्यें इतिहासकारांचा मतभेद होईल. तरी मर्यादरेषांच्या योगानें झालेला सांगाडा कधींही बदलला जाणार नाहीं. मुलांसही तोंडपाठ करण्यास या मर्यादरेषांपैकीं कांहीं कांहीं गोष्टी दिल्या जातात. वास्तविक पाहिलें तर ह्याच गोष्टी अनिश्चित व अनियामक असून, पाहिजे तशा बदलणाऱ्या आहेत. कारण, एखाद्या गोष्टीला महत्व कशामुळें येतें बरें? नवीन राजा गादीवर येणें ही गोष्ट नेहमींच महत्वाची असते काय? ती घडते त्या वेळीं मोठी दिसते खरी; तरी पण एकदां तिच्या योगानें उत्पन्न झालेली चळवळ बंद

झाली ह्मणजे इतिहासांत ती गोष्ट आणिली पाहिजे, असेंसुद्धां नाहीं. हें तत्व जर बिनचुक लागू केलें, तर इतिहासाविषयींच्या आमच्या पुष्कळ कल्पना बदलून जातील. त्याजवरून असें दिसेल कीं, लोकांस जी इतिहासाची माहिती होत आली आहे, तिच्याहून खरोखर इतिहास अगदीं निराळाच असेल. कारण, ज्या गोष्टी महत्वाच्या अशा वाटूं लागल्या आहेत, त्या खरोखरी कमी महत्वाच्या असतील आणि ज्या गोष्टींस इतिहासांत फारच थोडी अगर मुळींच जागा मिळाली नसेल, त्याच गोष्टी फार महत्वाच्या वाटतील.

ह्मणून कोणत्याही गोष्टीचें ऐतिहासिक महत्व समजण्याचें कांहीं प्रमाण असलें पाहिजे. तें असलें ह्मणजे इतिहासकारांचें मुख्य काम, त्या प्रमाणानें सर्व गोष्टी तोलून पाहणें, हें आहे. तर प्रस्तुत आपण कोणतें प्रमाण घ्यावें बरें? ज्या गोष्टी 'मनोरंजक' अशा वाटतात, त्याच गोष्टी महत्वाच्या असें ह्मणावें काय? नाहीं. कारण, एखाद्या पुरुषाच्या चरित्रांत एखादी गोष्ट नीतिमत्तेमुळें किंवा कवित्वानें वर्णन केल्यामुळें मनोरंजक वाटेल; तरी ती ऐतिहासिक रीत्या मनोरंजक वाटणार नाहीं. तर मग आपण असें ह्मणावें काय कीं गोष्ट घडते वेळीं ती जशी कमी जास्त महत्वाची वाटत असेल, त्या मानानें तिचें महत्व कमी किंवा जास्त नेहमीं समजावें? बरें असें समजलें, तरी ती घडण्याचे वेळचें महत्व कळण्यासाठीं त्या वेळीं लोकांस काय वाटत होतें, याचा शोध केला पाहिजे? पुष्कळ लोक असें ह्मणतात कीं, गोष्ट घडून आली त्या वेळच्या लोकांस ती जशी वाटली होती, तशीच वाचकांस ती वाटवून देणें, ह्मणजे वाचकांसही ती गोष्ट घडून आली त्या वेळींच आपण जिवंत आहों, असें भासविणें, हेंच इतिहासकारांचें काम आहे. परंतु आमच्या मतें हें काम इतिहासकारांचें नाहीं. हें काम इति-

हासकारांचें आहे असें ह्मटलें असतां त्या इतिहासाचा काय बरें उपयोग होईल? ज्या वेळीं एखादी खरोखरी महत्वाची गोष्ट घडून येते, त्या वेळच्या लोकांस तिचें खरें महत्व बिलकुल समजत नाहीं. केव्हां केव्हां त्या वेळच्या लोकांचा समज चुकलेला असतो. तेव्हां, त्या वेळीं समज होता तसाच न लिहितां उलट त्याबद्दल विचार करून तो चुकलेला असल्यास दुरुस्त करणें, हें काम इतिहासकारांचें आहे. गतकालीं, गोष्ट घडण्याच्या वेळीं असलेल्या लोकांच्या कल्पना इतिहासांत प्रधानभूत न धरतां, उलट इतिहासकारानें असें दाखविलें पाहिजे कीं, अमुक एक गोष्ट घडून आली, तेव्हां तिच्याकडे सर्वत्रांचें अतोनात लक्ष लागलें होतें, तरी ती खरोखरी विशेष महत्वाची नसून अमुक एक गोष्ट जरी लोकांच्या नजरेस फारशी आली नाहीं, तरी ती फारच महत्वाची होती.

ऐतिहासिक गोष्टीचें चुकीनें महत्व समजण्याचीं जीं खोटीं प्रमाणें वर सांगण्यांत आलीं, तींच अमेरिकेंतलि राज्यक्रान्तीस इतिहासकारांनीं लागू केलीं आहेत. 'एक घडून आलेली गोष्ट,' या नात्यानें पाहिली असतां, अमेरिकेंतील राज्यक्रान्तीची हकीकत विशेष महत्वाची नाहीं. तींत कोणी विलक्षण अगर अमानुष शक्तीचा योद्धा नांवाजलेला नाहीं. कोणत्याही पक्षाला दिव्य विजय प्राप्त झाले नाहींत. वाशिंग्टन हा नाट्यकलेस शोभणारा असा नायकही नाहीं. तेव्हां, एकादी गोष्ट चित्तवेधक नसतांही, ऐतिहासिक रीत्या महत्वाची असेल, हें आह्मी विसरून जातों. फ्रान्सच्या राज्यक्रान्तीमध्यें व्यक्तिमात्रांकडून नानातऱ्हेचे विलक्षण पराक्रम असंख्य घडून आले असल्यामुळें अमेरिकेंतलि राज्यक्रान्तीपेक्षां तिलाच आपण जास्त महत्व देतों. यावरून वर दाखविलेली गोष्ट आणि इतिहास यांतील भेद आपण ध्यानांत ठेवीत नाहीं, असें होतें. तरी पण

वर दाखविलेली दुसऱ्या प्रकारची चुकी या उदाहरणांत जास्तच झालेली दिसून येते. इतिहासकार जसा कादंबरीकार नव्हे, तसाच तो वर्तमानपत्रें वाचून हकीकत लिहिणारा मुत्सद्दीही नव्हे. एखाद्या गोष्टीचें खरें महत्व त्या वेळचे लोकांस समजत नसतें; असें असतांही इतिहासकारांस त्या वेळचेंच लोकमत घ्यावेंसें वाटत असतें. उदाहरणार्थ, लॉर्ड नॉर्थच्या* वेळीं पार्लमेंटांतलि सभासदांस जें अमेरिकेंतील राज्यक्रान्तीचें स्वरूप दिसलें, तेंच आपण इतिहासांत लिहून ठेवावें, असें त्यांस वाटतें. परंतु या व अशाच दुसऱ्या गोष्टींच्या कार्यकारणभावाचें विवेचन ते करीत नाहींत. जगाच्या इतिहासांत एखाद्या विशिष्ट गोष्टीचें खरें महत्व काय आहे तें ते सांगत नाहींत. स्टांप आक्टां† मोडण्याचे बिलासंबंधीं, बोस्टन† पोर्ट बिलासंबंधीं, अथवा कांप्रोमाईझ आक्टा† संबंधीं, अमुक एका स्थितींत आपण आपलें मत कोणत्या प्रकारचें दिलें असतें, याचाच विचार करण्यांत भूषण मानण्याचा इतिहासकारांनीं निश्चय केलेला दिसतो. ज्याप्रमाणें वर्तमानपत्रकर्त्यांची चर्चा असते, त्याच प्रकारची इतिहासकारांचीही चर्चा असावी, असें आपण मानतों. पार्लमेंटांत वादविवाद कोणत्या प्रकारचे होत असतात, प्रधानमंडळ कसकसें बदलत जातें, अमुक एक प्रस्तुत विषयावर पार्लमेंटांतलि सभासदांचीं मतें कसकशीं पडतात, या प्रश्नांचीच नेहमीं वर्तमानपत्रांत वाटाघाट चालत असते. विशेषेंकरून जसा प्रश्न उद्भवेल तसा तो घेऊन त्याचा निकाल लावून दुसऱ्या प्रश्नास हात घालण्याचा प्रघात वर्तमानपत्रकारांचा आहे. प्रत्येकाविषयीं एकदम पूर्ण माहिती ते देत नाहींत. थोडी माहिती जशी नजरेसमोर येईल

---

* हा अमेरिकेंतील वसाहतींशीं इंग्लंडची लढाई सुरू होण्याचे वेळेस इंग्लंडांत मुख्य प्रधान होता.

† टीप.—‡ पान ५७ पहा.

तसतशी देत असतात. त्यांचा यत्न नेहमीं वर्तमानपत्राची जागा भरून काढण्याचा असल्यामुळें होईल तितकें करून प्रत्येक प्रश्नाची वाटाघाट ते थोडथोडी चालूच ठेवितात. वर्तमानपत्रांत हें शोभलें जातें. परंतु इतिहासांत ही पद्धत स्वीकारली असतां, मोठे शोचनीय परिणाम घडतात. इंग्लंडच्या अलीकडच्या इतिहासांत अशा प्रकारची पोकळ चर्चा प्रत्येक विषयाची केलेली आढळते. प्रत्येक प्रश्नाचे संबंधानें निरनिराळे पक्ष उत्पन्न होत असतात, त्या पक्षांसच महत्व दिल्यामुळें ह्मणजे केवळ पाक्षिक चर्चेमुळें इतिहास फार दूषित झाला आहे. मोठमोठ्या घडामोडींचा इतिहास लिहितांना इतिहासकारांस मूळ आधार वर्तमानपत्रांतील चर्चा हीच असते.

तर मग ऐतिहासिक महत्व कोणत्या रीतीनें समजावें ? आमचें ह्मणणें असें आहे कीं, कोणत्याही गोष्टीचें जें गर्भित्व तेंच तिचें खरें महत्व समजण्याचें प्रमाण. ह्मणजे कोणत्याही गोष्टीचे परिणाम प्रथम गर्भांत असतात व ती गोष्ट घडून आल्यावर पुढें मग ते हळू हळू बाहेर दृष्टीस पडूं लागतात. हे परिणाम जसे लहानमोठे असतील तसें त्या गोष्टीचें महत्व कमीजास्त समजण्याचें आहे. हेंच तत्व ध्यानांत धरून आह्मीं इतका वेळ विवेचन केलें आहे. अठराव्या शतकांत इतर सर्व घरगुती प्रश्न व चळवळी यांपेक्षां इंग्लंडच्या विस्ताराचा प्रश्न ऐतिहासिक दृष्टया फार महत्वाचा आहे, असें आह्मीं सांगितलें, तें याच तत्वास अनुसरून होय. अठराव्या शतकाच्या मध्य भागांत वुइल्यम पिट्ट साहेब हा सर्व कारभार पहात होता, ह्मणून या पिट्ट साहेबाचीच हकीकत पहा. ह्या मुत्सद्याचा सर्व मोठेपणा इंग्लंडच्या विस्ताराच्या मोठेपणावर अवलंबून आहे. वास्तविक पाहिलें तर ब्रिटिश राष्ट्रविस्ताराचाच तो मुत्सद्दी असें ह्मटल्यास चिंता नाहीं. त्यानें या विस्तार रूपी अवाढव्य

लेश्राची लागवड केली. स्पेनबरोबर यांचे लोकांसारखी लढाई चालवून व फ्रान्सबरोबरही वसाहतींचे बाबतींत युद्ध चालवून त्यानें महान् लौकिक मिळविला. विस्तृत राज्याची फाटाफूट न होऊं देण्यामध्यें त्यानें आपला सर्व वृद्धापकाळ खर्च केला.

आतां अमेरिकेंतील राज्यक्रान्तीकडे पहा. वर सांगितलेल्या गर्भित्वाच्या तत्वान्वयें ही राज्यक्रान्तीची गोष्ट केवळ अनन्यसाधारण आहे. निःपक्षपाती दुरून पाहणारांस ती अशीच दिसली आहे. परंतु त्या वेळच्या वर्तमानपत्र मुत्सद्यांस आपली दृष्टि मोठी विस्तृत करून पाहण्यास सवड नव्हती. त्यांस ही सर्व हकीकत एकदम दिसत नसून, प्रत्येक वेळेस जेवढा प्रश्न पुढें येई, तेवढ्याचीच हकीकत त्यांस समजे, व पार्लमेंटांत त्या प्रश्नासंबंधीं काय मतभेद होतो, याचाच विचार करण्यांत त्यांचा वेळ जाई. शिवाय हे प्रश्न दुसऱ्या नानातऱ्हेच्या प्रश्नांशीं संयुक्त झालेले असे त्यांजपुढें येत; व हे दुसरे प्रश्न फार महत्वाचे नसतांही त्या वेळच्या व्यवहारांस अनुलक्षून असल्यामुळें पाक्षिक मुत्सद्यांस ते त्या वेळेस क्षुल्लक वाटत नसत. स्टांपाचा कायदा पास झाला, तेव्हां त्याजविषयीं कोणास फारशी दादही नव्हती, हें प्रसिद्धच आहे. दोन तीन रात्रीं पार्लमेंटाची सभा भरली. दर रात्रीच्या विषयांची विल्हेवारी ठरलेलीच होती. पहिल्या रात्रीस सुरुवातीचें संभाषण झालें. ब्यूटच्या अंतस्थ लबाड्या* उघाडीस आणण्याविषयीं व प्रिन्सेस डावेजरवर* गुप्त हल्ला करण्याविषयीं

* ब्यूट ह्याचें वजन तिसऱ्या जार्जाच्या कारकीर्दीच्या सुरवातीपासून सुरू झालें. पिट्ट व न्यूकासल हे आपलें काम करीत असतांना त्यांच्या कामांत हा पडद्याच्या पाठीमागें राहून व्यत्यय आणी. पुढें तो पंतप्रधान झाला. परंतु त्याची प्रधानकी सरासरी एक वर्षच टिकली. त्यानें आपल्या कारकीर्दींत जे व्यवहार केले, त्यांमुळें लोक त्याचा द्वेष करू लागले. परंतु त्याचा तिसऱ्या जार्जाची आई प्रिन्सेस डावेजर आफ् वेल्स हिच्याशीं कांहीं अंतस्थ संबंध असल्यामुळें लोक हिला बराच

वाटाघाट करण्यांत दुसरी रात्र गेली. तिसऱ्या रात्रीं विल्कस* प्रकरण निघून कित्येकांवर वारंटें काढण्याचें ठरलें. त्याच रात्रींच्या कामाच्या यादींत वसाहतींवर कर बसविण्याविषयीं एक सूचना होती, व ज्याप्रमाणें हल्लीं हिंदुस्थानचे राज्यकारभारासंबंधीं खर्चाचा अंदाज पार्लमेंटांत ठरत असतां, तिकडे कोणाचें लक्ष गेल्याशिवाय तो असेल तसा पसंत होऊन जातो, त्याचप्रमाणें ही वरील सूचनाही तेव्हांच पसंत होऊन गेली. ही गोष्ट फार शोचनीय झाली. तिला इलाज नाहीं खरा, तरीपण इतिहासांत अशा सर्व प्रश्नांचा एकच भयंकर गोंधळ केला जातो, यास कोणती सबब इतिहासकार देतील बरें? विचारशून्यत्वामुळें, गतानुगतिकत्वाप्रमाणें कालानुक्रमास अनुसरून व पूर्वापार चालत आलेला नीच परिपाठ सोडून न देतां, पार्लमेंटांतील दिवसवारीची कामाची यादी घेऊन इतिहासकार आपले ग्रंथ लिहितात, हें केवढें आश्चर्य आहे! पार्लमेंटांतलि सभासदांनीं मतभेद पडल्याशिवाय स्टांपाचा कायदा एकदम ठरवून टाकला; पण त्या वेळीं, या आपल्या कृत्यापासून अमेरिकेंत काय अनर्थ होईल, याची त्यांस कल्पनाही नव्हती. तसेंच आमच्या इतिहासकारांसही ती कल्पना नव्हती, हें खरें आहे कीं नाहीं, याचा वाचकांनींच विचार करावा. पार्लमेंटासमोर जेव्हां स्टांपाच्या कायद्याचा प्रश्न आला, तेव्हां सभासदांस त्याजबद्दल आगाऊ कांहींच वर्दी नव्हती. त्या दिवसाच्या विवेचनाक-

---

दोष देत असत. तिसऱ्या जार्जाची बायको लग्न होण्यापूर्वीं त्याला आवडत नव्हती, परंतु ह्या ब्यूट व त्या डावेजरनें मिळून त्याच्या गळ्यांत ती बायको बांधली. पुढें १७६५ त जार्ज आजारी पडला, त्या वेळीं रीजेन्सीचा प्रश्न निघून वाद झाला. तींत राजाची आई प्रिन्सेस हिला मुळींच अंग दिलें जाऊं नये, आई राजाच्या कुटुंबामध्यें येत नाहीं, असें ठरलें. त्याचा राजाला फार राग आला.

* टीप.—१ पान ३० पहा.

रितां अगदीं भिन्न असे पुष्कळ इतर प्रश्न होते. त्यांतच हा प्रश्न घुसडून दिलेला होता. हल्लींचीं राष्ट्रें फार विस्तृत व पुष्कळ असल्यामुळें राज्यतंत्र फार घोटाळ्याचें झालें आहे, ह्मणून मुत्सद्यांस दूरवर विचार करण्यास वेळ न सांपडल्यामुळें घोटाळा न होऊं देणें अपरिहार्य आहे. परंतु इतिहासकारांनीं जर ह्या घोटाळ्याचें निवारण केलें नाहीं, तर इतिहासाचा तरी काय उपयोग? अमेरिकेंतील राज्यक्रान्तीची व्यवस्था याच प्रकारची लावलेली आहे. ज्याप्रमाणें त्या वेळच्या इंग्रज लोकांस ती घडून आली ह्याबद्दलचा अचंबाच वाटतो, तसाच इतिहासकारांसही वाटतो. जेव्हां आह्मी अमेरिकेंतील वसाहतींवर कर बसविण्याची हकीकत वाचतों, तेव्हां आमच्या डोक्यांत ब्यूटचीं कृत्यें,* राजलग्न,* राजाचें दुखणें, वुइल्कुस्,† आणि जनरल वारंट्स्† वगैरे विषय पूर्णपणें भरलेले असतात. इतक्यांत अमेरिकेंत गवगवा झाला असल्याचें ऐकूं येतें. बरें इतकें झाल्यावरही जसें त्या वेळचे इंग्रजी मुत्सद्दी ह्मणत असत, तसेंच इतिहासकारही ह्मणतात कीं, "कायहो, वसाहती ह्मणजे काय आहेत बरें, त्या मूळ केव्हां व कशा स्थापन झाल्या, व त्यांजवर हल्लीं अंमल कोणत्या प्रकारचा होत असतो?" ज्याप्रमाणें रोजच्या वर्तमानपत्रांत हकीकत लिहून आली असते, त्याचप्रमाणें त्या विषयांत इतिहासकार आपल्या वाचकांचा प्रवेश करून देतो. नंतर जरा थांबून बराच वेळ जें काय लिहून झालें असेल, त्याजविषयीं पुनः एकवार विचार करण्याकरितां एक भाग लिहितो. त्या भागांत तो "इंग्लंड देशाच्या पूर्वीपासून पुष्कळ वसाहती अमेरिकेंत आहेत," वगैरे असा प्रारंभ करतो. याप्रमाणें स्टांपाचा कायदा मोडण्याबद्दल जे वाद-

---

* टीप.—* पान २६६ पहा.

† टीप.—† पान ५० पहा.

विवाद पार्लमेंटांत व्हावयाचे असतात, ते समजण्यापूर्वी थोडीशी वसाहतींची माहिती तो देतो. नंतर कालानुक्रम सोडून थोडा वेळ विषयांतर केल्याबद्दल वाचकांची माफी मागून पुनः आपल्या उद्योगास लागून पुढील हकीकत सांगूं लागतो. हाऊस् आफ् कामन्स्‌मध्यें वादविवाद अक्षरशः उतरून घेण्याकरितां जे लोक वर्तमानपत्रवाल्यांकडून वगैरे येतात, त्यांस बसण्याची एक जागा आहे. तेथून ते लोक ज्याप्रमाणें हकीकत लिहीत असतात, त्याचप्रमाणें इतिहासकार आपलाही इतिहास लिहितो. यावरून एखाद्याला असेंच वाटेल कीं, ही अमेरिकेंतील राज्यक्रान्ति पार्लमेंट सभेंत घडून आली. राकिंग्हाम* मंत्रिमंडळाला व नंतर नार्थ† मंत्रिमंडळाला अमेरिकेचाच प्रश्न मुख्य वाटला होता. अमेरिकन लोक आपल्या ताब्यांतून जाऊन स्वतंत्र झाले, हें नुकसान महत्त्वाचें मानण्याचें कारण ते इतकेंच समजतात कीं, त्याच्या योगानें नार्थमंत्रिमंडळ मोडून गेलें.

इ. स. १७८३ या वर्षी तह झाल्याचें सांगितल्यावर इतिहासकार कांहीं वेळ थांबून गंभीरतेनें एकंदर प्रकरणाविषयीं एक लेखखंड लिहितो, व हा लेखखंड महत्वाचा आहे, असेंही त्यास वाटतें. स्वतंत्रतेनें वागण्याचें अंगीं सामर्थ्य येतांच, वसाहती स्वतंत्र व्हावयाच्याच, व अमेरिकेंतील वसाहती स्वतंत्र झाल्यामुळें इंग्लंडचें नुकसान नसून उलट फायदाच आहे, अशा प्रकारचा थोडा मजकूर सांगून, मग हा विषय इतिहासकार सोडून देतो, व अमेरिकेंतील लढाया होण्याचे पूर्वी जसा अमेरिकेविषयीं कांहींच मजकूर त्यानें लिहिला नव्हता, तसाच आतां यापुढेंही तो लिहीत नाहीं. हाऊस आफ् कामन्स्‌मध्यें दुसरे विषय निघत

---

* राकिंग्हामची कारकीर्द (१७६५–६६,१७८२–८३)..

† टीप.—* पान २६४ पहा.

असतातच. इंडिया बिलावर* चालणारे जबरदस्त वादविवाद, कोआलिशनीं† बरोबरची धाकट्या पिट्टचीं भांडणें, वेस्टमिन्स्टर इलेक्शन,‡ आणि कांहीं वेळानंतर रीजन्सीसंबंधीं§ वादविवाद वगैरे विषयांकडे मग इतिहासकारांचें चित्त वेधून जातें. फ्रान्सामध्यें १४ वा लुई ह्मणून एक मोठा राजा होऊन गेला. त्या एकाच व्यक्तिमात्राचें पराक्रमवर्णन करण्यामध्यें फ्रेंच इतिहासकारांस त्या वेळीं मोठें कौतुक व अभिमान वाटत असे. त्याचप्रमाणें इंग्लिश इतिहासकारांस पार्लमेंट सभेचें कौतुक वाटून तिच्या कृत्यांकडे संमानपूर्वक बारीक लक्ष ते देत असतात. असें होतां

---

* इंडिया बिल, ह्मणजे स. १७८३–८४ या वर्षी हिंदुस्थानच्या राज्यकारभारासंबंधीं फॉक्स व पिट्ट यांनीं दोन बिलें पार्लमेंट सभेंत आणलीं होतीं. त्यांजवर पुष्कळ वादविवाद होऊन पिट्टचें बिल पास झालें.

† ह्या कोआलिशनचा संबंध फ्रान्सचे राज्यक्रान्तीसंबंधींच्या युद्धांशीं असून, त्याचें संपूर्ण वर्णन त्या टिपांत दिलें आहे. पान २९ प्रकरण २ पहा.

‡ पार्लमेंट वेस्ट मिन्स्टर येथें कधीं कधीं बसत होतें. ह्मणून, वेस्ट मिन्स्टर इलेक्शन ह्मणजे पार्लमेंट सभेंत लोकांनीं सभासद निवडून पाठविणें होय. या निवडणुकीचा प्रश्न पुष्कळ महत्वाचा असतो.

§ रीजेंसी बिल.—तिसरा जार्ज इंग्लंडच्या गादीवर १७६० त बसला व १८२० त मेला. तितक्या मुदतींत तो तीनदां वेडा झाला होता. त्यामुळें राज्यव्यवस्थापक एक मंडळी स्थापावी लागली. त्यांत रीजंटाबद्दल भांडणें होत असत. असा प्रसंग प्रथम १७६५ त आला, पण तो लवकरच टळला. १७८८ त दुसरा प्रसंग आला. त्या वेळीं ह्या राजाच्या ज्येष्ठ मुलाला रीजंट नेमलें. परंतु त्याच्यावर बंधनें फार ठेविलीं, त्यामुळें तो बाहुल्याप्रमाणें होता. भांडणें झालीं तीं ह्या बंधनांसंबंधानेंच झालीं. फाक्स वगैरेंच्या मतें तीं बंधनें युवराजावर मुळींच नसावींत; व पिट्ट वगैरेंचें ह्मणणें होतें कीं, युवराजाला सार्वभौम समजणें ह्मणजे पार्लमेंटाच्या अधिकाराची रांगोळी करणें होय. होतां होतां युवराजाला प्रतिबंधक असे नियम अमलांत आले. तिसरा प्रसंग १८११ त आला. त्या वेळीं ह्या बंधनांसंबंधानें अशींच शेरिडन, ग्रेनविल, ग्रे वगैरेंचीं भांडणें झालीं. परंतु बंधनें कायम राहिलीं. ह्या वेळेपासून हे युवराज होते, तरी खरोखरी राजासारखेच होते, कारण तिसरा जार्ज १८११ त जो आजारी होऊन एकदां वेडा झाला, तो पुनः बरा झालाच नाहीं. तसाच १८२० त तो मरण पावला.

होतां सरते शेवटीं फ्रान्सच्या राज्यक्रान्तीपर्यंत इतिहासकार येऊन पोंचतो, आणि एकदां नेपोलियनबरोबरच्या इंग्लंडच्या लढाया वर्णन करूं लागला, ह्मणजे मात्र बरगायन* आणि कार्नवालीस* यांचे पराक्रम त्यास तुच्छ वाटून तो त्यांची अगदीं शेवटची रजा घेतो, व खरोखरी महत्त्वाच्या गोष्टी व खरोखरी मोठ्या लोकांचें पराक्रमवर्णन करण्याची संधि पुनरपि आपल्यास प्राप्त झाल्याचा त्यास अतोनात हर्ष होतो.

या सर्व हकीकतींचे उलट आह्मांस असें सांगणें आहे कीं, अमेरिकेंतील राज्यक्रान्ति ही त्रासदायक क्षुल्लक गोष्ट नव्हती. थोडीशी हकीकत देऊन अशा गोष्टीच्या इतिहासाची पूर्तता कधींही व्हावयाची नाहीं. ही गोष्ट फारच महत्वाची आहे. अर्वाचीन इतिहासांत इतक्या महत्वाची दुसरी गोष्ट नाहीं ह्मटलें तरी चालेल. आणि इंग्लंडच्या संबंधानें तर फ्रान्सच्या राज्यक्रान्तीपेक्षां सुद्धां इंग्रजांस ती जास्त महत्वाची व जास्त स्मरणीय आहे. फ्रान्सच्या राज्यक्रान्तीशीं या गोष्टीची तुलना झाली नसती. परंतु फ्रान्सची राज्यक्रान्ति फार दिवस चालत गेल्यानें व पुढें झालेल्या लढायाही पुष्कळ दिवस निकराच्या चाल- ल्यामुळें विलक्षण मोठमोठे परिणाम अखेरीस घडून आले; ह्मणूनच या दोन गोष्टींची तुलना करतां येते. असा प्रकार लिहिण्यांत आह्मीं धाडस करितों असें आह्मांस मुळींच वाटत नाहीं. नाईल,† ट्राफल्गार,† पेनिन्शुला,† वाटर्लू† येथील हकीकती, बंकर्स हिल,‡ ब्रांडीवाईन,‡ साराटोगा‡ आणि यॉर्क टाऊन‡ येथील हकीकतीपेक्षां जास्त भयंकर वाटतात खऱ्या. परंतु याचें कारण निराळेंच आहे. एक

* टीप.—‡ पान ५७ पहा.

† टीप.—* पान ५६ पहा.

‡ टीप.—‡ पान ५७ पहा.

तर, ज्या ठिकाणीं आपला पराभव झाला असेल, त्या लढायांपेक्षां ज्यांत आपल्यास जय मिळाला असेल, त्या लढायांची हकीकत वाचणें सहजच जास्त आवडतें. दुसरें, समरांगणांतील पराक्रम पाहूं गेलें तर अमेरिकें-तील लढायांपेक्षां फ्रान्सबरोबरच्या लढाया जास्त मोठ्या होत्या. नेपो-लियन, नेल्सन, वेलिंग्टन् वगैरे योद्धे अमेरिकेंतील योद्ध्यांपेक्षां वरच्या पायरीचे होते. परंतु ऐतिहासिक गोष्टींचा अनुक्रम त्यांच्या मनोरंज-नानुरूप लावला जात नाहीं, तसेंच त्यांजविषयीं आमची आवड जशी कमी जास्त असेल त्या आवडीवरही लावला जात नाहीं, तर त्यांज-पासून जसे लहान मोठे परिणाम घडून आले असतील, तसा त्यांचा अनुक्रम लावावयाचा आहे.

अमेरिकेंत राज्यक्रान्ति झाल्यामुळें एक नवीन राष्ट्र स्थापलें गेलें. या राष्ट्रांत भाषा व इतर व्यवहार सर्व इंग्लंडच्या सारखेच होते. तरी कांहीं गोष्टींत नवीनच पद्धत त्यांत उत्पन्न झाली होती. ही पद्धत इंग्लं-डच्या पद्धतीपासून भिन्न होती. इतकेंच नाहीं, तर सर्व युरोपाच्या पद्धतीहूनही ती भिन्न होती. हें राष्ट्र विस्ताराच्या मानानें फार मोठें होतें, तरी त्या वेळीं लोकसंख्येच्या मानानें फार मोठें नव्हतें. आणि असाही सुमार दिसत होता कीं, तें लवकरच लयास जाऊन पुन्हां कधींही जोडलें जाणार नाहीं. परंतु तें मोडलें नाहीं. तें हळू हळू जास्तच प्रबळ होत चाललें, आणि हल्लीं तर रशियाशिवायकरून इतर कोणत्याही युरोपीय राष्ट्रापेक्षां, विस्तारानेंच नाहीं तर लोकसंख्येनें-ही, तें मोठेंच आहे. हा जो एवढा विलक्षण परिणाम घडून आला, त्याचे योगानें आह्मीं अमेरिकेच्या राज्यक्रान्तीचें महत्व समजलें पाहिजे. कारण, इतिहासाचें मुख्य काम राष्ट्राचा उदय व उन्नतावस्था, यांचा विचार करणें, हें होय.

ब्रिटिश राज्याच्या विस्ताराची जी हकीकत आह्मीं मागें सांगि-

तली, तींत खालील गोष्टी आह्मीं प्रधान गणल्या होत्या: स्पॅनिश आर्मेडा,* व्हर्जीनिया आणि न्यू इंग्लंड येथील वसाहती,† इंग्रजांचें आरमार आणि व्यापार ह्यांची भरभराटी, क्रामवेलची स्पेन देशावर स्वारी,‡ हालंडबरोबरच्या समुद्रावरील लढाया,§ फ्रान्सच्या वसाहतींची वृद्धि, हालंडचा ऱ्हास, यूट्रेक्टच्या¶ तहापासून पुढें इंग्लंडची अग्रगण्यता आणि अमेरिकेसंबंधीं इंग्लंड आणि फ्रान्स यांचें भांडण. असें वर सांगण्यांत आलें आहे कीं, ह्या सर्व गोष्टी एका ठिकाणीं घातल्या ह्मणजे इंग्लंडच्या विस्ताराचा इतिहास पूर्ण झाला. सतराव्या शतकामध्यें हा विस्तार फारसा दृश्य नव्हता. कारण, स्टुअर्ट घराण्यांतील राजे व लोक ह्यांचे आपसांत इंग्लंडांत तंटे चालले होते. तथापि अठराव्या शतकांत ह्या गोष्टीस मागें न टाकितां, ती इतिहासांत अग्रगण्य मानिली पाहिजे. ह्या वरील क्रमास अनुसरून वर शेवटीं सांगितलेल्या गोष्टीच्या पुढची गोष्ट ह्मटली ह्मणजे साम्राज्याची फाटाफूट. विस्तृत ब्रिटिश राष्ट्र इंग्लंडपेक्षां जितकें मोठें आहे, तितकीच ही शेवटची गोष्ट वर सांगितलेल्या पूर्वीच्या सर्व गोष्टींपेक्षां मोठी आहे. हौ आणि कॉर्नवालीस हे योद्धे मोठे होते, किंवा नाहीं, किंवा वॉशिंग्टन हा मोठा बुद्धिमान होता किंवा नाहीं, अशा प्रश्नांचा विचार करून या वरील गोष्टीचें महत्व आह्मांस पूर्णपणें कळणार नाहीं. इंग्लंडच्या इतिहासांत जितकें ह्या गोष्टीचें महत्व आहे, तितकें जगाच्या इतिहासांतही आहे. परक्या ठिकाणीं पांच कोटी लोक

* टीप.—† पान १५४ पहा.

† टीप.—* पान २३३ शेवट पहा.

‡ टीप.—* पान १५६ पहा.

§ टीप.—* पान १५७ पहा.

¶ टीप.—* पान ६७ पहा.

जाऊन राहणें व ह्या पांच कोटींचे थोड्याच वर्षांत दहा कोटी होण्याचा संभव असणें, एवढेंच प्रमाण, त्या गोष्टीचें महत्व सर्व इतिहासांत अतिशय मोठें मानण्यास पुरें आहे. अशा प्रकारची दुसरी गोष्ट जुन्या महाद्वीपांत अगर नवीन महाद्वीपांत कधींही घडून आल्याचें आमच्या माहितींत नाहीं. इ. स. १६८८ त इंग्लंडांत राज्यक्रान्ति झाली, त्या वेळीं जी इंग्लंडची लोकसंख्या होती, तिच्यापेक्षां अमेरिकेंतील स्वतंत्र झालेल्या राष्ट्राची लोकसंख्या दसपट आहे; व सन १७८९ त फ्रान्सच्या राज्यक्रान्तीच्या वेळीं असलेल्या फ्रान्सच्या लोकसंख्येच्या ती दुप्पट आहे. एवढीच गोष्ट घेतली असतां असें समजतें कीं, प्राचीन इतिहासांत न सांपडणारीं अशीं मोठ्या परिमाणाचीं व जास्त वस्तीचीं राष्ट्रें हल्लीं आह्मांस दिसतात. परंतु ही गोष्ट एवढीच घेऊन चालावयाचें नाहीं. विस्तृतपणा ह्मणजे शक्तीनें मोठेपणा असतोच असें नाहीं; आणि युरोप खंडांत असलीं विस्तृत राष्ट्रें नसलीं, तरी एशिया खंडांत याहूनही जास्त लोकसंख्येचीं राष्ट्रें आहेत. हिंदुस्थान आणि चीन ह्यांची लोकसंख्या युनायटेड स्टेट्सूच्या लोकसंख्येपेक्षां पांचपट जास्ती आहे. तरी अमेरिकन् राष्ट्राचा विशेष फरक हा आहे कीं, जसा त्या राष्ट्राचा विस्तार मोठा आहे, तसाच त्याचा प्रभावही जास्त आहे. चीनबद्दल आह्मांला विशेष माहिती नाहीं, ह्मणून तो शिवाय करून बाकीचीं जीं राष्ट्रें अतोनात विस्तृत अशीं होत आलीं आहेत, त्यांची शक्ति बहुतकरून फारच कमी असल्याचें आढळून आलें आहे.

प्राचीन काळीं ग्रीस व इटली देशांमध्यें लहान लहान नगरसंस्थानांस फार स्वतंत्रता होती; त्याच प्रकारची स्वतंत्रता अलीकडच्या पद्धतिवर सर्व राष्ट्रास देण्याचा इंग्रज लोक बाणा बाळगितात. अमेरिकेंत जें राष्ट्र स्थापन झालें, तेथें लोकांनीं हें वरील स्वतंत्रतेचें तत्वशास्त्र आणि

प्रयोग या दोन्हींमध्यें कायम राखिले; व इंग्लंडपेक्षां पुष्कळपटीनें मोठ्या अशा प्रदेशास हें तत्व लागू करण्यास जे इतर फेरफार करणें अवश्य होते, तेही त्यांनीं मोठ्या युक्तीनें केले. एकंदर परिणाम असा झाला कीं, विस्ताराच्या मानानें हें राष्ट्र हिंदुस्थान आणि रशिया यांच्या वर्गांत येणारें आहे, तरी स्वतंत्रतेच्या मानानें तें अगदीं निराळ्याच वर्गांत येईल. हेजेल* ह्मणून जो मोठा तत्ववेत्ता होऊन गेला, तो असें ह्मणत असे कीं, जगाचा इतिहास ह्मणजे अबाधित मानवी इच्छेची क्रमाक्रमानें होत जाणारी पूर्णावस्था होणें. त्याच्या मताप्रमाणें कांहीं राष्ट्रें अशीं आहेत कीं, त्यांमध्यें एकच मनुष्य स्वतंत्र असतो; दुसरीं अशीं आहेत कीं, कांहीं विशिष्ट व्यक्तींना मात्र स्वतंत्रता असते; व तिसरा एक प्रकार असा आहे कीं, त्यांत पुष्कळ लोक स्वतंत्र असतात. स्वतंत्रतेचें बीज जसजसें कमी जास्त असेल, त्या मानानें उच्च अगर नीच असें आपण राष्ट्राचें वर्गीकरण केलें असतां, पृथ्वीवरील अतिशय मोठीं राष्ट्रें बहुतेक सर्वांच्या खालीं ह्मणजे वरील पहिल्या वर्गांत मोडतील. परंतु युनायटेड् स्टेट्स् हें राष्ट्र शेवटच्या उच्च प्रतीच्या वर्गांत येईल. कारण, त्या ठिकाणीं प्रत्येक व्यक्तिमात्राची अबाधित इच्छा नेहमीं चलन पावत असून जागृत आहे.

हा परिणाम मोठा आहे. हा केवळ मोठाच नाहीं, तर इतर राष्ट्रांपेक्षां इंग्लंडास याचें महत्व फारच मोठें आहे. कारण, इंग्लंडाशीं या राष्ट्राचें नातें असाधारण आहे. इंग्लंड आणि युनायटेड् स्टेट्स् हीं

---

* हेजेल (जार्ज वुइल्हेम फ्रेडरिक)–(१७७०-१८३१) हा प्रख्यात जर्मन तत्ववेत्ता होता. तो बरेच ठिकाणीं प्रोफेसर होता. त्यानें १९ पुस्तकें लिहिलीं आहेत. तीं त्यानें बर्लिन येथें १८३२–४५ पर्यंत छापविलीं. त्याचीं इंग्रजी व फ्रेंच भाषांतरें झालीं आहेत.

जशीं एकमेकांशीं संबद्ध आहेत, तशा प्रकारचीं संबद्ध दुसरीं राष्ट्रें इतिहासांत मिळणें कठिण. दक्षिण अमेरिकेंतील कित्येक राष्ट्रें वरप्रमाणेंच स्पेनपासून उत्पन्न झालीं आहेत, व ब्रेझीलचें राष्ट्र पोर्तुगलपासून झालें आहे, ही गोष्ट खरी; तरी पण त्यांना मोठीं राष्ट्रें असें ह्मणतां येणार नाहीं. शिवाय, त्यांतील लोकसंख्या बहुतेक अमेरिकेंतील मूळ रहिवाशांपासून उत्पन्न झालेली आहे. परंतु युनायटेड् स्टेट्स् इंग्लंडपासूनच उत्पन्न झालें असून, वस्तीही मुख्यत्वें इंग्लिश लोकांचीच आहे. प्रचारांत हीं दोन्ही राष्ट्रें विभक्त आहेत, असें मानण्यास कारण नाहीं. स्पेन आणि पोर्तुगाल यांच्या वसाहती अगदीं विभक्त आहेत. इंग्लंड आणि युनायटेड् स्टेट्स्, ह्या दोहोंचाही विस्तार फार मोठा असल्यामुळें व दोहोंचेंही चलनवलन सर्व ठिकाणीं सारखें दिसून येत असल्यामुळें, दोन्ही राष्ट्रें एकास एक लागून आहेत, अशीं दिसतात; दोहोंचा निकट संबंध असून युनायटेड् स्टेट्स्मध्यें सर्व व्यवहार फारच चमत्कारिक रीतीचे घडून येत असल्यामुळें व नाना तऱ्हेचे नवीन प्रयोग तेथें हमेश चालू असल्यामुळें, त्या सर्वांचें इंग्लिश लोकांवर फारच मोठें वजन पडतें. तसेंच इंग्लंडचेंही वजन पुष्कळ गोष्टींमध्यें व विशेषेंकरून इंग्लंडच्या प्रचंड ग्रंथभांडाराच्या योगानें युनायटेड् स्टेट्स्वर पडतें.

इंग्लिश राष्ट्राच्या दोन शाखांचें जें हें एकमेकांवर इतकें वजन पडलें, तितकें दुसऱ्या कोणत्याही उदाहरणांत पडलेलें नाहीं. सर्व पृथ्वीची बहुतेक भावि स्थिति या विषयावरच पुष्कळ अंशीं अवलंबून आहे. असें आहे तर इतिहासकारांनीं असें दुर्लक्ष अमेरिकेच्या राज्यक्रान्तीकडे केलें, यास काय ह्मणावें ! यावरून एखाद्यास वाटेल कीं, अशा विषयांचें इंग्लंडच्या अगर जगाच्या इतिहासांत काय महत्व आहे, हें सांगण्याचें इतिहासकारांचें कामच नाहीं, असें सांगून थोडक्यांतच

त्यांनीं हा विषय संपविला आहे. वसाहतींवर कर बसविण्याचा इंग्लंडाला हक्क आहे किंवा नाहीं, या प्रश्नाचा ते राज्यतंत्ररीत्या ऊहापोह करीत बसतात. चाथामच्या वक्तृत्वशक्तीचें मोठें दिव्य वर्णन करण्यांतच ते आपलें काम झालें, असें समजतात. मग क्रमाक्रमानें ते लढाईचें वर्णन देऊं लागतात. इंग्रजांचे पराभव झाले असतील त्यांजबद्दल माफी मागतात; जे जय प्राप्त झाले असतील त्यांचें वर्णन अतिशयोक्तीनें करितात. फ्रँक्लीन* विषयींच्या कांहीं चमत्कारीक गोष्टी सांगतात; वॉशिंग्टनच्या गुणदोषांचें विवेचन करितात. इतकें करून मग सर्व विषयाला शेवटची रजा देतात, जणूं हा विषय त्यांस त्रासदायक असून महत्वाचा नाहीं. स्टुअर्ट घराण्यांतील राजांचीं जीं भांडणें

* बेंजामिन् फ्रांक्लिन (१७०६–१७९०) हा अमेरिकेंतील प्रसिद्ध मुत्सद्दी होता. ह्याचा बाप मेणकरी होता व हाही कित्येक दिवस मेणवाती करीत असे. त्यानें स्वातंत्र्य वगैरे विषयांवर एक पुस्तक लिहून प्रसिद्ध ग्रंथकर्ता मांडेविली ह्याची ओळख करून घेतली. १७३० त पुस्तकालय व इतर उपयोगी संस्था त्यानें स्थापिल्या. १७३६ त तो पेन्सिल्व्हानियाच्या जनरल असेंब्लीचा कारकून झाला. १७३८ त त्यानें फायर इन्शुअरन्स काढलें. त्यानें विजेच्या संबंधाचे कांहीं प्रयोग १७४२ त करून त्यांत कांहीं शोध केले. त्याबद्दल त्याला पदव्या मिळाल्या. १७४७ त त्याला जनरल असेंब्लीचा प्रतिनिधी केला. त्यानें लढाऊ जानपद करण्याचें बिल पसार करविलें. १७५७ त त्याजला पेन्सिल्व्हानियाचा एजंट ह्या नात्यानें इंग्लंडास पाठविलें. १७६२ त तो परत आला, पण पुन्हां त्याच हुद्यावर विलायतेस गेला. त्या वेळीं स्टांप आक्टासंबंधानें त्याची जबानी कामन्सच्या सभेंत घेण्यांत आली; त्या वेळीं इंग्लिश मुत्सद्यांनीं त्याला फारच शिव्या दिल्या. त्यानें त्यावरोबर अंगांत कोट होता तो काढून टाकून असा संकल्प केला कीं, अमेरिकेनें स्वातंत्र्य मिळविल्याशिवाय पुन्हां तो घालावयाचा नाहीं. असा निश्चय करून लागलींच तो त्या उद्योगास लागला. १७७५ त तो अमेरिकेंत आला व कांग्रेसचा सभासद झाला. त्यानेंच अमेरिकेचें स्वातंत्र्य प्रसिद्ध करविलें. १७८३ त स्वातंत्र्य स्थापित झाल्यावर त्यास सुप्रीम कौंसिलाचा प्रेसिडेंट केला. तो १७८७ त वाशिंग्टन् व हामिल्टन् ह्यांच्याबरोबर सभेचें काम करीत होता. त्याच्या मृत्यूनें युरोप व अमेरिकेमध्यें सर्वांस हळहळ वाटली. त्यानें आपला स्वतःचा वृत्तांत फार सुरस लिहिला आहे.

प्रजेबरोबर पुष्कळ दिवस चालू होतीं, त्यांतील एखादा क्षुल्लक प्रश्न घेऊन त्याजवर पाहिजे तितकें ते लिहीत बसतील. प्रिन्स् चार्लस् एड्वर्ड* याजला जीं संकटें येत गेलीं, त्यांजवर त्यांच्या पाहिजे तितक्या कल्पना चालतील. जूनिअसच्या† पत्रांचा लेखक कोण होता, याचा तपास करण्यांत त्यांस पाहिजे तितकें कौतुक वाटेल. यांत कांहीं चूक नाहीं काय? इतिहास ह्मणजे काय आहे, हें अद्यापि त्यांस समजायाचें आहे, हें यावरून उघड होत नाहीं काय? त्यांनीं जो इतिहास ह्मणून ह्मटला आहे, तो मुळींच इतिहास नव्हे. त्यास कांहीं तरी दुसरेंच नांव दिलें पाहिजे. कदाचित् चरित्र अथवा पाक्षिक राजतंत्रवर्णन, असें नांव त्यास दिलें असतां साजेल. इतिहास ह्मणजे राज्य करण्याचा कायदा नव्हे; पार्लमेंटांतील वक्तृत्वशक्ति नव्हे; प्रसिद्ध पुरुषांचीं चरित्रें नव्हे; तसेंच इतिहास ह्मणजे नीतिशास्त्रही नव्हे. इतिहासाचें सर्व काम राष्ट्रांशीं; त्यांचा उदय कसा झाला, त्यांची वृद्धावस्था कशी होत गेली; त्यांचें एकमेकांवर किती व कसें वजन पडलें; तीं भरभराटीस

---

* टीप.—* पान ३३ पहा.

† जूनियस हें कोणा इसमाचें नांव नव्हे. ह्या टोपण नांवाखालीं कोणा एकाचीं पत्रें छापलीं जात. तीं पत्रें लिहिनो कोण, कोठें, व तीं वर्तमानपत्राच्या मालकाच्या पत्रांच्या पेटींत येऊन पडत कशीं, ह्याचा कांहींच पत्ता लागला नाहीं. इंग्लंडच्या तिसऱ्या जार्जच्या अमदानींत जेव्हां टौनशेंड वगैरे मुत्सद्यांनीं आपल्या मूर्खपणानें अमेरिकेंत अस्वास्थ्य वाढविलें, तेव्हां ह्या 'जूनियस' सही करणाऱ्या इसमानें राजा, प्रधानादि सर्वांवर फारच तीव्र शस्त्र धरलें. त्याची भाषाशैली उत्तम होती, ग्राहकशक्ति त्याच्या लेखांत फार होती. त्यानें सरकारचे दोष जेवढे ह्मणून होते तेवढे लोकांपुढें स्पष्ट करून ठेवले. तें प्रधानमंडळ मोडून पुढें दुसरें झालें. हा जूनियस ह्मणजे सर फिलिप् फ्रान्सिस असावा, असें सर्वांनीं ठरविलें आहे. हा फ्रान्सिस पुढें वारन हेस्टिंग्स गव्हर्नर जनरल असतां त्याच्या कौन्सिलांत सभासद होता. त्यानें हेस्टिंग्सला फारच छळिलें, आणि पुढें हेस्टिंग्सवर जेव्हां खटला चालला, तेव्हां हेस्टिंग्सचीं सर्व व्यंगें बाहेर काढून दाखविण्यांत हा पुढारी होता.

येण्याचीं अगर ऱ्हास पावण्याचीं कारणें काय, वगैरे शोध करणें, हेंच काम इतिहासाचें आहे.

प्रस्तुत इंग्लिश राष्ट्रविस्ताराच्या इतिहासांत अमेरिकेंतील राज्य-क्रान्तीचें वर्णन वरील सर्व प्रकारचें न करितां एकाच प्रकारचें कर्तव्य आहे. राष्ट्रविस्तार करण्याचा जो प्रयोग इंग्रज लोकांनीं केला त्या प्रयोगाची समाप्ति इतकेंच समजून, या ठिकाणीं आह्मांस त्या गोष्टीचें विवेचन कर्तव्य आहे. बुडबुड्याप्रमाणें इंग्लंडचा विस्तार व लय दोन्ही फार जलदी झाले. यानंतर पुन्हा हल्लीं विस्तार होऊं लागला आहे. याचा परिणाम पुन्हां पूर्वीसारखा होऊं न देणें, हें इंग्रजांचे स्वाधीन आहे काय ?

प्रत्येक वसाहत परिपूर्ण दशेस आली ह्मणजे तींतील लोक स्वतंत्र व्हावयाचेच, असा नियम आहे व हा नियम कधीं चुकत नाहीं. या नियमाचाच परिणाम युनायटेड् स्टेट्सूचें स्वतंत्र होणें हा होय. ही गोष्ट निर्विवाद आहे, असें कित्येक ह्मणतात. ही गोष्ट घडत असतां जॉर्ज ग्रेन्व्हील, चार्लस् टाउनशेंड आणि लॉर्ड नॉर्थ हे मुख्य मंत्री तिसऱ्या जार्जाचे होते; ह्मणून युनायटेड् स्टेट्स् स्वतंत्र होण्यांत वरील नियमान्वयें ह्या मंत्र्यांची चूक फार तर एवढीच कीं, जी गोष्ट केव्हां तरी घडलीच असती, ती त्यांनीं आपल्या कृत्यांनीं थोडीशी लवकर घडवून आणिली, असें प्रतिपादन केलें जातें. आतां या ह्मणण्याच्या निरसनार्थ एवढा वेळ जें आह्मीं सांगितलें आहे, त्यापेक्षां फारसें जास्त कांहीं सांगण्याची जरूर नाहीं. वसाहत ह्मणजे एक प्रकारची मालमत्ता, तिच्यापासून मूळ देशास पैशाचें मुख्य उत्पन्न व्हावयाचें, असा जोंपर्यंत मूळ देशाचा ग्रह असेल, तोंपर्यंत वसाहतींतले लोक फार नाखूष असावयाचे; संधि सांपडेल तेव्हां ते स्वतंत्र होण्याचा प्रयत्न

करतील. मुलगा मोठा झाला ह्मणजे बापापासून विभक्त व्हावयाचाच, हें उदाहरण वसाहतीस लागूं पडण्यासारखें नाहीं. वर जो नुकताच वसाहतीचा अर्थ सांगितला, त्याप्रमाणें पाहिलें असतां मूळ देशाची वसाहतीशी वर्तणूक आईची मुलाशीं असते त्याप्रमाणें नसून, धन्याची गुलामाशीं असते, तशी आहे. ज्याप्रमाणें गुलाम धन्याच्या कबज्यांतून सुटण्याचा प्रयत्न करील, त्याचप्रमाणें अशा प्रकारच्या वसाहतींतले लोक करितील, व मुलगा विभक्त होतो तशी स्थिति होणार नाहीं. कारण, वसाहतीशीं आरंभापासून फार कडक वर्तन मूळ देशाचें असतें. यावरून अमेरिकेंतील वसाहतीचें स्वतंत्र होणें कदाचित् अनिवार्य असेल, परंतु असें असण्याचें कारण त्या वेळच्या पद्धतीप्रमाणें वसाहतीशीं मूळ देशाचें कडक वर्तन, हेंच होय.

ही वसाहतीची पद्धत बदलून तिच्या ठिकाणीं दुसरी स्थापन करणें, त्या वेळीं शक्य नव्हतें. तरी तिजपेक्षां चांगली अशी पद्धत शक्य असून हल्लीं ती चालू आहे. कांहीं वर्षें एके ठिकाणीं राहिल्यावर पुढें वसाहती स्वतंत्र झाल्याच पाहिजेत, असें मानण्यास हल्लीं कांहीं कारण नाहीं, इतकेंच नाहीं, तर त्या वेळीं खरोखरी चालत असलेला प्रघात त्या वेळच्या लौकिक ग्रहाहून भिन्न होता. इंग्रज लोकांचा अंमल नको ह्मणून युनायटेड् स्टेट्स् स्वतंत्र झालीं, असें नाहीं. तर तिसऱ्या जॉर्ज राजाची पहिल्या वीस वर्षांची वसाहतींवर अंमल करण्याची जी पद्धत होती, ती त्यांना आवडली नाहीं. इंग्लंडांतील इतर राज्यप्रकरणांत सुद्धां ह्या वीस वर्षांचा कारभार कांहीं निराळाच समजला जात आहे. त्या वेळच्या राज्यसूत्रकारांची दृष्टि विशाल नसून, संकोचित होती व हेकेखोरपणा त्यांच्यांत विशेष दिसून येत होता. इंग्लंडांत व वसाहतींत

दोहोंकडेही लोक असंतुष्ट होते. मान्स्फील्ड* यानें 'लोकांची स्वतंत्रता' या शब्दांस नवीनच एक अर्थ दिला होता. तो सर्व पोकळ शब्दांचा असून त्यांत खरे हक्क प्रजेस कांहीं मिळत नव्हते. नेहमींची इंग्रजी अंमलाची व्यवस्था सोडून देऊन राज्यकर्त्यांनीं नवीन फेरफार केला, त्याचे योगानें सर्व लोक नाखूष झाले व त्याच योगानें इंग्लंडांत विल्कीस्† याचीं व अमेरिकेंत वसाहतींचीं बंडें‡ एकाच वेळीं झालीं. मासाच्युसेट्स् आणि व्हर्जिनिया येथील लोक नाखुष झाले तर त्यांस बंड करून स्वतंत्र होण्याचा मार्ग खुला होता, परंतु इंग्लंड येथें राहणाऱ्या लोकांस कांहीं उपाय नव्हता. ज्या सरकारानें त्यांस त्रास दिला, त्याच्याविरुद्ध उठण्याचें त्यांस सामर्थ्य नव्हतें.

यावरून असें दिसतें कीं, इंग्रजांच्या वसाहतींतील लोकांनीं बंडें केलीं त्याचें कारण ते वसाहतींत होते ह्मणून नव्हे, तर वसाहतींवर अंमल करण्याची त्या वेळची पद्धत दुष्ट होती, हें होय. त्या विशिष्ट काळाचे मुत्सद्दी जसे संकोचित दृष्टीचे व हट्टी होते, तसे पूर्वीं कधीं नव्हते. ह्मणून ह्या वसाहतींच्या उदाहरणावरून एखादा साधारण नियम बांधणें रास्त होणार नाहीं. कारण, त्या वसाहती साधारण प्रकारच्या नसून विशिष्ट प्रकारच्या होत्या.

---

* मान्स्फील्ड्, वुइल्यम मरे—(१७०४–१७९३)–हा हुशार वकील होता. ह्याचें वाक्चातुर्य फारच होतें. १७५६ त त्याला जज्जाची जागा मिळाली. ज्यूनिअसचीं पत्रें "पब्लिक् अड्व्हर्टाइझर" नामक पत्रांत छापिलीं जात. त्या पत्राचा मालक व प्रसिद्धकर्ता ह्याच्या खटल्याच्या व वुइल्कस्च्या खटल्याच्या निकालामुळें तो लोकांस आवडेनासा झाला. १७८० च्या दंग्यांत लोकांनीं त्याचें घर जाळलें. त्यांत पुष्कळ मौल्यवान् लेख जळून गेले. त्याला अर्ल ही पदवी दिली होती. तो विद्वान् होता.

† टीप.—† पान ३० पहा.

‡ टीप.—‡ पान ५७ पहा.

वसाहतींचा हल्लींचा अर्थ असा आहे कीं, एका जातीचे लोकांनीं दुसऱ्या ठिकाणीं जाऊन वस्ती करून राहणें. एखाद्या देशांत वस्ती फार दाट झाली व लोक फार निर्धन झाले, तर ज्या दुसऱ्या ठिकाणीं सधनता असून रिकामी जागा विपुल असेल, त्या ठिकाणीं ते लोक जाऊन राहतात. इंग्रजांच्या अमेरिकेंतील वसाहती या प्रकारच्या नव्हत्या, हें वर सांगण्यांत आलेंच आहे. इंग्लंडांत त्या वेळीं वस्ती दाट झाली नव्हती. तसेंच उत्तर अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्यावर इंग्रज लोक जाऊन राहिले, म्हणून तो प्रदेश फारसा सुपीक होता, असेंही नाहीं. एल्डो रेडो,* पोटोसी† वगैरे प्रांतांसारखा हा मुलुख नव्हता. उत्तरेकडील बाजूस तर तो अगदीं भिकार होता. तर मग त्या ठिकाणीं लोक कां जाऊन राहिले? असें करण्यांत त्यांचा एक विशेष हेतु होता. इस्त्रलाइट्झ्‡ लोकांनीं स्वदेशत्याग करण्यांत जो हेतु फारोचा होता म्हणून मोझेस यानें सांगितलें तोच हेतु यांचाही होता. ' आपल्या परमेश्वराची पूजा करण्याकरितां सात दिवस प्रवास करून दूर जंगलांत आम्हांस गेलेंच पाहिजे ' असें ते म्हणत. तर अमेरिकेंत जाऊन राहण्यास त्यांस त्यांचा धर्म कारण झाला. धर्मसंबंधीं मतांचा व कृत्यांचा इंग्लंडांत छळ होत होता. तीं मतें न सोडण्याकरितांच लोक इंग्लंड सोडून बाहेर पडले. व्हर्जिनिया येथील लोक इंग्लंडांत चालू असलेल्या धर्माचेच होते, तरी न्यू इंग्लंड नांवाच्या

---

* एल्डो रेडो—युनायटेड् स्टेट्स्मध्यें उत्तर कालिफोर्नियांत एक प्रांत आहे. त्याची राजधानी कालोमा आहे. तेथें सोनें व दुसरे खनिज पदार्थ विपुल आहेत.

† पोटोसी—दक्षिण अमेरिकेंत बोलिव्हिया प्रांताची राजधानी आहे. सान लुई पोटासी म्हणून उत्तर अमेरिकेंत सुद्धां मेक्सिकोची राजधानी आहे. तेथें प्रजासत्ताक राज्य आहे.

‡ हे लोक धर्मछळ झाल्यामुळें बेतागून परदेशांत जाऊन राहिले होते, अशी कथा आहे.

वसाहतींतले लोक प्युरिटन धर्माचे होते, पेन्सिल्व्हेनियांतील क्वेकर धर्माचे व मेरिलंड येथील क्याथोलिक धर्माचे होते. दक्षिण कारोलिना येथें जी व्यवस्था होती तिचें वर्णन हिल्ड्रेथ* यानें आपल्या पुस्तकांत केलें आहे. तो ह्मणतो कीं, एकंदर रहिवासी लोकांपैकीं कोणता तरी धर्म असलेले लोक एक–तृतीयांशावर नव्हते. बाकीच्यांस मुळींच धर्म नव्हता. सर्व प्रकारचे पाद्री लोक व उपदेशक पाहिजे त्या युक्त्यांनीं नाना तऱ्हेचीं निरनिराळीं मतें लोकांस शिकवीत असत. ह्मणून त्या वेळीं इंग्लंडांतून देशत्याग करून अमेरिकेंत जाण्याचें कारण, धर्मसंबंध आहे. हाच कायतो मुख्य भेद इंग्रजांच्या व इतर वसाहतींत होता. जो मनुष्य केवळ द्रव्यार्जनाच्याच हेतूनें देशत्याग करून जातो, तो बहुतकरून आपली जन्मभूमि विसरत नाहीं. फार दिवस दूर राहिल्यानें त्याच्या मनांत जन्मभूमीच्या वरचेवर कल्पना येऊन, त्याला ती जास्तच आवडत जाते. पैसा मिळतांच असे मनुष्य लागलेच परत आल्याशिवाय राहणार नाहींत. जन्मभूमींतच आपल्यास मरण यावें, असें त्यांस फार वाटत असतें. असे विचार मनांत येण्यास, धर्माशिवाय बहुतकरून दुसरें प्रतिबंधक कारण सांपडणें नाहीं. परदेशांत गेल्यानें पूर्वीचा देशत्याग होणें धर्माचे सबबीवरच शक्य आहे. ट्रॉय शहर सोडून आपले देव बरोबर घेऊन जे ग्रीक लोक बाहेर पडले, त्यांस पुन्हा परत जाणें रुचलें नाहीं. धर्मच्छलानें दूषित नसलेल्या ठिकाणीं सुरक्षितपणें लाव्हिनियम† किंवा आल्बा† किंवा रोम† अशा प्रकारचीं नवीन शहरें बांधण्यास त्यांस अडचण पडली नाहीं. आमचें असें मत आहे कीं, राष्ट्रोत्पत्तीचें धर्म हें एक मुख्य कारण आहे. धर्मच राष्ट्राचें जीवित होय. अमेरिकेंतील वसा-

---

* अमेरिकेंतला एक ग्रंथकार.

† हीं इटली देशांत पुरातन काळीं स्थापन झालेलीं शहरें आहेत.

हती करणारांस नवीन राष्ट्र स्थापन करतां आलें. कारण, त्यांचा धर्म भिन्न होता. ज्या ठिकाणीं धर्मभेद आहे त्या ठिकाणीं कालांतरानें राष्ट्र-भेद होणारच. जर एखादें राष्ट्र धर्मभेदामुळें स्थापन झालें असलें, तर आह्मी असेंच समजतों कीं, तें फार दिवस टिकणार नाहीं.

हाच अमेरिकेंतील इंग्लिश वसाहतींचा विशेष भेद होय. याच योगानें त्यांचें स्वरूप विशिष्ट झालें होतें. तर याजपासून सर्व वसाहतींस लागू होणारा साधारण नियम बांधणें ह्मणजे केवळ धाडसच आहे. बरें, त्या काळानंतरच्या ज्या हल्लीं अमेरिकेंत इंग्लंडाच्या नवीन वसाहती झाल्या आहेत, त्यांचाही परिणाम पहिल्यासारखाच होईल असें ह्मणणें किती अप्रयोजक आहे बरें? अमेरिकेमध्यें आरंभापासून लोकांची फाटाफूट करण्याचें तत्व कायम होतें. त्यामुळें सर्वांत एक कट होऊन नवीनच राष्ट्र बनविण्यास त्यांस उत्तेजन आलें. हें कारण अगदीं पूर्वींपासून इंग्लंडच्या संबंधानें कायम होतें, हें वर सांगण्यांत आलेंच आहे. तरी सर्व इंग्लंडच्या वसाहतींस तेंच कारण होतें असें नाहीं. व्हर्जिनिया स्थापन होण्यास हें कारण नव्हतें. परंतु ग्रेनव्हिल आणि लॉर्ड नॉर्थ यांच्या जुलुमी अमलानें जेव्हां जिकडे तिकडे असंतोष झाला, तेव्हांच व्हर्जिनियातील लोक इतर वसाहत करणारांस जाऊन मिळाले, व तेथें गेलेल्या यात्रेकरू पाद्री लोकांनीं सर्वांचें मिळून नवीनच राष्ट्र बनविण्यास लोकांचीं मनें वळविलीं.

परंतु हल्लींच्या दुसऱ्या वसाहतींस हें कारण मुळींच लागू नाहीं. त्या धर्मसंबंधानें देशत्याग होऊन उत्पन्न झालेल्या नाहींत. ज्यांनीं त्या स्थापन केल्या, त्यांनीं आपल्याबरोबर आपले देव नेले नाहींत; उलट ऐहिक सुखाच्या सोयीकरितां त्यांनीं दूर देशाचा अरण्यवास पत्करिला आहे. कारण, अशा ठिकाणीं राहण्याची ठरींव पद्धत अगर ठरींव

नियम मुळींच नसून, केवळ द्रव्यार्जन झाल्यानेंच ते तृप्त असणारे आहेत. जर अशा स्थितींत या लोकांस निराळें राष्ट्र स्थापन करण्याची स्फूर्ति झाली; ज्या ठिकाणीं त्यांचे वाडवडील हजारों वर्षें राहिले, त्या इंग्लंडच्या इतिहासाशीं, तेथील पुराणाशीं व तेथील इतर सर्व व्यवहारांशीं, आपला संबंध एकदम तोडून टाकावा, असें जर या अलीकडच्या वसाहती करणाऱ्यांच्या मनांत आलें; तर आपण असेंच ह्मटलें पाहिजे कीं, इंग्लंड हें केवळ पोकळ नांव असून लोकांचे ठायीं परस्परप्रीति उत्पन्न करणारें बीज त्यांत मुळींच नाहीं.

सर्व प्रकारच्या वसाहती—केवळ धर्मसंबंधानें जुलूम होऊन वाईट पद्धतीवर स्थापन झालेल्या तेवढ्याच नव्हत—ऊर्जित दशेस येतांच, झाडावरून फळ पिकल्यावर तुटून पडतें, तशा मूळ देशापासून स्वतंत्र व्हावयाच्याच, असा जेव्हां आपण नियम बांधितों, तेव्हां अमेरिकेंतील वसाहतींचा खरा प्रकार आपल्यास समजला नाहीं, असेंच ह्मटलें पाहिजे. तसेंच अमेरिकेंतील वसाहती स्वतंत्र झाल्यावर जी त्यांस भरभराटी प्राप्त झाली आहे, तिजपासून खरा तर्क न बांधतां खोटाच कांहीं तर्क बांधण्याचा प्रचात आहे. आह्मांस असें वाटतें कीं, युनायटेड् स्टेट्स्मध्यें लोकांस जितकें सुख प्राप्त होत आहे, निदान तेथील लोकांस सुख जितकें नीतीच्या मार्गानें मिळत आहे, तितकें पूर्वीं कधीं कोणत्याही राष्ट्रास प्राप्त झालें नसेल. परंतु असें होण्याचें कारण राजकीय नव्हे. त्या देशांत जी राजकीय व्यवस्था आहे, तिच्यापेक्षांही वरील सुखांचीं कारणें जास्त दृढ आहेत. एखाद्या राष्ट्रांत फक्त सुखोद्रेक उत्पन्न करण्यास काय उपाय करावा, असें एखाद्या तत्ववेत्त्यास विचारलें तर तो सांगेल कीं, 'पुष्कळ वर्षेंपर्यंत योग्य स्वतंत्रतेचा उपभोग घेऊन, उत्तम धर्मसंस्कार होऊन, व सतत कठिण श्रम करून, ज्यांचीं अंतःकरणें चांगलीं दृढ झालीं आहेत,

अशा प्रकारचे कांहीं लोक घ्या; अशा लोकांस मोकळ्या मुलुखांत राहण्यास जाऊं द्या; त्या ठिकाणीं त्यांस त्रास होण्याजोगा त्यांजवर कोणताही जुलूम नसूं द्या, व तेथें सधनता त्यांचे आटोक्यांतली असूं द्या. दरिद्रता ही शहाणपण व सामर्थ्य उत्पन्न करिते खरी; पण आपल्या भक्तांस ती हे गुण उत्पन्न करितांना कष्ट देते. लक्ष्मी सुख उत्पन्न करिते, पण ती आपल्या भक्तांत दुर्वर्तन उत्पन्न करिते. ह्मणून प्रथम गरीबी असून पुढें कांहीं दिवसांनीं लोक सधन होणें, हाच सुखाचा उत्तम उपाय होय. कारण, त्याचे योगानें सुख होऊन नीतिमत्ताही कमी होत नाहीं. त्यांतही आणखी असें पाहिजे कीं, सधनता प्राप्त होणें ती फार सोप्या उपायांनीं झालेली नसावी, ह्मणजे ती मिळविण्यास श्रम पडलेले असावे. तसेंच एकदां मिळाल्यावर ती चिरकाळ तशीच टिकेल असें लोकांस वाटतां नये'. अशा प्रकारचें उत्तर तो तत्ववेत्ता देईल. याच उपायांनीं अमेरिकेंतील लोकांस सुखप्राप्ति झाली. समशीतोष्ण कटिबंधांत राहून त्यांचे दिवस गेले. युरोपियन राष्ट्रांस जी स्वतंत्रता होती, तीच त्यांस मिळत गेली. प्रॉटेस्टंट्सारखा निर्मळ धर्म त्यांचा प्यारा होता. सधनता बिनहरकत प्राप्त झाली, तरी ती केवळ मोजकी होती; तसेंच ती नुसते आंगचे श्रमांनीं मिळाली नसून, ती मिळविण्यास बुद्धीचा व कल्पनाशक्तीचा लोकांस चांगला खर्च करावा लागला.

या उपायांनीं सुख प्राप्त होईल खरें, तरी तें फार वेळ टिकणार नाहीं. जोंपर्यंत देशविस्ताराच्या मानानें लोकसंख्या बरीच कमी आहे, तोंपर्यंत लोकांस सुख मिळेल. कांहीं वेळपर्यंत लोकांस असें वाटलें होतें कीं, अमेरिकेंमध्यें कांहीं गुप्त जादू आहे, ह्मणून युरोपांत होणारे उपद्रव अमेरिकेंतील लोकांस होत नाहींत. ही जादू नाहीं. ही उघड गोष्ट आहे. जीवितास सुख मिळण्याचीं जीं साधनें जरूर आहेत, तीं

अमेरिकेंत होतीं. तसेंच वसाहती करणारांचें वर्तनही न्यायदृष्ट्या शुद्ध होतें. अलीकडे ही स्थिति बदलत चालली आहे. आपला देश युरोपांतल्यासारख्या अन्यायांनीं आणि मूर्खपणानें कधीं दूषित होणार नाहीं, असें अमेरिकेंतील लोकांस पुष्कळ दिवस वाटत होतें, तें हळू हळू त्यांस स्वप्नवत् वाटूं लागलें आहे. त्यांना कोणीही शत्रू नाहींत, तरी त्यांस एक मोठी लढाई* करणें भाग पडलें. मिस्तर वेल्स् असें ह्मणतो कीं, या लढाईचे योगानें चार वर्षांमध्यें दहा लक्ष लोक मारले गेले, आणि सुमारें दोन अब्ज पाउन्ड्स् नक्की खर्च आला. त्यांच्यांत राजे नव्हते, तरी राजहत्या झाल्या. इतकें होऊनही युनायटेड् स्टेट्स्ची कीर्ति आणि मोठेपणा पूर्वींच्यापेक्षांही हल्लीं कदाचित् जास्त आहेत. अमेरिकेंतील लोक असा बाणा बाळगीत असत कीं, आपल्यासारखें विशिष्ट राष्ट्र दुसरें कोणतेंही नाहीं. युरोपांतील राष्ट्रें शक्तीची बढाई मारतात, पाहिजे तसा जबरीचा अंमल करितात, मोठमोठ्या लढाया करितात, व कर्जेंही फार करून घेतात, ह्मणून त्यांची व्यवस्था अगदीं चुकीची आहे. हें आपल्या उदाहरणावरून लोकांस व्यक्त करून दाखविण्याचा ते बाणा बाळगीत. सद्गुण व सुख यांची सांगड असून त्या सांगडीस डौलाची गरज नसते. राष्ट्र चांगलें होणें ह्मणजे त्याचा इतिहास फार लांब व मोठा असणें, हें नाहीं, तर मुळींच इतिहास नसणें, हें होय. अशा प्रकारच्या अमेरिकेंतील लोकांच्या कल्पना आरंभीं होत्या. परंतु असा बाणा बाळगणें निष्फळ आहे. त्यांस न समजतां त्यांच्या वर्तनांत फेर पडला

* युनायटेड् स्टेट्स्चें युद्ध.—इ. स. १८६१ त गुलामांच्या प्रश्नावरून उत्तर व दक्षिण संस्थानांमध्यें फाटाफूट होऊं लागली. दक्षिण कांग्रेस स्थापन होऊन त्यांनीं वाशिंग्टन येथील कांग्रेसच्याविरुद्ध लढाई सुरू करण्याचें प्रसिद्ध केलें. ह्या लढाईत दक्षिण कांग्रेसचा पुरा मोड झाला, व ती १८६५ त संपली. दक्षिण कांग्रेसला माफी मिळाली.

आहे. युनायटेड् स्टेट्स्इतकें शक्तिमान दुसरें राष्ट्र नाहीं, व सर्व जगावर एकचक्री अंमल करणारें असें हेंच राष्ट्र होईल, असें मानलें जातें. सारांश, स्थितिवैलक्षण्यामुळें राष्ट्रवर्गीकरणाचे वेळीं या राष्ट्रास कोणत्याच वर्गांत पूर्वीं जागा मिळत नसे, ह्मणजे इतकें तें उच्च मानलें जात असे. परंतु हल्लीं जरी यास प्रथम पद दिलें जातें, तरी तें कोणत्यातरी वर्गांत मोडूं लागलें आहे, ह्मणजे इतकें हें राष्ट्र पूर्वीपेक्षां हल्लीं खालीं आलें आहे, असें समजावयाचें.

युनायटेड् स्टेट्स् या राष्ट्रचें सुख त्याच्या स्वतंत्रतेचा परिणाम नव्हे, हें यावरून उघड होतें. बरें, त्या राष्ट्राचा मोठेपणा तरी स्वतंत्रतेपासून उत्पन्न झाला आहे किंवा नाहीं, हें आतां पाहूं.

अमेरिकेंतील लोकांचा उदय कसकसा होत गेला, याचा शोध करूं लागलें ह्मणजे लागलेंच असें दिसून येतें कीं, पुष्कळ गोष्टी अमेरिकेस विलक्षण अनुकूळ झाल्या. जे लोक मूळ वसाहती करण्याकरितां प्रथमतः अमेरिकेंत गेले, ते किनाऱ्यावर सर्व एके ठिकाणीं न राहतां जिकडे रस्ता सांपडला तिकडे पसरत गेले असते, व एकमेकांच्यामध्यें इतर युरोपीय राष्ट्रांच्या वसाहती झाल्या असत्या, तर सर्वांची एकी होणें पुढें अशक्यच झालें असतें. असें झालें नाहीं, हें केवळ त्यांचें सुदैव आहे. तसेंच फ्रेंचांची लुशियाना येथील वसाहत स्थापन झाल्यापासून फ्रेंच राज्यक्रान्तीपर्यंत शंभर वर्षांत ती वसाहत हळू हळू वाढत गेली असती, व जसा पुढें तिचा लय होत गेला, तसा झाला नसता, तर पुढें ती एक प्रचंड फ्रेंच राष्ट्रच होऊन राहिली असती. कारण, मिसिसिपी नदीच्या कांठचा उत्कृष्ट प्रदेश तींत मोडत होता, ह्मणून मोठ्या नदीच्या योगानें सर्व राष्ट्र एकत्र राहिलें असतें. कदाचित् समजा कीं, तें इंग्लंडचेही ताब्यांत आलें असतें. तरी तें युनायटेड् स्टेट्समध्यें मोडलें गेलें नसतें. नेपोलि-

यन यानें लुसियाना प्रांत युनायटेड् स्टेट्ला विकला ह्मणूनच या सर्व राष्ट्राची आज जी प्रचंड शक्ति आपण पाहतों, ती त्यास प्राप्त जाहली.

वसाहती करण्याच्या पद्धतींत जी चुकी होती, ती युरोपांतील पांचही राष्ट्रांस काढून टाकतां आली नाहीं. ती चुकी न होऊं देण्याविषयीं युनायटेड् स्टेट्स् या राष्ट्रानें स्वतःचा विस्तार करतांना चांगली खबरदारी ठेविली. प्रथम या पांच युरोपीय राष्ट्रांच्या मनांत फक्त आपला मुलूख वाढविण्याचें होतें. परंतु लागलाच त्यांचा हा उद्देश बदलून जाऊन त्यांस निराळीच तऱ्हा प्राप्त झाली. आह्मीं प्रथम वर्णन केलेली वसाहतींची पद्धत या राष्ट्रांनीं प्रचारांत आणिली. वसाहती ह्मणजे सार्वजनिक मालमत्ता; त्यांच्यापासून जो फायदा होईल तो मूळ देशास मिळावयाचा, असें हीं राष्ट्रें मानूं लागलीं. परंतु असें मानण्यांत एक भीति होती, ती अशी. वसाहतींचा फायदा तेथील लोकांस न मिळतां मूळ राष्ट्रांस मिळूं लागणें, हें वसाहतींस सहन होण्यासारखें नाहीं. या व आणखी इतर कारणांनीं एकामागून एक अशीं सर्व राष्ट्रें मोडत गेलीं. इंग्लंडचें प्रथमचें राष्ट्र असेंच मोडलें. परंतु तेव्हांपासून पुन्हां दुसरा पुष्कळ मुलूख इंग्रजांचे ताब्यांत आला आहे. या मुलुखाची व्यवस्था करतांना पूर्वीची चुकी पुन्हां न होण्याविषयीं इंग्रज लोक चांगली खबरदारी घेत आहेत. परंतु तिच्या ठिकाणीं स्पष्ट अशी दुसरी पद्धत विचारपूर्वक अद्यापि स्थापन झाली नाहीं. चुकीची कल्पना टाकून दिली आहे, तरी तिच्या ठिकाणीं बिनचुकीची कल्पना अद्यापि स्वीकारली गेली नाहीं. ती खरी कल्पना एकच आहे. जर वसाहती इंग्लंडची मालमत्ता होऊं शकत नाहीं, तर त्या इंग्लंडचाच एक भाग, असें समजलें पाहिजे. हें तत्व इंग्रज लोकांनीं लवकर स्वीकारावें. इंग्लंड ह्मणजे एक लहानसें बेट युरोपाच्या वायव्य

किनाऱ्यावर आहे. त्याचें क्षेत्रफळ १,२०,००० चौरस मैल आहे, आणि त्याची लोकसंख्या तीन कोटी आहे, असें आतां इंग्रजांनीं यापुढें मानतां नये. इंग्लंड सोडून पर देशांत गेलेले लोक इंग्लंडला मुकले, असें त्यांनीं समजतां नये. इंग्लंडचा इतिहास ह्मणजे वेस्टमिंस्टर येथें बसणाऱ्या पार्लमेंटचा इतिहास. ज्या विषयांची चर्चा या पार्लमेंटांत होत नाहीं, ते विषय इंग्लंडचे इतिहासांत यावयाचे नाहींत, असें आतां त्यांनीं समजूं नये. सर्व राष्ट्र एकदम डोळ्यासमोर आणून सर्वांस मिळून इंग्लंड हें एकच नांव दिलें ह्मणजे हेंही राष्ट्र युनायटेड् स्टेट्स्प्रमाणेंच दृढ होईल. अशा राष्ट्रांतील लोकसुद्धां सजातीय, एक भाषा बोलणारे, एक धर्म पाळणारे, एकच कायद्यानें राहणारे आहेत, असें दिसून येईल. हल्लीं हें राष्ट्र जरी न्यायदेवतेच्या मजबूद बंधनांनीं एकत्र बांधलें गेलें आहे, तरी त्या बंधनांस जोराचा धक्का बसला असतां तीं तुटूं नयेत, अशा प्रकारची व्यवस्था अद्यापि झालेली नाहीं. परंतु जर कोणास असें वाटेल कीं, हल्लींचे एकमेकांपासून इतक्या दूर अंतरावर असणारे मुलूख एका अमलाखालीं एकत्र राहण्याजोगी कोणतीच व्यवस्था करणें शक्य नाहीं, तर मात्र त्यानें अमेरिकेंतील युनायटेड् स्टेट्स्चा इतिहास पहावा. त्यांच्यांत आपणांस पाहिजे तशी व्यवस्था हल्लीं चालत आहे. इंग्लंडास जी अडचण भासत आहे, ती त्यांस भासत नाहीं. त्यांनीं ह्या अडचणीचें निराकरण सुरेख रीतीनें केलें आहे. प्राचीन काळापेक्षांही मोठमोठे भिन्न भिन्न प्रदेश एकत्र एका अमलाखालीं हल्लींसुद्धां राहूं शकतील; हें ह्या लोकांनीं आपल्या स्वतःच्या उदाहरणानें सर्वांस व्यक्त करून दाखविलें आहे. आह्मी ह्मणतों, या व्यवस्थेंत ह्मणजे बिलकुल अडचणी नाहींत, असें नाहीं. अडचणी पुष्कळ आहेत, परंतु यांपैकीं अतिशय मोठी अडचण आह्मी आपण होऊन करून घेतों,

ती ही कीं, निरनिराळे प्रदेश एकत्र राहणें अशक्य आहे, असें मानून आह्मी चालतों. ही गोष्ट पूर्वी कधीं झाली नाहीं, व पुढें कधीं व्हावयाची नाहीं, असाच आमचा ग्रह आहे. उघड आहे कीं, अमेरिकेंतील राज्यक्रान्तीचा इतिहास स्पष्टपणें या लोकांस समजलेला नाहीं.

या राज्यक्रान्तीपासून लोक असा तर्क करितात कीं, कोणत्याही वसाहती दूर अंतरावर असल्या ह्मणजे केव्हां नाहीं केव्हां तरी मूळ देशापासून स्वतंत्र व्हावयाच्या. हा तर्क चुकीचा आहे. खरा तर्क असा असला पाहिजे कीं, पूर्वापार चालत आलेली व्यवस्था न बदलतां ती कायम ठेविली, तरच वसाहती स्वतंत्र होतील.

एका देशांतून कांहीं लोक महासागराच्या पलीकडच्या बाजूस जाऊन राहिले, ह्मणजे पूर्वीच्या लोकांपासून विभक्त व्हावयाचे; त्यांस नवीन कामें करावीं लागल्यामुळें नवीन स्वतंत्र राष्ट्र स्थापन करण्याचीं साधनें त्यांस प्राप्त होतात, असें मानणें बरोबर नाहीं. धर्माचीं मतें कायम राखण्याकरितां ज्या लोकांस निरुपायास्तव देशत्याग करून महासागराचे पलीकडे जाऊन रहावें लागेल, व ज्या लोकांचीं धर्मसंबंधीं मतें फार कडक असतील, ते मात्र स्वतंत्र राष्ट्र स्थापन करतील. हेंच आमचें ह्मणणें इतर उदाहरणांवरूनही दृढ होत आहे. दक्षिण आणि मध्य अमेरिकेंत स्पेन आणि पोर्तुगल यांच्या वसाहती होत्या, त्याही स्वतंत्र झाल्या आहेत. त्या ठिकाणीं मुळ देशाचा व तेथील लोकांचा त्याग करून जाणाऱ्यांचा धर्म एकच ह्मणजे क्याथोलिक होता, असें मानलें जातें. तरी पण जर्व्हायनस्* याचें ह्मणणें असें आहे कीं, अमेरिकेंत वसाहतींकरितां गेलेले स्पेन व पोर्तुगाल देशचे लोक जेझुइट्† धर्माचे होते. या जेझुइट् लोकांस नाहींसे करण्याचे जे प्रयत्न करण्यांत

* हा एक प्रसिद्ध जर्मन इतिहासकार आहे.

† जेझुइट् ही ख्रिस्ती धर्माची इतरांपासून भिन्न अशी एक शाखा आहे. त्यांत लष्करी बाणा पुष्कळ आहे.

आल, त्याजमुळें त्या लोकांचीं मनें खवळलीं, व हेंच ते स्वतंत्र होण्यास मुख्य कारण होय. असें तो विद्वान ग्रंथकार मानतो.

युनायटेड् स्टेट्स् स्वतंत्र जाहल्यापासून तीं इतकी वृद्धि पावलीं आहेत, यावरून आणखी एक असें आपण समजलें पाहिजे कीं, राष्ट्रें विभक्त होऊन त्यांचे निरनिराळे भाग होणें, ही गोष्ट नैसर्गिक नसून केवळ सोईची आहे. युनायटेड् स्टेट्स् जर इतकीं भरभराटीस आलीं, तर एखादें राष्ट्र अतोनात वृद्धि पावूनही भरभराटीस येण्याला हरकत नाहीं. असंख्य प्रांत दृढतम एकत्र बांधले जाऊन, हल्लींच्या इंग्लिश महाराष्ट्रांत भासत असलेल्या हरकतीपासून ते अलिप्त राहिल्याचें उदाहरण युनायटेड् स्टेट्स् होत. यावरून हें उघड आहे कीं, असल्या हरकती मोठ्या राष्ट्रापासून दूर करण्यास अशक्य आहेत, असें नाहीं. केवळ हट्टानें जुनीच पद्धत कायम ठेवणें असेल तर मात्र या हरकती दूर होणाऱ्या नाहींत.

परंतु इंग्लंडचा विस्तार दोन प्रकारचा झाला आहे. पहिल्या प्रकाराचा विचार येथपर्यंत करण्यांत आला. इंग्रज लोक आणि इंग्रजी अंमल या दोहोंचाही वसाहतींच्या रूपानें विस्तार झाला, याजबद्दल विवेचन झालें. परंतु हिंदुस्थान ह्मणून एक अफाट लोकसंख्येचा फार मोठा देश चमत्कारिक रीतीनें इंग्लंडचे ताब्यांत आला आहे, तर त्याच्या योगानें जो दुसऱ्या प्रकारचा विस्तार इंग्लंड देशाचा झाला, त्याचा विचार पुढील भागीं करूं.

भाग दुसरा.

हिंदुस्थानाविषयीं.

भाग २.

प्रकरण पहिलें.

इतिहास आणि राजनीति.

पूर्वी घडून आलेल्या नाना तऱ्हेच्या गोष्टी आपण इतिहासांत वाचतों. त्यांतील एखादी गोष्ट जर, जशी घडली, तशी न घडतां, निराळ्याच तऱ्हेनें घडती, तर आपण वाचतों त्यापेक्षां काय काय निराळे परिणाम घडून आले असते, अशा प्रकारच्या कल्पना इतिहासकार कित्येक वेळां करीत असतात. ह्याजबद्दल त्यांस दूषण देण्यांत येतें. "कितीहो अव्यवहारिक इतिहासकार हे", असे उद्गार आपणांस ऐकूं येतात. इतिहासकार ज्या अशा कल्पना करतात, त्या व्यवहारोपयोगाकरितां नसून, केवळ इतिहासशास्त्राचें पूर्णपणें विवेचन करण्याकरितां करितात, असा समज आहे. आह्मांस तर उलटें असें वाटतें कीं, इतिहासकार ज्या अशा कल्पना करितात, त्या ते आणखी थोड्या जास्तच करतील, तर बऱ्या. कित्येक गोष्टी समाजांत जास्त चळवळ उत्पन्न करणाऱ्या असतात, ह्मणून त्या इतर व्यवहारांतील नेहमींच्या गोष्टींपेक्षां जास्त महत्वाच्या अगर कार्यकारणभावानें जास्त निश्चित आहेत, असें मानणें चुकीचें आहे. या चुकीनें विचारशक्ति कुंठित होते. एखाद्या राष्ट्राचे राज्यकारभार अमुक एका रीतीनें चालले असून, ती रीति किती बरी किंवा वाईट होती, हें पाहण्याचें असेल, तर दुसऱ्या एखाद्या पद्धतीनें राज्यकारभार चालवितां आले असते, किंवा नाहीं, याचा विचार अवश्य करावा लागतो. जोंपर्यंत असा विचार केला जा-

णार नाहीं, तोंपर्यंत चालत आलेल्या पद्धतीचें खरें महत्व आपणांस कळणार नाहीं. हें आमचें ह्मणणें इंग्लिश राष्ट्राचे विस्तारास विशेष लागू आहे. इंग्लंडचा अमेरिकेशीं जर बिलकुल संबंध नसता, तर एलिझाबेथ राणीच्या कारकीर्दीपासून इंग्लंडचा आजपर्यंतचा इतिहास कसा अगदीं भिन्न झाला असता, याचा विचार आपण क्षणभर करूं. स्पॅनिश आरमेडाचा* हल्ला इंग्लंडवर आला नसता; ड्रेक,† हाकिन्स‡ वगैरे योद्धे पुढें आले नसते; इंग्लंडचें आरमार वाढलें नसतें; ब्लेकची§ व्हान ट्रॉप¶ व ड रूटर$ यांच्याशीं लढाई झाली नसती. तसेंच लॉंग पार्लमेंट‖ आणि दुसरा चार्लस यांच्या हालंडबरोबर लढाया, व क्राम्वेलच्या स्पेनबरोबर लढाया झाल्या नसत्या. पुष्कळ पैसा जमा करून चौदाव्या लुईशीं टक्कर मारून त्यास जेरीस आणण्याचें काम इंग्रज लोकांकडून झालें नसतें; मोठमोठ्या शेतांचें उत्पन्न वाढलें, तसेंच नवीन मंडळ्या स्थापन होऊन व्यापाराचें उत्पन्न वाढलें, तें वाढलें नसतें; व एकंदर राजनीतीचा क्रम

---

* टीप.—† पान १५४ पहा.

† टीप.—‡ पान २०५ पहा.

‡ टीप.—§ पान १६२ पहा.

§ टीप.—§ पान १६१ पहा.

¶ टीप.—‡ पान १७९ पहा.

$ ड रूटर—(१६०७–१६७६)–हा एक डच खलाशी होता. ह्यानें लहानपणींच तारवावर नोकरी धरली, व वाढत वाढत, १६४१ त तो अड्मिरल झाला. १६५२ त एकट्यानें, व १६५३ त वॉन ट्रॉप बरोबर ह्यानें इंग्रेजांना पुष्कळ जेर केलें. १६५९ त डेन्मार्कच्या राजाला स्वीडिश लोकांच्या विरुद्ध मदत केल्यावरून त्या राजानें त्याला नेमणुक करून दिली. १६६६ त त्याचा इंग्रज सरदार प्रिंस रुपर्ट व ड्यूक आफ् आल्बमार्ल ह्यांनीं पूर्ण पराभव केला; व १६६७ त त्यानें इंग्लंडवर स्वारी करून तो टेम्स नदीपर्यंत चालून आला, त्यावेळीं त्यानें इंग्रजांचीं पुष्कळ तारवें जाळलीं. तो फ्रेंचांबरोबर सिसिलीच्या किनाऱ्यावर लढत असतां मारला गेला. आम्स्टर्डाम (डेन्मार्कची राजधानी) येथें त्याचें उत्तम स्मारक आहे.

‖ टीप.—† पान १४१ पहा.

अगदीं बदलला असता. आन राणीच्या कारकीर्दीत इंग्लंड देशाला सर्व राष्ट्रांत अग्रगण्यता प्राप्त झाली नसती. सर्व अठराव्या शतकाचा क्रम तर अगदींच भिन्न होऊन गेला असता. सारांश, प्रत्येक गोष्ट अगदीं निराळी झाली असती. अशा प्रकारें विचार करीत जाण्यास कधींही पार येणार नाहीं, ह्मणून हें निरर्थक आहे, असें वाचकांस वाटण्याचा संभव आहे.

तरी सर्व विचारांत अशा प्रकारचा विचार फार व्यवहारोपयोगी आहे. कारण, इंग्लंडचा जो इतका अतोनात विस्तार अलीकडे झाला आहे, जे हजारों मुलूख ह्या शेवटच्या तीनशें वर्षांत इंग्रजी अमलाखालीं येत आहेत, ते सर्व इंग्लंडशीं पूर्णपणें मिळून गेलेले नाहींत. कदाचित् हे मुलूख कालांतरेंकरून इंग्लंडचे ताब्यांतून निघून जातील, व मग इंग्लंड देश ह्मणजे एलिझाबेथ राणीच्या कारकीर्दीत होता तेवढाच शिलक राहील, असें वाटणें, आह्मी निराधार समजत नाहीं. कोणी असें ह्मणतील कीं, हा जो एवढा विस्तार झाला, तो अगदीं स्वाभाविक रीत्या झाला. मनुष्य आरंभीं लहानसा मुलगा असून, तोच पुढें राक्षसासारखा मोठा पुरुष होतो. हें जसें स्वाभाविक आहे, तसाच देशविस्तारही स्वाभाविक आहे. असें साम्य दाखविण्यांत एक विशेष अंतर लक्षांत घेतलें पाहिजे. मुलाचा मोठा धिप्पाड पुरुष झाल्यावर, जर त्याचे मनांत पुन्हां मुलगा व्हावें असें आलें, तर तें शक्य नाहीं. परंतु हिंदुस्थान देश आणि इतर वसाहती सोडून देण्याचें इंग्लंडचे मनांत येईल, तर तसें करणें शक्य असून, असें करणें बरें आहे किंवा नाहीं, याचा विचार इंग्लंडांत हल्लीं सुरू आहे. इंग्लंड व त्याचे ताब्यांतील मुलूख यांजमध्यें कितीही ऐक्यभाव असला, तरी क्रानडा* हा प्रांत

* अमेरिकेंत आहे.

केंटसारखा† इंग्रज लोकांस वाटत नाहीं, नोवास्कोशिया स्काट्लंडसारखा वाटत नाहीं, न्यु साउथ वेल्स, वेल्सप्रमाणें वाटत नाहीं. तसेंच हिंदुस्थान ऐर्लंडप्रमाणें वाटत नाहीं. हे प्रांत इंग्लंडचे ताब्यांतून निघून स्वतंत्र झाल्याची कल्पना सहज करितां येते; तसेंच, ते स्वतंत्र होणें हेंच इंग्लंडाला इष्ट वाटेल, तर तसें करण्यास विलंबही लागणार नाहीं. इतकेंच नाहीं, तर असें करण्याविषयीं कित्येकांकडून शिफारसीही होत आहेत. ह्मणून इंग्लंड व त्याचे ताब्यांतील मुलुख हीं सर्व एक राष्ट्र समजून त्यासंबंधानें विचार करणें आह्मांस प्राप्त आहे. स्पेनच्या विस्ताराप्रमाणें इंग्लंडचा विस्तार केवळ क्षणिक आहे कीं काय? हा विस्तार करण्याचें इंग्रजांचे मनांत आलें ही त्यांची चुकी झाली कीं काय? त्यांनीं हा विस्तार करण्यांत जो पैसा व श्रम खर्च केला, तो व्यर्थ गेला कीं काय? राष्ट्राच्या हातून चुका होणें अशक्य नसून होतही आहेत. कित्येक वेळां शुद्ध डोळे मिटून विचार केल्याशिवाय कित्येक कृत्यें राष्ट्रांकडून हातीं घेतलीं जातात. वस्तुस्थिति पाहिली असतां, अशा चुका एकसारख्या पुष्कळ दिवसपर्यंत घडत जाणें, हेंही अशक्य नाहीं; मग त्या चुकांच्या योगानें राष्ट्रस्थिति कितीही विपरीत झाली तरी होवो. आरंभापासून इंग्लंडानें अमेरिकेच्या तंट्यांत पडावयाचें कारण नव्हतें. 'मोठ्या तलावांतील राजहंसाच्या छोट्या वसतिस्थानाप्रमाणें' शेक्सपियरच्या वेळीं जेवढा इंग्लंड देश होता, तेवढाच आजपर्यंत राहिला असता, तर फार फायदेशीर झालें असतें; किंवा कदाचित् एकवार राष्ट्रवृद्धि झाल्यावरही फ्रान्सप्रमाणें सर्व मुलूख त्याच्या ताब्यांतून गेले असते, तरी बरें झालें असतें; अथवा निदान ताब्यांत असलेले अमेरिकेंतील एकंदर प्रांत स्वतंत्र झाल्यावर आणखी

† इंग्लंडांत एक परगणा आहे.

इतर मुलूख मिळविण्याविषयीं तरी इंग्लंडकडून खटपट न झाली पाहिजे होती. अशा प्रकारच्या कल्पना करणें, व विचारवान पुरुषांस असे प्रश्न उत्पन्न होणें, अगदीं सहाजिक व रास्त आहे.

वर केलेल्या कल्पनेप्रमाणें खरोखरीची स्थिति असेल तर, किंवा निदान अशी स्थिति असणें शक्य असेल तर, आज केवढा घोटाळ्याचा व विलक्षण प्रश्न इंग्रज लोकांसमोर आहे बरें ? जर इंग्रज लोक इतके दिवस खरा रस्ता सोडून भलतिकडेसच गेले असतील, किंवा आतां तरी यापुढें निराळाच मार्ग त्यांनीं स्वीकारणें जरूर असेल, तर हा प्रश्न सामान्य नाहीं. इंग्लंडांतील घरगुती राज्यप्रकरणाच्या हजारों गोष्टींकडे इंग्रज लोकांचें चित्त नेहमीं वेधलेलें असतें. परंतु त्या सर्वांपेक्षांही हा वरील प्रश्न जास्त महत्वाचा आहे. या प्रश्नाचा विचार करण्याची मुळींच जरूर नाहीं, असें कित्येक लोक प्रतिपादन करितात. परंतु हें त्यांचें प्रतिपादन फार चुकीचें आहे. ते असें ह्मणतात कीं, " आपण आपलेजवळ असलेलें काम करूं या, दूर अंतरावर जे देश आहेत त्यांजविषयीं विचार करण्याची आह्मांस काय जरूर आहे ? त्यांजकडे आमचें लक्ष पोंचणें कठिण असून त्यांच्याशीं आमचा संबंध झाला, हीच मोठी दुर्दैवाची गोष्ट होय. " ह्या ह्मणण्यांत तथ्य असेल तर त्यापासून निराळाच सिद्धांत निघतो. जर वसाहतींशीं संबंध झाला, ही दुर्दैवाची गोष्ट असेल तर, व वसाहतींचा विस्तार अतिशय मोठा असल्यामुळें त्यांजकडे लक्ष देण्यास त्यांस सवड नसेल तर, हा वरील प्रश्न जास्तच निकडीचा व जास्तच महत्वाचा आहे. कारण, सर्व मुलूख सोडून देऊन, रिकाम्या त्रासापासून मुक्त होणें इष्ट असल्यास, तें जितकें लवकर होईल तितकें चांगलें; नाहीं तर भलतेंच संकट येऊन गुदरेल. जोंपर्यंत सर्व वसाहतींची स्वस्थपणें स्थायिकता झालेली नाहीं, तोंपर्यंतच त्या वसाहती

सोडून देऊन मोकळें होणें बरें. ह्मणून इंग्रजांपुढें हल्लीं फारच गहन प्रश्न आहे. जर इंग्लिश साम्राज्याची यापुढेंही वृद्धि होणें शक्य असेल, तर ती वृद्धि कोणत्या मार्गानें व्हावी, जर ही गोष्ट शक्य नसून वसाहती आपल्या ताब्यांतून सोडून देणें इष्ट असेल, तर त्या कोणत्या मार्गानें सोडून द्याव्या, ह्याचा विचार करण्याची जरूर आहे; व कांहीं झालें तरी वसाहतींतील प्रदेश इतके मोठे आहेत कीं, व त्यांतील लोकसंख्या इतकी जलदी अतोनात वाढत आहे कीं, वरील प्रश्नांच्या निकालावरच त्या सर्वांची भावि स्थिति विशेषतः अवलंबून आहे.

हा प्रश्न राजनीतिशास्त्राचा आहे, असें आह्मी ह्मणतों; तरी तो इतिहासशास्त्राचा नाहीं असें नाहीं. आमच्या मतें तो दोहोंचाही आहे. इतिहासशास्त्र आणि राजनीतिशास्त्र यांजमध्यें जो निकट संबंध आह्मांस दिसत आहे, तो प्रत्यक्ष उदाहरणानें स्पष्ट करून दाखवितां यावा, याच मुख्य हेतूनें आह्मीं 'इंग्लंडचा विस्तार' या विषयावर हें पुस्तक लिहिण्याचें हातीं घेतलें. आमच्या ह्या सर्व विवेचनाचा अखेरचा हेतु असें दाखवावयाचा आहे कीं, वरील दोन शास्त्रांचा एकमेकांशीं फारच निकट संबंध आहे. दोहोंत मिळून एकाच विषयाचें दोन निरनिराळ्या दृष्टींनीं विवेचन होतें. कित्येक लोक राजनीतिशास्त्राचा अर्थ फार हलका समजतात. ते ह्मणतात कीं, स्वार्थाकरितां निरनिराळ्या पक्षांचीं जीं भांडणें व तंटे झाले असतील, त्यांचें वर्णन करणें हें राजनीतिशास्त्राचें काम. तसाच इतिहासाचाही हलका अर्थ कोणी घेतात. त्यांच्या मतें इतिहास ह्मणजे उत्तम भाषासरणीचा मासला. गद्य व पद्य या दोघांचाही ज्यांत समावेश होईल, अशा प्रकारचीं मनोरंजक पुस्तकें लिहिलीं, ह्मणजे इतिहास झाला. अशा प्रकारचा चुकीचा अर्थ या विषयास येण्याचें कारण, हीं दोन शास्त्रें एकाच विषयाच्या दोन शाखा असतांही, तीं अगदीं भिन्न

समजली गेली, हें होय. जर राजनीतिशास्त्राची इतिहासाचे योगानें परिस्फुटता न होईल, तर मात्र तें शास्त्र हलकें समजण्यालायक आहे. तसेंच व्यावहारिक राजनीतीकडे लक्ष दिल्याशिवाय जे इतिहास लिहिले गेले असतील, त्यांचा, भाषाविषयावर सुरेख ग्रंथ, इतकाच उपयोग समजावयाचा आहे. हें नीट समजून सांगतां यावें, ह्मणून या दोनही शास्त्रांस अगदीं उघड अनुलक्षून असलेला विषय आह्मीं हातीं घेतला आहे. हा विषय ह्मणजे इंग्लंड देशाचा विस्तार. हिंदुस्थानदेशाचें आतां पुढें काय केलें पाहिजे, व तसेंच इंग्रजांच्या हल्लींच्या वसाहतींचेंही पुढें काय केलें पाहिजे? अशा प्रकारचे प्रश्न जर राजकीय विषयांस अनुलक्षून नसतील, तर दुसरे कोणते प्रश्न ह्या विषयास अनुलक्षून असावयाचे? तथापि हे प्रश्न सोडविण्यास इतिहासाची मदत पाहिजे. इंग्लंडमध्यें एखादा कर वा एखादा सार्वजनिक हक्क, यासंबंधें प्रश्न निघाला असतां, सामान्य बुद्धीच्या मनुष्यास व्यवहाराचे साधारण नियम माहीत असले ह्मणजे, दुसरी विशेष माहिती नसली, तरी खरें मत कदाचित् देतां येईल. परंतु तशाच प्रकारचे हे वरील प्रश्न आहेत, असें समजतां कामा नये. हिंदुस्थानसंबंधीं विशेष माहिती मिळविल्याशिवाय त्यांतील एखाद्या प्रश्नावर एकदम आपलें मत देणें बरोबर होणार नाहीं. कारण, आह्मांस असें माहीत आहे कीं, हिंदुस्थानचे लोक शरिरानें, बुद्धीनें व नीतीनें इंग्रज लोकांहून अगदीं भिन्न आहेत. यावरून राजनीतिशास्त्राचें पर्यवसान इतिहासशास्त्रांत कसें होतें तें पाहा. आणखी हें आमचें वरील उदाहरण असें आहे कीं, त्याच्या योगानें इतिहासाचें पर्यवसान राजनीतिशास्त्रांत कसें होतें, हेंही दाखवितां येतें. इंग्रजांचें जें एवढें राष्ट्र नवीन विस्तृत झालें आहे, तें अगदीं अलीकडे झालें आहे. अमेरिकेंतील ज्या वसाहती इंग्लंडचे ताब्यांतून निघून स्वतंत्र झाल्या, त्या सोडून बाकीचें जें हल्लींचें एकंदर

राष्ट्र आहे, त्याची स्थापना बहुतेक दुसरा व तिसरा जार्ज या राजांच्या कारकीर्दीत झालेली आहे. ह्या काळच्या इतिहासाचा काळजीपूर्वक अभ्यास फारसे कोणी करीत नाहींत. नामांकित इतिहासकारांनीं हा काळ अगदीं अलीकडचा ह्मणून आपल्या इतिहासांत घेतलेला नाहीं. ह्मणून लोक असें मानतात कीं, या काळामध्यें देशाची भरभराटी व सुधारणा अव्याहत होत गेली असून, दुसरी महत्वाची गोष्ट यांत घडून आलेली नाहीं. इतिहासकार आपले ग्रंथ लिहितां लिहितां या काळा-पर्यंत आले ह्मणजे त्यांस नीरसता भासूं लागते. त्यांच्या या काळा-संबंधीं वर्णनास कांहींच स्वरूप नसतें. ह्मणून त्यांचे ग्रंथ वाचणाऱ्या सर्व लोकांस असें वाटतें कीं, इंग्लंडच्या इतिहासापासून कांहींच तत्व निघत नाहीं. तो इतिहास ह्मणजे तात्पर्य असल्याशिवाय जशी गोष्ट असावी तसा आहे, किंवा "हार्ट आफ् मिड-लोथियन*" प्रमाणें ज्याचा शेवटचा भाग अगदीं उदास व फाजील, असा आहे. ही चुकी कशी दुरुस्त करावी, हें आमच्या वाचकांस समजलेंच असेल. विलक्षण मोठ्या गोष्टी पुढें व्हावयाच्या आहेत, व त्या भावि आहेत ह्मणून त्यांजबद्दल जरी आज आह्मांस कांहींच अंदाज करतां येत नाहीं, तरी त्या घडून येणार, व प्रचंडही असणार, यांत संशय नाहीं. इंग्लंडचा जो संबंध आज हिंदुस्था-नाशीं व वसाहतींशीं आहे, त्या संबंधास पूर्णावस्था येत गेल्यानें ह्या गोष्टी घडून यावयाच्या आहेत. ही पूर्णावस्था अद्यापि आली नसून, पुढें यावयाची आहे; ती कोणत्या प्रकारची होईल, हें आपणांस आज कळणार नाहीं. कदाचित् सर्व राष्ट्राची ताटातूट होईल. कानडा आणि आस्ट्रेलिया कदा-चित् स्वतंत्र होतील. इंग्रज लोक कदाचित् हिंदुस्थान सोडून जातील, व

* स्काटूलंडांतील स्कॉट नांवाच्या कवीची 'हार्ट आफ् मिड्-लोथियन' या नांवाची एक कादंबरी आहे.

मग, आज गव्हर्नर जनरल आणि कौन्सिल यांचा अंमल चालत आहे; तो नाहींसा होऊन त्याच्या ठिकाणीं दुसरा एखादा तद्देशीय अंमल सुरू होईल. कदाचित् त्याच्या उलटही सर्व घडून येईल. इंग्लंडच्या ताब्यांतील सर्व राष्ट्रांची राज्य करण्याची पद्धत हल्लींच्यापेक्षां जास्त दृढ होईल. महासागरांतरीं अतोनात अंतरावर इंग्रज लोक रहात असले, तरी नवीन लागलेल्या शास्त्रीय शोधांचें पूर्ण सहाय्य घेऊन युनायटेड्स्टेट्स्प्रमाणें अशी नवीनच कांहींतरी राज्य करण्याची युक्ति इंग्रज लोक काढतील, कीं तिचे योगानें इंग्लंडची प्रजा पृथ्वीच्या कोणत्याही व कितीही भागावर पसरली असली, तरी सर्वांस सारखी स्वतंत्रता प्राप्त होऊन आपसांत सर्वांमध्यें दृढ स्नेहभाव जडेल. याच्याहींपेक्षां कठिण प्रश्न सोडविण्याचा आहे, तो इंग्रजांस सोडवितां येईल काय? हिंदुस्थान देशांत वसाहत करून राहण्यास जागा नसतांही इंग्रजांस त्या देशावर राज्य कर्तव्य आहे. ज्या लोकांवर हें राज्य करणें आहे, ते लोकसंख्येनें पुष्कळ असून, पूर्वापार चालत आलेले प्राच्य रिवाज आणि रहाटी यांनीं अगदीं जखडलेले आहेत. तर अशा हरएक गोष्टींनीं विरुद्ध अशा दोन राष्ट्रांपैकीं एकाचा अंमल दुसऱ्यावर शांततेनें चिरकाल राहील, अशी कांहीं युक्ति सांपडेल काय? हे जे वर गहन प्रश्न निवेदन करण्यांत आले, ते कोणत्या रीतीनें सुटतील, हें आम्हांस सांगवत नाहीं. तरी ते कसे तरी सुटतीलच, यांत संशय नसून, ह्या प्रश्नांच्या महत्वाच्या मानानें त्यांचें निराकरण होईल तेंही फार महत्वाचें होईल. अशा विचारांकडे इंग्रजांचा सर्व कल दिसत आहे. तर मग इंग्लंड देशाचा इतिहास पूर्णत्वास येऊन पुढें कांहीं महत्वाच्या गोष्टी घडावयाच्या राहिल्या नाहींत, असें जें पुष्कळ इतिहासकार मानतात तें मिथ्या होय. इंग्लंडचा सुरक्षितपणा व भरभराटी हीं कायम झालीं, असें आपण बिलकुल समजतां

नये. हल्लीं घडत असलेला व्यापार फारच प्रचंड असल्यामुळें तो एकद्म दृश्य होत नसेल; परंतु जेव्हां कां एकवार लढाया आणि घडामोडी सुरू होतील—आणि त्या सुरू होतीलच—तेव्हां त्याही प्रचंडच होतील. अशा प्रकारचा प्रसंग येईल, तेव्हां मग मागच्या सर्व घडलेल्या गोष्टींचा विलक्षण प्रकारें सर्वांस उमज पडूं लागेल. दुसऱ्या जार्ज* राजाच्या कारकीर्दीपासून जो ब्रिटिश राज्याचा इतका विस्तार झाला आहे व ज्याचें वर्णन वाचीत असतां आपणांस विलक्षण विस्मय वाटतो, त्याच विस्ताराविषयीं आपल्या मनांत निराळ्या कल्पना येऊं लागतील. कानडा आणि आस्ट्रेलिया येथील अमर्याद प्रदेशांकडे हल्लीं पाहिलें असतां, आपल्या मनांत जरी विस्मय उपन्न होतो, तरी त्याजविषयीं कोणी खरें मत प्रगट करीत नाहीं. कारण, हा विस्तार आपणांस इतका चमत्कारिक व अनियमित भासतो कीं, त्याजविषयीं जास्त खोल विचार करण्याची आवड रहात नाहीं. त्याजविषयीं काय मत प्रगट करावें, हेंच कोणास सुचत नाहीं. परंतु पुढें याचा सर्व उलगडा होईल. ह्या सर्व वैभवामध्यें खरोखरी टिकणारें किती आहे, व अशाश्वत किती आहे, ह्याचा निकाल काल मात्र करूं शकेल. नवीन प्रदेश ताब्यांत आणण्याकरितां अठराव्या शतकांत जी मोठी झटापट चालू राहिली होती, तिचें खरें महत्व मागाहून कळेल. हा सर्व विस्तार ह्मणजे एक मोठें बळकट जगद्राष्ट्र स्थापन झालें आहे, किंवा पूर्वीच्या स्पेनच्या साम्राज्याप्रमाणें हें केवळ व्यापारोत्तेजित असून त्याचा लय समीप आला आहे; हिंदुस्थान काबीज करण्यानें प्राच्य व पाश्चिमात्य राष्ट्रांवर अतिशय महत्वाचे परिणाम घडून आणणारें असें एक दृढ सख्य बनून आलें आहे, किंवा क्लाइव्ह व हेस्टिंगस् यांनीं जे भगीरथ प्रयत्न केले, ते बाह्यतः सिद्धीस गेले, असें एक शतक-

* इ. स. १७२७

पर्यंत वाटून पुढें ते विफल होणारे आहेत, या गोष्टींचा निकाल काळें-करून होण्याचा आहे.

काळेंकरून या गोष्टींचा उलगडा होईल खरा, तरी इतिहास जर उपयुक्त ह्मणावयाचा, तर पुढें काय घडणार, ह्याचा थोडाबहुत अंदाज अगोदर करतां आला पाहिजे. कोणतीही गोष्ट घडून आल्या-वर मग सर्व सावध होतात. परंतु गोष्ट घडण्यापूर्वी सावध होण्या-करितांच इतिहासाचा अभ्यास करणें आहे. इंग्रज लोकांच्या वसाहतींचें व हिंदुस्थानच्या राज्याचें पुढें काय होणार, याचा अंदाज आज मुळींच करतां येणार नाहीं काय ? भवितव्य तरी एकदम अवचित येऊन पडेल असें नाहीं. त्याचें स्वरूप निश्चित करण्याचे कांहीं ठरींव नियम आहेत. तेच नियम शोधून काढण्याचें काम राज्यव्यवहारशास्त्राचें आहे. गोष्ट घडून आल्यावर मग ती सर्वांस चांगली व्यक्त होईलच. जें झालें तें झालेंच पाहिजे होतें, असें मग सर्वांस कमीजास्त प्रमाणानें वाटूं लागेल. असें आहे तर राज्यव्यवहारशास्त्रज्ञांस तरी पुढें काय होणार, याचा साधारण अंदाज आगाऊ करतां आलाच पाहिजे.

अशा प्रकारचे विचार मनांत आणिले ह्मणजे अलीकडच्या इंग्लंडच्या इतिहासांतील गोष्टींविषयीं थोडासा जास्त उमज पडत नाहीं काय ? सोळाव्या शतकाच्या अखेरीस इंग्रज लोकांनीं नवीनच कृत्य हातीं घेतलें होतें, हें वर सांगण्यांत आलें आहे. या नवीन कृत्यांत त्यांस सतराव्या शतकांत कसकसें यश येत गेलें, व अठराव्या शतकांत त्यांत कोणकोणते विलक्षण फेरफार घडून आले, हेंही वर सांगितलें आहे. आणखी नुकतेंच आह्मीं असें दाखविलें आहे कीं, इंग्रज लोक अद्यापिही कायमच्या स्थितीस येऊन पोंचले नसून, हल्लींची स्थिति केवळ हंगामी आहे, व तींत लवकरच विलक्षण फेरफार व्हावयाचा

आहे. म्हणून हें उघड आहे कीं, इंग्लंडच्या इतिहासाच्या अलीकडच्या भागाचें विवेचन राज्यव्यवहारशास्त्रांत अत्यंत महत्वाचें आहे. यावरून इतिहासाचा अंतर्भाव राज्यव्यवहारशास्त्रांत कसा होतो, हें उघड होईल. आह्मी असें दाखवितों कीं, दुसरा आणि तिसरा जार्ज यांच्या कारकीर्दी पूर्वी संपून गेल्या असून, त्यांचें आतां महत्व इतक्यापुरतेंच आहे कीं, त्या वेळच्या चमत्कारिक रीतीभाती आणि प्रचार यांजपासून मनास एक प्रकारची करमणूक होते, इतकेंच समजावयाचें नाहीं, तर त्या कारकीर्दी ह्मणजे एक अवाढव्य ऐतिहासिक द्रव्यभांडार आहे. या ऐतिहासिक द्रव्यांचे योगानें राज्यव्यवहारशास्त्रांतील एक फार मोठा व फार निकडीचा प्रश्न सोडवावयाचा आहे. ब्रिटिश राज्याचें पुढें काय होणार, हें समजण्याकरितां तें कशा प्रकारचें आहे, कोणत्या कारणांनीं त्याचें रक्षण होत आहे, हें सर्व लक्षपूर्वक पाहिलें पाहिजे. ब्रिटिश राज्य कोणत्या प्रकारचें आहे, हें पाहणें ह्मणजे त्याचा इतिहास व विशेषेंकरून त्याचा आरंभीचा इतिहास पाहणें, हें होय.

कित्येक लौकिक ग्रंथकार आज पुष्कळ वर्षें असें लिहीत आले आहेत कीं, इतिहासशास्त्राला हल्लीं फाजील गांभीर्य व डामडौल प्राप्त झाला आहे. वास्तविक पहातां इतिहासांतील लेख सूक्ष्म, परिचितविषय व ढळढळीत असावे. अर्थात् इतिहास कल्पित कादंबरीच्या धर्तीवर लिहिलेला असावा. अलीकडे अशा प्रकारचे उद्गार सर्व लोकांमध्यें फार प्रिय झाले आहेत, ह्मणून आमचें त्यांजविषयीं मत काय आहे, हें येथें सांगणें प्रशस्त दिसतें. इतिहासाविषयीं वरील मत ज्या आधारावर रचलेलें आहे, तो आधार आह्मांसही कबूल आहे. इतिहास डामडौली व फाजील गांभीर्ययुक्त असूं नये, असें आह्मांसही वाटतें, आणि हेंही खरें आहे कीं, पुष्कळ दिवसपर्यंत हे दोनही दोष इतिहासांत घडून आले

आहेत. परंतु गांभीर्य आणि महत्व हीं दोनही एकत्र आहेत, असें ह्मणतां येणार नाहीं. वरील मताचा आशय असा दिसतो कीं, इतिहासांत जर गांभीर्य असूं शकत नाहीं, तर महत्वही असणार नाहीं. इतिहासापासून महत्वाचीं व विचारणीय तत्वें निघतील, हें त्यांस संमत नाहीं. इतिहासापासून मोठमोठे नवीन शोध लागूं शकतील, हें या लोकांच्या स्वप्नांतही नाहीं. त्यांना इतकेंच केवळ वाटतें कीं, हुबेहुब वर्णनानें प्राचीन गोष्टींच्या ठायीं पुनर्जीवित्व उत्पन्न करून, त्या जणूं काय आज आपल्यापुढेंच प्रत्यक्ष घडत आहेत; आपले पूर्वज त्या वेळचे चमत्कारिक पोषाख करून आपणांस आज भेटत आहेत; व ते आपले प्रख्यात पराक्रम गाजवीत असतांच आपण त्यांस एकदम जाऊन भेटत आहों; असें भासविणें हेंच अतिशय आल्हादकारक होय. याच्यापलीकडे जाण्याचें इतिहासाचें काम नाहीं. "स्टील" वर लिहिलेल्या निबंधाचे आरंभीं ठाकरे* या ग्रंथकारानें वरील मत निर्भीड खरेपणानें प्रदर्शित केलें आहे, तें बहुतेकांनीं वाचलेंच असेल, व बहुतेकांस ठाकरेचें ह्मणणें सुयुक्तिक व खरें वाटलें असेल.

ठाकरे असें लिहितो कीं, "कोणत्याही पूर्व कालाचा इतिहास समजून घेण्यांत काय बरें हेतु असतो? त्या वेळीं कोणत्या राजकीय उलाढाली घडून येत होत्या, व त्या वेळीं जे मुत्सदी प्रसिद्धीस आले, त्यांची वागणूक कशी होती, हें समजण्याकरितांच काय? किंवा त्या वेळच्या स्थितीची व एकंदर रहाटीची माहिती करून घेण्याकरितांच इतिहास पहावयाचा काय? जर वर निर्दिष्ट दोन हेतूंपैकीं पहिला हेतु खरा ह्मणावा, तर तो इतिहासावलोकनानें पूर्णपणें खरा तडीस जात नाहीं."

* ठाकरे-(१८११-१८६३) इंग्लंडांतील प्रसिद्ध कादंबरीकार व ग्रंथकार.

असे लिहिल्यानंतर ठाकरे आणखी असें सांगतो कीं, "माझ्या मतें सार्वजनिक गोष्टींविषयीं ऐतिहासिक पुस्तकांतून जे अगदीं प्रौढ असे लेख आढळतात, ते मिथ्या होत. बारकाईनें शोध करूं लागलें असतां, ते क्षणभरही खरे ठरणार नाहींत." आपल्या ह्मणण्याच्या पुष्टीकरणार्थ स्विफ्ट् ग्रंथकाराचा 'कांडक्ट आफ् थि अलाईज्' आणि काक्स् यानें लिहिलेलें 'मार्लबरोचें चरित्र' या दोन ग्रंथांचा ठाकरेनें उल्लेख केला आहे. यावरून वाचकांचे ध्यानीं येईल, कीं वरील जुन्या तऱ्हेवर लिहिलेल्या पुस्तकांवरून ठाकरेनें आपलें इतिहासाविषयीं मत बांधलें आहे. जर सर्व राजकीय कारभारांची हकीकत दुरुपयोगी आहे, असें ठाकरे ह्मणतो, तर त्याच्या मतें इतिहासांत असावें तरी काय हें पाहूं.

ठाकरे ह्मणतो कीं "पूर्व काळच्या स्थितीची व रहाटीची माहिती करून घेणें," हाच इतिहास वाचण्यांत मुख्य हेतु आहे. या वरील वाक्याचा स्पष्टार्थ ठाकरेनेंच केला आहे,—" 'स्पेक्टेटर' 'टॅट्लर' वगैरे मनोवेधक व सुंदर पुस्तकें वाचीत असतां पूर्वीचा काल जणूं काय प्रत्यक्ष वाचकांच्या पुढें येऊन उभा राहतो. आमच्या पूर्वजांच्या वेळच्या इंग्लंडाचें पुनरुज्जीवन होतें. लंडन शहरांत मेपोल* हा पुनरपि किनाऱ्यावर येऊन उभा राहतो. देवळांतून भगवद्भक्तांची गर्दी होऊं लागते. उपहारगृहांमध्यें चैनी लोक जमूं लागतात. सभ्य लोक भेटण्याच्या खोलींत जाऊं लागतात. खेळविक्याच्या दुकानांत सभ्य स्त्रियांची दाटी होऊं लागते. रस्त्यांतून अध्यक्ष लोक गडबडत असतात. पायीं जाणारीं चाकरमाणसें वगैरे रथापुढें मशाली घेऊन धांवत असतात, किंवा नाटकगृहाच्या दरवाजापाशीं झुंजत असतात. मी असें ह्मणतों

* मेपोलः—ख्रिश्चन लोक मे महिन्यांत एक उंच खांब पुरून त्याच्या सभोंवतीं नाचत असतात. हा एक खेळ आहे.

कीं, सर्वथैव खरे ह्मणून बाणा बाळगीत असलेल्या ऐतिहासिक पुस्तकांपेक्षां कल्पित कादंबऱ्यांमध्येंच अखेरीस जास्त सत्यता आढळून येईल. कादंबऱ्यांतून त्या त्या वेळच्या स्थितीचें चित्र वाचणारांस दिसतें. त्या वेळच्या रीतिभाती, त्या वेळची गडबड, त्या वेळचा पेहराव, त्या वेळचे आनंद, त्या वेळच्या थट्टा, त्या वेळचे उपहास, वगैरे सर्व गोष्टींची माहिती होऊन, त्या कालाची जणूं काय पुनरुत्पत्ति झाली असें वाटतें, व वाचकांसही आपण त्याच वेळच्या इंग्लंडांत राहत असल्याचा भास होतो. केवढाही प्रचंड इतिहासकार असला, तरी तो यापेक्षां जास्त कांहीं करूं शकेल काय ? "

एका मोठ्या कादंबरीकाराचें असें मत असणें, हें अगदीं साहजिकच आहे. ब्रिडले ह्मणून एक मोठा विख्यात एंजिनियर होऊन गेला. त्यास कोणीं एकानें एकदां प्रश्न केला कीं, नद्या उत्पन्न करण्यांत ईश्वराचा उद्देश तुह्मांस काय असावासा वाटतो बरें ? तेव्हां त्यानें बिनधोक असें उत्तर केलें कीं, " त्यांतून कालवे फोडून नेतां यावे ह्मणून." ॲन राणीचा उदय कां झाला, आणि ड्यूक आफ् मार्लबरो याच्या हाताखालीं इंग्रज लोकांनीं फ्रेंचांशीं युद्ध कां केलें, असा प्रश्न ठाकरे यास केला असतां, त्यानें साफ उत्तर दिलें कीं, " एस्मंड नांवाची माझी सुंदर कादंबरी लिहितां यावी ह्मणून." ठाकरे यास असें वाटलें असेल खरें. तरी पण गुणदोषविवेचनामध्यें तो कडक असा निवडला जात असतांही, त्यास असें प्रसिद्धपणें ह्मणवलें तरी कसें ! असें ह्मणण्यास त्याची सबब ह्मणजे हल्लींच्या इतिहासांवर त्याची अविश्वसनीयता ही होय. इतिहासांत सत्यता असेल, तर तो महत्वाचा आहे, हें ठाकरे यास नाकबूल नाहीं; परंतु त्याचें ह्मणणें असें कीं, इतिहासांत सत्यताच नाहीं; इतिहासांतील एक शब्दही तो खरा मानीत नाहीं.

बरें, असें आहे, तर पुढें आमचें कर्तव्य काय? ठाकरेच्याच ह्मणण्याप्रमाणें करावें किंवा कसें? इतिहासाचें वाचन केवळ मनाच्या करमणुकीचें, असें समजून त्याजवर परिश्रम करणें सोडून द्यावयाचें किंवा काय? युरोपीय राष्ट्रांचे झगडे सोडून देऊन खेळाच्या दुकानांत सभ्य स्त्रियांची गर्दी कशी जमतें, हेंच आपण पाहत बसावें काय? आमच्या पूर्वजांच्या वेळेस कोणत्या प्रकारची राज्यपद्धति होती, तिचा शोध न करितां, त्यांच्या वेळेस जेवणाचे कोणकोणते पदार्थ प्रचारांत होते, इतकेंच पाहून स्वस्थ राहावें काय? तर असें नाहीं. आह्मी असें ह्मणतों कीं, दुसरा एक चांगला मार्ग आहे. तो वरच्याशीं अगदीं विरुद्ध आहे. जर आज पुष्कळ वर्षेंपर्यंत इतिहास खरा व समाधानकारक लिहिलेला नाहीं, तर त्यांतील चुका दुरुस्त करून नवीन इतिहास तयार करा. त्यांत सत्यता नसेल, ती आणा. असें कां करूं नये, यास कांहींच कारण नाहीं. उलट इतिहासाचा बराच भाग आह्मी ह्मणतों याप्रमाणें दुरुस्त झालाच आहे. फक्त अलीकडील कित्येक वर्षांचा इतिहास दुर्लक्षामुळें नादुरुस्त आहे. अलीकडे इतिहासाचें स्वरूप पूर्वींच्याहून किती भिन्न झालें आहे, हें पुष्कळांस बिलकूल माहीत नाहीं. असत्यता, डौली व निरर्थक परिपाठानुचरण वगैरे जे दोष इतिहासांत कित्येक क्षुद्र लोक काढीत असत, ते पूर्वी एकदां खरे होते; परंतु आतां ते खरे नाहींत. इतिहासाचा बहुतेक भाग पुनर्लिखित झाला आहे. त्या पुनर्लिखित भागांत हल्लीं इतकी सत्यता आहे कीं, त्यांत लिहिलेल्या गोष्टी जमेस धरून शास्त्रज्ञांस त्यांजपासून नवीन राजकीय तत्वें सिद्ध करून दाखवितां येतील. पोकळ गांभीर्य व डौल आतां इतिहासांतून निघून गेला आहे. उलट पूर्वींच्यापेक्षां हल्लींच दृढतर गांभीर्य व महत्व इतिहासास प्राप्त झालें आहे. हाच आमच्या मतें दुसरा मार्ग सर्वांस खुला आहे. ठाकरेच्या सांगण्याप्रमाणें इतिहासास महत्व देण्याचें न टाकतां

पूर्वीपेक्षां जास्तच महत्व आपण त्यास आणिलें पाहिजे. सत्यता सांपडत नाहीं ह्मणून तिचा शोध न करणें बरोबर नाहीं. उलट असें समजा कीं, सत्यता सांपडण्यास जितकी कठिण आहे, तितकी तिचा शोध करण्यास आह्मीं जास्तच मेहनत व तत्परता दाखविली पाहिजे.

कारण, इतिहासांत सत्यता सांपडणारी आहे, ही गोष्ट खरी आहे, व एकदां आपण हें कबूल केलें ह्मणजे ती सत्यता फारच महत्वाची आहे यांत संशय नाहीं. अतिशय मोठ्या महत्वाच्या व्यवहारांशीं इतिहासाचा संबंध आहे. मोठमोठीं राष्ट्रें कशीं वृद्धिंगत झालीं, व शेवटीं नाश कशीं पावलीं, कोणकोणत्या मोठ्या लढाया व तह झाले, हें सर्व पाहण्याचें काम इतिहासाचें आहे. सारांश, कोट्यावधि प्राण्यांच्या सुखदुःखाशीं इतिहासाचा संबंध आहे. या कारणांवरूनच इतिहासाचा उपसंहार राजनीतिशास्त्रांत होतो, असें आह्मी दाखविणार आहोंत. आह्मी असें ह्मणतों कीं, इंग्लिश इतिहासाचें विवेचन करणें ह्मणजे इंग्लंडच्या गत स्थितीविषयीं विचार करणें इतकेंच नाहीं, तर त्याच्या भावि स्थितीचाही त्यांत समावेश होतो.

आपल्या देशाच्या इतिहासाचा विचार करण्यांत आपल्या सर्व देशाचें व आपलें मुख्य कल्याण कसें आहे, हें प्रस्तुत "इंग्लंड देशाचा विस्तार" नामक उदाहरणानें आह्मी वाचकांस सिद्ध करून दाखवितों. इंग्रज लोकांपुढें एक मोठा गहन प्रश्न दर दिवस वर्द्धिगत होत आहे, त्याचा निकाल लवकर केला पाहिजे. या प्रश्नाच्या निकालावरच त्या देशाचें सर्व भावि कल्याण अवलंबून आहे. राजकीय प्रकरणासंबंधीं जे जे ह्मणून प्रश्न उत्पन्न झाले असतील, त्या सर्वांतून हा प्रश्न जास्त महत्वाचा आहे. असें असतांही, हा प्रश्न इतिहासांतलाच आहे.

ह्या प्रश्नाचा निकाल करण्यास इंग्लंडच्या अर्वाचीन इतिहासाची थोडी-शीच माहिती पुरे होईल, असें नाहीं, तर त्याची संपूर्ण माहिती असली पाहिजे. कारण, आज तीन शतकेंपर्यंत इंग्लिश राष्ट्राचा विस्तार हळू हळू होऊन तें एक विस्तृत सार्वभौम राष्ट्र बनत आहे, हें वर सांगण्यांत आलेंच आहे. ह्मणून या विस्तृत राष्ट्राच्या भावि स्थितीची कल्पना करणें असेल, तर पूर्वीच्या तीनही शतकांतील स्थितीची पूर्ण माहिती मिळविली पाहिजे. हे प्रश्न सोडविण्याचा आतां लोकांनीं प्रयत्न करावा. हिंदुस्थान आणि वसाहती यांजविषयीं निश्चित मत ठरविण्याचें मनांत आणा, ह्मणजे असें कळून येईल, कीं एका प्रश्नावरून दुसरा प्रश्न व एका प्रकरणावरून दुसरें प्रकरण या परंपरेनें मागें जातां जातां शेवटीं इंग्लंडच्या सर्व अर्वाचिन इतिहासाचा शोध करावा लागेल. इंग्लिश इतिहासाचें अध्ययन करण्याचा हा एक मार्ग आहे, इतकेंच नाहीं, तर हाच उत्तम मार्ग आहे. कारण, इतिहास ह्मणजे काय, कीं घडून आलेल्या गोष्टी जमेस धरून त्यांच्या माहितीनें नवीन उद्भवलेले प्रश्न सोडविणें. 'घडून आलेल्या गोष्टींचें कालक्रमानुसार वर्णन' ह्मणजे इतिहास, असा जोंपर्यंत समज आहे, तोंपर्यंत वर ठाकरेनें निर्दिष्ट केलेलें इतिहासाचें स्वरूप खरें असें वाटून, त्यांत सत्यता बिलकुल सांपडणार नाहीं, तो फक्त पोकळ डौली, लांबलचक गोष्टींचें चऱ्हाट असेंच वाटेल. खरा उद्योग करणारास अशा इतिहासाचा त्रासच येईल. ह्मणून कथारूपी शांत स्वरूप इतिहासांतून काढून टाकलें पाहिजे. आपणच स्वतःस एकामागून एक प्रश्न केले पाहिजेत. त्या प्रश्नांचा निकाल करण्याच्या खटपटीस आपण लागलें पाहिजे. असें करतांच मनाची स्थिति बदलूं लागेल. नवीन शोध लागण्याचा सुमार दिसेल. पोकळ डौल नाहींसा होईल. खरें महत्व दिसूं लागेल. अशा

प्रकारें विचार करीत असतां, अर्वाचीन इंग्लिश इतिहासांत दोन मोठे प्रश्न निघतात. एक प्रश्न वसाहतींसंबंधीं व दुसरा प्रश्न हिंदुस्थान-संबंधीं.

ज्या ज्या देशांत प्रजासत्ताक राज्य आहे, त्या त्या देशांत इतिहासाचा अभ्यास सर्वत्रांनीं अगत्य करण्याचीं जीं कांहीं कारणें असतील, तीं कारणें इतर कोणत्याही देशापेक्षां इंग्लंडास ज्यास्त लागू आहेत. कारण, पृथ्वीच्या पाठीवर इंग्रज लोक इतके पसरले आहेत, कीं त्यांच्या संबधींचे इंग्लिश राज्यव्यवहार अतीव दुर्बोध झाले आहेत. फ्रान्स, जर्मनी, युनायटेड् स्टेट्स्, व कदाचित् रशिया हे शिवाय करून इतर कोणत्याही देशांत हा राज्यव्यवहारांचा प्रश्न इंग्लंड देशापेक्षां फार सोपा आहे, असें आह्मीं समजतों. कारण, वर सांगितलेलीं बहुतेक राष्ट्रें आकुंचित असून एक ठिकाणींच दृढ झालेलीं आहेत, व प्राचीन काळीं ग्रीस देशांत जीं शहरें स्वतंत्र राष्ट्रें ह्मणून होतीं, त्या प्रकारचींच हीं वरील राष्ट्रें आहेत, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. मात्र आकारानें थोडीशीं मोठीं आहेत. त्यांजला भीति असेल तर ती एके ठिकाणींच आहे. ह्मणून त्यांचें लष्करसुद्धां शहरच्या लोकांप्रमाणें एके ठिकाणींच जमलेलें असावयाचें. परंतु वसाहती जसजशा एकमेकांपासून दूर दूर होत जातात, तसतसा त्यांचा आकुंचितपणा कमी कमी होत जाऊन, अखिल राष्ट्राचें कल्याण कोणत्या प्रकारचें आहे, व तें कोणत्या उपायांनीं राखतां येईल, हें समजणें मुष्किलीचें होतें. इंग्लंडचे ताब्यांतील मुलूख जिकडे तिकडे पसरल्यामुळें त्यांजवर हल्ला करण्यास शत्रूंस सहज संधि सांपडेल. इंग्लंडचें युनायटेड् स्टेट्स्बरोबर युद्ध चालू झालें असतां, त्याचा परिणाम क्यानडामध्यें घडून येईल, व रशियाशीं झालें असतां, तो अफगाणिस्थानांत घडून येईल. परंतु हें बाह्य संकट मोठेंसें नाहीं. पसरलेल्या राष्ट्रा-

ची अंतर्व्यवस्थाच मोठ्या धोक्याची असते. पृथ्वीच्या समोरासमोरील दोन टोंकावर असलेल्या वसाहतींमध्यें एकाच जातीचे लोक राहत असले, तरी त्या उभयतांत अंतरैक्यता कायम ठेवणें किती कठिण आहे, हें सांगावयास नकोच. परंतु हीही अडचण इंग्लंडच्या संबंधानें मोठीशी नाहीं. इंग्लंडची अडचण दुसरीच आहे. इंग्लंडच्या ताब्यांत केवळ वसाहती आहेत, इतकेंच नाहीं, तर हिंदुस्थान ह्मणून एक स्वतंत्र अवाढव्य देश आहे. हिंदु लोकांत व इंग्रज लोकांत जात्यैक्यता व धर्मैक्यता बिलकूल नाहीं. एका देशांतून कांहीं लोकांनीं निघून द्वीपांतरीं नवीन वसाहत केली असतां, त्या उभयतांमध्यें एक प्रकारचा दृढतर स्नेहसंबंध नेहमीं कायम असतो, परंतु तशा प्रकारचा संबंध हिंदुस्थानाशीं नाहीं. येथें एक नवीनच प्रश्न सोडविण्याचा आहे. वसाहतींच्या प्रश्नापेक्षां हा प्रश्न कमी महत्वाचा नसून व कमी कठिण नसून तो सुलभ रीतीनें सुटण्याचा संभव मात्र कमी आहे. कोणत्याही राष्ट्राला आजपर्यंत जर कांहीं असा महत्वाचा एखादा प्रश्न उद्भवला असेल, तर त्याच्याच तोडीचा ह्या दोनही प्रश्नांपैकीं प्रत्येक प्रश्न आहे. मग हे दोनही प्रश्न एकाच वेळीं एकाच राष्ट्रावर येऊन पडले असतां त्यांचें ओझें त्या राष्ट्रावर किती पडेल, हें सांगणें नकोच.

ह्या एकमेकांशीं विरुद्ध अशा दोन प्रश्नांच्या योगानें सर्व लोकांचें मन किती गोंधळून जावें, याचा वाचकांनींच विचार करावा. राजनीतिशास्त्रांचीं जीं तत्वें ह्यांपैकीं एका प्रश्नाला लागू असतील, तीं दुसऱ्याला मुळींच लागू असावयाचीं नाहींत. वसाहती नवीन तयार झालेल्या असून त्यांजमध्यें जाऊन राहिलेले लोक उन्नतिप्रिय आहेत, व तेथील इतर गोष्टीही त्या उन्नतीला पुष्टि आणणाऱ्या आहेत. त्या ठिकाणीं गतस्थिति मुळींच नसून भावि परिणाम मात्र अमर्याद होणारे

आहेत. तेथील राज्यपद्धति आणि राज्यसंस्था हीं उत्तम इंग्लिश पद्धतीवर स्थापन झालेलीं आहेत. जिकडे तिकडे स्वतंत्रता, उद्योग, नवीन शोध, नवीन सुधारणा, हींच दिसून येत आहेत. असें असून, तेथें स्वस्थताही वास करीत आहे. एवढ्यान मुलुखाचा जर विस्तृत ब्रिटिश राज्यांत समावेश झाला असता, तर तें सर्व विस्तृत राष्ट्र, एकाच जातीचें व एकदेशीय झालें असतें; आणि जरी त्यांत समाविष्ट झालेला प्रदेश पाहिजे तितका विस्तृत असता, तरी त्याची व्यवस्था कोणत्या प्रकारची असावी, हें समजणें सुलभ पडलें असतें. परंतु इतक्या मुलुखाचा समावेश होऊनही आणखी एक मोठा प्रदेश इंग्लंडच्या ताब्यांत आहे. ह्या प्रदेशाचा विस्तार वसाहतींच्या विस्तारापेक्षां जरी जास्त नसला, तरी त्याची लोकसंख्या जास्त आहे. आणि वसाहतींमध्यें जें जें कांहीं नाहीं, तें तें सर्व ह्या प्रदेशांत आहे. हिंदुस्थानची गत स्थिति अवाढव्य आहे, आणि भावि स्थिति बहुतेक नाहीं ह्मटलें तरी चालेल. हिंदुस्थानची स्थिति पुढें कोणत्या प्रकारची होईल, याची कल्पना अतिशय शहाण्या माणसाला सुद्धां होणें कठीण आहे. तरी गत स्थिति पाहिली तर तिची, कल्पित गोष्टींप्रमाणें, जणुं काय भांडारेंच भरलीं आहेत, असें दिसतें; सर्व प्रकारचे प्राचीन धर्म, सर्व प्रकारच्या पुरातन रीतीभाती, हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासांत चिरस्थाई होऊन राहिल्या आहेत. अद्यापिही प्रजासत्ताक राज्याची शक्यता त्या ठिकाणीं दिसत नाहीं. ज्या ज्या गोष्टी युरोपांत आणि विशेषेंकरून अमेरिकेंत मुळींच दिसून येत नाहींत, त्या त्या सर्व हिंदुस्थानांत जबरदस्त चालू आहेत. उदाहरणार्थ, धर्मभोळेपणा, दैववादीपणा, एका पुरुषाचें बहुपत्नीत्व, हीं तेथें फार पुरातन काळापासून चालत आलेलीं आहेत. धर्मोपदेशकांची लबाडी व त्यामुळें होणारा जुलूम, ह्या सर्व गोष्टी अद्यापिही हिंदुस्थानांत सुरू आहेत.

उत्तरेकडे मध्य एशियाचें प्रचंड मैदान असून, ऑसुबेग, टर्कोमन वगैरे लोक त्यांत राहतात; हें एक मोठें भीतीचेंच कारण आहे. ह्यावरून ब्रिटिश राष्ट्राचा एक हात जगताच्या भावि स्थितीकडे पसरला असून युरोप आणि अमेरिका यांजमध्यें मध्यस्थी करीत आहे. त्याच राष्ट्राचा दुसरा हात गत स्थितीकडे पसरला असून एशियामध्यें विजय प्राप्त करून मोंगल लोकांचें राज्य बळकावून बसला आहे.

याप्रमाणें एकाच राष्ट्रानें दोन अगदीं विरुद्ध मार्गांचें क्रमण करण्यांत घोटाळा जाहल्याशिवाय कसा राहील? एशिया खंडांत जुलमी राज्य कायम ठेवून, आस्ट्रेलियामध्यें प्रजासत्ताक राज्य कसें बरें चालवितां येईल? पृथ्वीवर अतिशय बळकट चालत आलेली मुसलमानांची सत्ता पुढें चालवून हजारों देवालयांतील मूर्तींचें व तत्संबंधीं मालमत्तेचें संरक्षण करून त्याच वेळीं पश्चिम महाद्वीपांत विचारस्वातंत्र्य व अमूर्तिधर्मत्व यांजमध्यें अग्रगण्यता कशी बरें कायम ठेवितां येईल? मध्य एशियांत पुढें पडत चाललेल्या रशियाच्या पावलास अटकाव करण्याकरितां लष्कराचा बंदोबस्त राखणें व त्याच वेळीं क्विन्स्लंड व मॉनिटोबा यांजमध्यें स्वातंत्र्यप्रेरित लोक वसाहत करण्यास पाठविणें, या दोन गोष्टी कशा बरें करतां येतील? जगताच्या मूळ स्थापनेपासून आजपर्यंत कोणत्याही राष्ट्रावर एवढी मोठी जबाबदारी येऊन पडली नसेल. जे प्रश्न सोडवण्यास कांहीं गोष्टींची विशिष्ट माहिती व विशिष्ट शिक्षण जरूर आहे, अशा प्रकारचे प्रश्न सोडविण्याचें काम जगताच्या पाठीवर कोणत्याही एकाच राष्ट्रावर येऊन पडलें नसेल.

ज्या राष्ट्रावर ही जबाबदारी येऊन पडली आहे, त्या राष्ट्राला तिचें फारसें ओझें वाटत नाहीं, असें आह्मांस ह्मणणें भाग पडतें. कारण, वसाहती व हिंदुस्थानसंबंधीं प्रश्नांचा विचार या राष्ट्राकडून बिलकुल

केला जात नाहीं. क्वचित् कालेंकरून असे प्रश्न जेव्हां अग्रगण्य होतात, तेवढी वेळ शिवायकरून त्या प्रश्नांची अभिरुचि त्या लोकांस लागत नाहीं. प्रधानकीमध्यें कांहीं फेरफार होण्याचा संभव असेल, तेव्हां मात्र अशा प्रकारच्या प्रश्नांचें महत्व लोकांस वाटूं लागतें. परंतु हिंदुस्थानांतील लोकसंख्या ह्मणजे पृथ्वीवरील लोकसंख्येचा एक बराच मोठा भाग; त्याच्या भावि स्थितीविषयीं अर्थात् सर्व इंग्लिश राष्ट्राच्या भावि स्थितीविषयीं हे लोक अगदीं बेपर्वा आहेत. मेकॉले यांनीं हिंदुस्थानाविषयीं असें ह्मटलें आहे कीं, "अल्प इंग्रज लोकांनीं घरदार सोडून, महासागर ओलांडून जाऊन, थोड्याच वर्षांत पृथ्वीच्या पाठीवरील एक मोठें अवाढव्य राष्ट्र काबीज केलें. ही गोष्ट कशी घडून आली, हें समजण्याची प्रत्येक इतिहासप्रिय इंग्लिश गृहस्थाची जिज्ञासा असणें विहित आहे. असें असून हा विषय आमच्या पुष्कळ लोकांस केवळ निरर्थक वाटतो इतकेंच नाहीं, तर फारच अप्रिय वाटतो. मग आमच्या या ह्मणण्यांतच कांहीं चूक असली तर नकळे."

इंग्लिश राज्याच्या विस्तृत्वामुळें इंग्लंडच्या स्थितींत गतशतकद्वयांत विलक्षण फरक पडला असून, हिंदुस्थान हेंही ह्या विस्ताराचा एक मोठा भाग आहे, असें समजून, या विषयाचें विवेचन पुढील भागांत आह्मी करणार आहोंत.

प्रकरण दुसरें.

हिंदुस्थानचें राज्य.

ज्याप्रमाणें मागील भागांत वसाहतीसंबंधीं विचार करण्यांत आला, त्याचप्रमाणें हिंदुस्थानच्या राज्याचाही येथें विचार करावयाचा आहे; ह्मणजे इंग्लंडच्या अर्वाचीन इतिहासांत प्रदेशविस्तार ज्या नियमानें झाला, त्या नियमांचेंच हिंदुस्थानचें राज्य, हें एक उदाहरण आहे, असें दाखविण्यांत येईल. हिंदुस्थानच्या राज्याविषयीं स्वतंत्रतेनें येथें विचार करावयाचा नाहीं; तर इंग्लंडच्या संबंधानेंमात्र त्याचा विचार कर्तव्य आहे. ह्या विषयाचें विवेचन आह्मी ऐतिहासिक दृष्ट्या व राजनीतिशास्त्रदृष्ट्या करणार आहों. ऐतिहासिकदृष्ट्या ह्मणजे ज्या कारणांनीं हिंदुस्थान जिंकलें गेलें, त्या कारणांचा विचार करणें व राजनीतिशास्त्रदृष्ट्या ह्मणजे या नवीन विस्ताराचें महत्व व चिरस्थायिकता, ह्यांजबद्दल विचार करणें.

अशा रीतीनें विवेचन करितांना आह्मांस कालानुक्रम राखतां येणार नाहीं. हिंदुस्थान देश इंग्रज लोकांनीं जिंकला, तो त्यांनीं अगदीं न समजतां ह्मणजे सहज रीत्या व मनांत कांहीं एक हेतु नसतांना जिंकला. एवढी मोठी गोष्ट अशा प्रकारची इंग्लिश लोकांच्या हातून कधींही घडून आली नाहीं. अमेरिकेंत व इतर द्वीपांतरीं वसाहती करितांनाही इंग्रज लोकांनां पूर्वीं फारसा विचार केला नव्हता, अगर एखादी मोठी युक्ति योजिली नव्हती, ही गोष्ट खरी आहे. इंग्लंडांतून कांहीं लोक व्हर्जिनिया व न्यु इंग्लंड येथें गेले, तेव्हां त्या ठिकाणीं एक मोठें प्रजासत्ताक राज्य स्थापन करण्याचा इंग्रज लोकांचा हेतु नव्हता. तरी पण ह्या गोष्टीमध्यें मूळ उद्देश कमी जास्त प्रमाणा-

नें जागृत होता, यांत संशय नाहीं. वसाहत करण्याकारितां इंग्लंडांतून लोक बाहेर गेले, तेव्हां नवीन राज्यस्थापना होईल व हें राज्य प्रजासत्ताक होईल, इतकीमुद्धां कल्पना त्यावेळीं लोकांच्या मनांत आलेली होती. त्या राज्याच्या विस्ताराचा मात्र आरंभीं अंदाज नव्हता. परंतु हिंदुस्थानाची गोष्ट तशी नाहीं. त्या ठिकाणीं इंग्रजांचा उद्देश होता एक व झालें दुसरेंच. उद्देश होता व्यापार करण्याचा व ह्या व्यापारांत कांहीं विशेष यश आलें असेंही नाहीं. हिंदुस्थानांत पाउल टाकल्यापासून शंभर वर्षेपर्यंत हिंदुस्थानांतील लोकांशीं आपल्यास युद्ध करावें लागेल, असें इंग्रज लोकांच्या मनांतही नव्हतें, व तें युद्ध सुरू झालें तेव्हांही त्यांचा उद्देश आपल्या व्यापाराचें संरक्षण करण्यापुरताच होता. त्यानंतरही इंग्रज लोकांच्या ताब्यांत बराच मुलूख येईपर्यंत, दीडशेंपेक्षां जास्त वर्षें गेलीं. एतद्देशीय राष्ट्रें जिंकून त्या ठिकाणीं आपलें राज्य स्थापन करण्याचा विचार इंग्रज लोकांच्या मनांत आला, तेव्हां १९ व्या शतकास आरंभ होऊन चुकला होता, व हल्लीं इंग्रज लोकांचें वर्चस्व सर्व हिंदुस्थानभर आहे; तेंही लार्ड डलहौसी हिंदुस्थानचे गव्हरनर जनरल होईपर्यंत, ह्मणजे सुमारें गेल्या २९—३० वर्षांपर्यंत, स्थापन झालें नव्हतें. अव्वलपासून अखेरपर्यंत इंग्रज लोक पाहत होते एकीकडे व चालले होते दुसरीकडे, अशी स्थिति होती; ह्मणून कालानुक्रमास अनुसरून पुढील विवेचन करणें अशक्य आहे. हें विवेचन करण्याकारितां ईस्ट इंडिया कंपनीच्या कृत्यांचा वार्षिक इतिहास व प्रत्येक वेळेस त्या कंपनीच्या व्यवस्थापकांच्या मनांत असलेला उद्देश पाहू लागलों, तर आमचा हेतु सिद्धीस न जातां त्या विषयासंबंधानें आह्मी अगदीं गुंग होऊन जाऊं. कारण, हिंदुस्थानचें राज्य काबीज करण्यांत या व्यवस्थापकांची इच्छा

बिलकुल नसून उलट दुसऱ्याच कारणांनीं तें काबीज केलें गेलें. या दुसऱ्या कारणांचा व्यवस्थापकांच्या इच्छेवर अंमल चालला, ह्मणून ती गोष्ट घडून आली. ह्या कारणास्तव कालानुक्रम सोडून देऊन दुसरीकडेसच सुरुवात करणें आह्मांस प्राप्त आहे, व असें करणें इतर कांहीं कारणांवरून सोईचेंही आहे. ह्मणून हें एवढें राज्य कसें स्थापन झालें, याचा विचार प्रथम न करितां त्याची हल्लींची स्थिति कशा प्रकारची आहे, याचा आपण प्रथम विचार करूं.

ह्या राज्याला इंग्रज लोकांनीं " जिंकलेला प्रदेश " (कांक्वेस्ट) असें ह्मणण्याचा अर्थ इतकाच आहे कीं, तें वसाहत केलेलें किंवा नवीन स्थापन केलेलें आहे, असें समजावयाचें नाहीं; तर ईस्ट इंडिया कंपनीनें चालू ठेविलेल्या लढायांच्या योगानें हें राज्य बनत गेलें. या लढायाचा परिणाम असा झाला कीं, तद्देशीय राजांस आपल्या ताब्यांतील मुलूख कंपनीकडे द्यावा लागला. तथापि " जिंकलेला मुलूख " असें ह्मणतांना जिंकलेला हा शब्द वास्तविक अर्थानें हिंदुस्थानांस लागतो किंवा नाहीं, हें अद्यापि पाहणें आहे.

' इंग्लंडच्या ताब्यांतील मुलूख ' हे शब्द जेव्हां मागें कित्येक वसाहतींस लावण्यांत आले, तेव्हां त्यांचा वास्तविक अर्थ काय, ह्याविषयीं मागील भागांत पुष्कळ विवेचन झालें आहे. त्या ठिकाणीं असा प्रश्न निघाला होता कीं, जर इंग्लंड या शब्दाचा अर्थ इंग्लंड देशांत राहणारे लोक आणि वसाहती या शब्दाचा अर्थ द्वीपांतरीं राहणारे इंग्रज लोक असा असेल, तर एक लोक दुसऱ्याच्या ताब्यांत आहेत, या वाक्याचा अर्थ काय ? अगर इंग्लंड या शब्दानें जर इंग्रज सरकार असा अर्थ घ्यावयाचा असेल, तर वसाहतींचें व इंग्लंडचें सरकारही वस्तुतः एकच असल्यामुळें, त्या सरकारच्या ताब्यांतील प्रजेस त्याची मालमत्ता

असें कसें ह्मणतां येईल ? असें ह्मणतां येण्यासाठीं ही प्रजा त्या सरकारानें जिंकून घेतलेली असली पाहिजे. अशा प्रकारचें विवेचन मागील पुस्तकांत झालें असून, त्या वेळीं असें निष्पन्न झालें होतें कीं, ताब्यांतील मुलूख हे जे शब्द वसाहतीला लागू नाहींत, ते शब्द त्याच अर्थानें हिंदुस्थानास लागू आहेत. तथापि लढाईच्या संबंधाचे जे शब्द फार पुरातन कालापासून प्रचारांत असल्यामुळें त्यांचे अर्थ भिन्नभिन्न होत गेले आहेत, त्यांपैकींच "जिंकलेला मुलुख" हे शब्द आहेत; ह्मणून हिंदुस्थान हा इंग्लंडच्या ताब्यांतील मुलूख, असें ह्मणतांना त्याचा वास्तविक अर्थ काय, हें पुनः विचारण्यास आह्मांस जागा आहे. ही वस्तु आमच्या ताब्यांतली आहे; तिचा उपयोग आह्मी कोणत्याही रीतीनें स्वतःकडेसच करतों. कोणा एकाच्या ताब्यांत जर कांहीं जमीन असली, तर तिची लागवड केल्यानें तिच्या मालकास उत्पन्न मिळतें व स्वतः लागवड न करतां ती साऱ्यानें दिली असतांही मालकास सारा मिळतो. प्राचीन काळीं जेव्हां एखादा देश जिंकला जात असे, तेव्हां त्याजवर जिंकणाऱ्या राष्ट्राचा ताबा वस्तुतः असे. कधीं कधीं जिंकणारे लोक जिंकिलेला मुलूख सर्व किंवा अंशतः स्वतःचे ताब्यांत घेऊन त्याची लागवड करीत. उदाहरणार्थ, खिस्ती धर्मशास्त्रांत पालेस्टाईन देशाविषयीं अशीच हकिकत दिली आहे. रोमन लोक जे देश जिंकीत, त्यांत कित्येक मुलूख लोकांपासून जप्त करून घेऊन, त्यांत रोमन नगरवासी लोक येऊन राहत असत. अशा अर्थानें 'जिंकलेला मुलूख' हे शब्द हिंदुस्थानास तिळमात्र लागू नाहींत, हें उघड आहे. हिंदुस्थानांतील जमीन इंग्लिश लोकांनीं जप्त केली नाहीं, किंवा ती मूळ रहिवाशांच्या ताब्यांतून हिसकून घेऊन त्या ठिकाणीं नवीन इंग्लिश लोक येऊन राहिले नाहींत.

"जिंकिलेला मुलुख" या शब्दांना दुसरा एक अर्थ देतां येण्या-

सारखा आहे. जिंकलेला मुलूख ह्मणजे " खंडणी देणारा मुलूख," असा अर्थ करतां येईल. एका राष्ट्राकडून दुसऱ्या वरचढ राष्ट्रास त्याचें आपल्यावर स्वामित्व कबूल करण्याकरितां खंडणी दिली जाते. खंडणी देणारा मुलूख हे शब्द संदिग्ध आहेत. त्यांचा अर्थ जर कोणते तरी कर देणारे लोक असा केला, तर जिंकून घेतलेला मुलूख आणि मूळचा स्वतःचा मुलूख यांत विशेष अंतर नाहीं. कारण, कोणत्याही लोकांना सरकारच्या खर्चाकरितां व स्वसंरक्षणार्थ ठेवलेल्या सैन्याच्या खर्चाकरितां कर द्यावा लागतोच व कोणत्याही राष्ट्राच्या खर्चाचा बोजा त्यांतील लोकांवरच असतो. ह्मणून " खंडणी देणारा मुलूख " याचा अर्थ " जिंकेलला मुलूख " अगर " ताब्यांतील मुलूख " असा करणें असेल, तर त्या प्रदेशाच्या सरकारी बंदोबस्ताकरितां लागणाऱ्या खर्चापेक्षां कांहींतरी जास्त पैसा त्या प्रदेशांतून मालकास केवळ त्याचें स्वामित्व कायम राखण्याकरितां पोहोंचला पाहिजे. अशा प्रकारें खंडणी देणारा देश हल्लीं इजिप्ट आहे. इजिप्टचें राज्य खेदीव याचे ताब्यांत आहे. राज्याच्या बंदोबस्ताकरितां लोकांकडून खेदीवास पुष्कळ पैसा मिळतो. परंतु या खर्चाशिवाय खंडणी ह्मणून, इजिप्ट देश टर्कीच्या सुलतानाच्या ताब्यांत असल्यामुळें, त्या सुलतानास कांहीं जास्त पैसा पोंहचतो, ह्मणजे हा पैसा कोणत्याही रूपानें इजिप्टच्या उपयोगाकडे लागत नाहीं. तर त्याच्या योगानें इजिप्ट देश सुलतानाच्या ताब्यांत आहे, एवढा समज मात्र कायम राहतो.

अशा प्रकारच्या खंडणीचा अर्थ इतकाच समजावयाचा आहे कीं, ज्या देशाकडून ती दिली जाते, तो देश, ज्या देशाला ती पोहोंचते, त्याच्या ताब्यांत आहे. अर्थात् शेतकऱ्याकडून जमिनीच्या मालकास जो सारा दिला जातो त्यांत व या खंडणींत अंतर नाहीं. अशा अर्थानें

हिंदुस्थान देश इंग्लंडच्या ताब्यांत आहे काय ? नाहीं. निदान दिसण्यांत व सांगण्यांत तरी असें नाहीं. हिंदुस्थानांतील लोकांना कर द्यावा लागतो, ही गोष्ट खरी; पण इंग्लंडांतील लोकांवरही कर आहेच. तेव्हां हिंदुस्थान आणि इंग्लंड यांची इंग्रज लोकांच्या संबंधानें स्थिति सारखीच समजली पाहिजे. हिंदुस्थानांतील लोकांकडून जो पैसा काढला जातो, तो हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेकडेसच खर्चला जातो, आणि ह्या राज्यव्यवस्थेस लागणाऱ्या खर्चापेक्षां जास्त पैसा लोकांकडून घेतला जात नाहीं.

आतां हिंदुस्थानावर इंग्लंडचा बोजा फार पडतो, अशी ओरड आहे, ती खरी आहे किंवा नाहीं, आणि विशेषेंकरून कोणत्या तरी सबबीवर हिंदुस्थानांतून पैसा काढून तो इंग्लंडला पोंचतो किंवा नाहीं, ह्या गोष्टींचा विचार करणें आतां आमचें काम नाहीं. कारण, आमचें काम फक्त हिंदुस्थान आणि इंग्लंड यांमध्यें कायदेशीर संबंध कोणत्या प्रकारचा आहे, हें पाहण्याचें आहे. ह्या कायदेशीर संबंधापासून गैरवर्तनानें सद्यःस्थिति किती विपरीत झाली आहे, हें पाहण्याचें आमचें काम नाहीं. 'खंडणी देणारा मुलूख' या अर्थानें ज्याप्रमाणें इंग्लंडच्या इतर वसाहती इंग्लंडच्या ताब्यांत नाहींत, त्याचप्रमाणें हिंदुस्थानही नाहीं, हें उघड आहे.

वास्तविक स्थिति अशी आहे कीं, जरी हिंदुस्थानचा आणि इंग्लंडचा हल्लींचा संबंध इतिहासदृष्ट्या लढाईमुळें स्थापन झाला आहे, तरी हिंदुस्थान देश लढाई करून जिंकून घेतला या सबबीवर इंग्लंडचा हिंदुस्थानावर उघडपणें तरी कांहीं बिलकुल हक्क पोहोंचत नाहीं. तारिख १ नवंबर स. १८५८ च्या जाहिरनाम्यानें राणी सरकारानें हिंदुस्थानाचें स्वामित्व आपल्या ताब्यांत घेतलें. त्या जाहिरनाम्यांत पुढील शब्द आहेतः—" ज्या कर्तव्यकर्मांनीं आम्ही आपल्या इतर

प्रजेशीं बांधले गेलों आहों, त्याच कर्तव्यकर्मांनीं आह्मी आमच्या हिंदुस्थानच्या प्रजेशींही बांधले आहों, असें आह्मी मानतों." ह्मणजे हिंदुस्थान देश आपण जिंकला या सबबीवर, इंग्लंडास ह्या देशावर कांहीं विशिष्ट हक्क प्राप्त झाले आहेत, असें नाहीं. अर्थात् हिंदुस्थान हा वस्तुतः जिंकून घेतलेला देश नव्हे.

हल्लीं सुधारणा जरी चहूंकडे फार वाढली आहे, तरी तिच्या योगानें लढाया अजीबात नाहींशा झाल्या, असें नसून, त्या होण्याचा संभवही कमी झाला आहे, असें नाहीं. तरी त्यांचें स्वरूप मात्र अगदीं फिरून गेलें आहे. एकानें दुसऱ्याला जिंकणें, शब्दशः पाहूं गेलें तर अद्यापिही शक्य आहे. परंतु जिंकणें या शब्दाचा अर्थ मात्र फिरला आहे. 'एखाद्या वरचड राजानें हलक्या राजाचा मुलूख अन्यायानें हिरावून आपल्या ताब्यांत घेणें,' असा जिंकणें याचा अर्थ आतां राहिला नाहीं. ह्मणून अशा प्रकारें मुलूख जिंकण्याची राष्ट्रांची इच्छा आतां पुष्कळ कमी झाली आहे. ह्यावरून हिंदुस्थान इंग्लंडच्या ताब्यांत असल्यामुळें इंग्लंडावर जबरदस्त दुर्घट जबाबदारी येऊन पडली आहे, हें उघड आहे. हिंदुस्थानापासून इंग्लंडाला कांहीं फायदा आहे किंवा नाहीं, हें मात्र उघड नाहीं.

इतक्या विवेचनावरून आमच्या वाचकांस कळून आलें असेल कीं, 'इंग्लंडच्या ताब्यांतील मुलूख' हे शब्द कोणत्याही अर्थानें हिंदुस्थानास लागू पडत नाहींत. स्वाभाविक रीतीनें बोलण्यांत स्वामित्व आणि सरकार ह्या दोन भिन्न शब्दांनीं पुष्कळ घोंटाळा केलेला दिसतो. 'आमच्या ताब्यांतील सर्वोत्कृष्ट प्रदेश' किंवा 'इंग्लिश—मणिमालेंतील दिव्य रत्न' अशा अतिशयोक्त शब्दांनीं हिंदुस्थानचें वर्णन करितांना आमचें बोलणें केवळ लाक्षणिक असतें. ज्या समाजस्थितीच्या वेळीं हे

लाक्षणिक अर्थ भरपूर लागू पडत असत, ती समाजस्थिति आतां राहिली नाहीं. हिंदुस्थान इंग्लंडच्या ताब्यांतील देश याचा अर्थ आतां इतकाच समजावयाचा आहे कीं, हिंदुस्थानची स्थिति कोणत्या प्रकारची असावी, हें इंग्लंडच्या मर्जीवर आहे, व राज्यव्यवस्थाही इंग्रज लोकांच्या स्वाधीन आहे. परंतु ताब्यांतील मुलूख या शब्दांवरून हिंदुस्थानाकडून इंग्लंडला कांहीं मदत होते, अगर प्रत्यक्ष इंग्लंडची संपत्ति आणि शक्ति वाढते, असें समजावयाचें नाहीं. यावरून ज्याप्रमाणें वसाहतींविषयीं पूर्वी प्रश्न निघाला, त्याचप्रमाणें हिंदुस्थानाविषयींही प्रथमारंभीं असा प्रश्न उद्भवतो कीं, "तर मग हिंदुस्थानापासून इंग्लंडास उपयोग काय? आशिया खंडामध्यें वीस कोट लोकांवर राज्य करून, विनाकारण जबाबदारी, काळजी आणि श्रम वाढवून घेण्याचें इंग्लंडास प्रयोजन काय?" वसाहतींच्या संबंधानें असा प्रश्न निघाला, त्या ठिकाणीं आह्मीं असें सांगितलें आहे कीं, हा प्रश्न कितीही सयुक्तिक दिसला, तरी निरर्थक आहे. कारण, असा प्रश्न करण्यापूर्वीं, इंग्लंडशीं संबंध ठेवून एकमेकांस फायदा होण्यास वसाहती व इंग्लंड यांमधील अंतर फारच मोठें आहे, असें दाखविलें पाहिजे. कारण, दोहोंमध्यें विशेष अंतर नसेल, तर वसाहतींतील लोकही मूळचे इंग्लिश व एकाच हाडामासाचे असल्यामुळें जरी ते नवीन ठिकाणीं जाऊन राहिले, तरी त्यांस निराळे टाकून देणें इंग्लंडास प्रशस्त नाहीं. अशी कल्पना करा कीं, इंग्लंडास लागूनच पुष्कळ ओसाड प्रदेश असता, व इंग्लंडची लोकसंख्या वाढल्यामुळें त्या ओसाड प्रदेशांत वसाहत करणें तेथील लोकांस भाग पडतें, तर राज्यव्यवस्थेच्या संबंधानें ते दोन देश पृथक् झाले नसते. परंतु ते एकास एक लागले नसून, दूर अंतरावर असल्यामुळें थोडीशी अडचण आहे खरी; तरी वाफेच्या व विजेच्या युक्तीनें या

दिवसांत ती अडचण अगदीं दूर होणारी आहे. परंतु इंग्लंड आणि इंग्लंडच्या वसाहती यांतील लोकांमध्यें असलेला परस्पर हाडामासाचा संबंध जमेस धरून हें वरील विवेचन आम्हीं केलें आहे. ह्मणून हें विवेचन हिंदुस्थानास लागू पडणार नाहीं. हिंदु लोक आणि इंग्लिश लोक ह्यांजमध्यें समाजसंबंधानें जितका परकीपणा आहे, तितका दुसऱ्या कोणत्याही दोन राष्ट्रांमध्यें नसेल. अलीकडे निरनिराळ्या राष्ट्रांच्या भाषा एकमेकींशीं ताडून पाहिल्यानें नवीन शोध लागले आहेत. त्यां-जवरून पूर्वी कधीं माहीत नसलेला असा एक संबंध हिंदुस्थान आणि इंग्लंड यांजमध्यें दिसून आला आहे. हिंदुस्थानच्या प्रधान भाषा व इंग्रजी भाषा या एकाच वर्गांतल्या आहेत. परंतु दुसऱ्या प्रत्येक बा-बतींत हिंदुस्थान आणि इंग्लंड यांजमध्यें भिन्न भाव आहे. या दोन राष्ट्रांच्या पौराणिक दंतकथांमध्यें कांहीं एक साम्य नाहीं. तसेंच हिंदु धर्म मुसलमानी धर्माहून जितका भिन्न आहे, त्यापेक्षांही ख्रिस्ती धर्माहून तो जास्तीच भिन्न आहे.

वर सांगण्यांत आलें आहे कीं, इंग्लंडच्या वसाहती पृथ्वीवरील ओसाड प्रदेशांत स्थापल्या गेल्यामुळें त्यांतील हल्लींची लोकसंख्या बहुतेक इंग्लिश जातीचीच आहे. निदान त्या लोकसंख्येचा बराच मोठा भाग तरी इंग्लिश जातीचा आहे. आणि असेंही वर सांगण्यांत आलें आहे कीं, दक्षिण आणि मध्य अमेरिका येथें ज्या स्पेनच्या वसाहती आहेत, त्यांची स्थिति वरप्रमाणें नाहीं. कारण, स्पेनच्या लोकांनीं ज्या प्रदेशांत वसाहती केल्या, त्या प्रदेशांत मूळचे तद्देशीय पुष्कळ लोक राहणारे होते; व ते लोक वसाहत करणाऱ्या स्पानिश लोकांचे गुलाम बनून गेले. ह्याप्रमाणें दोन प्रकारच्या वसाहती सांगण्यांत आल्या. एकीमध्यें वसाहत आणि मूळ देश ह्यांचा निकट संबंध असून, दुसरीमध्यें

तितका संबंध नाहीं. तरी पण दोनही प्रकारच्या वसाहतींमध्यें जात्यैक्य आहेच. परंतु हिंदुस्थान देश ह्या दोहोंपैकीं एकाही वर्गांत येत नाहीं. हिंदुस्थानचे लोक व इंग्रज लोक ह्यांजमध्यें हाडामासाचा संबंध नाहीं. जरी हिंदुस्थानामध्यें इंग्रज लोक येऊन वसाहत करून राहिले असते, तरी अशी वसाहत करणाऱ्यांची संख्या हिंदु लोकांच्या* मानानें फारच क्षुल्लक राहिली असती. परंतु अशी गोष्ट घडून आली नाहीं. इंग्लिश लोकांनीं हिंदुस्थानांत येऊन राहण्याच्या कामांत स्वभावसिद्धच एक मोठा जबरदस्त अडथळा आहे. हिंदुस्थानची हवा इंग्लंडच्या हवेहून इतकी भिन्न आहे कीं, इंग्लिश लोक हिंदुस्थानांत येऊन राहिले, तर तेथें त्यांची वाढ व्हावयाची नाहीं.

ह्यावरून इंग्लंडचा इतर वसाहतींशीं संबंध जितका स्वाभाविक व सयुक्तिक आहे, तितका हिंदुस्थानाशीं इंग्लंडचा संबंध अस्वाभाविक व अयुक्तिक आहे, असें प्रथम दर्शनीं तरी निदान दिसतें. ह्या दोन देशांमध्यें स्वाभाविक संबंध कोणताही दिसत नाहीं. जात्यैकता नाहीं, धर्मैक्य नाहीं. ब्राह्मणी धर्म व मुसलमानी धर्म ह्यांहून ख्रिस्ती धर्म अगदीं निराळा आहे. तसेंच, ह्या दोन देशांमध्यें समानार्थित्वही विशेष नाहीं. सामान्यतः, समानार्थित्व ज्याप्रमाणें इतर कोणत्याही दोन देशांमध्यें असूं शकेल, त्यापेक्षां जास्त ह्या दोन देशांत नाहीं. एकमेकांच्या मालाची जरूर एकमेकांस असणें, हें सामान्य समानार्थित्व समजावयाचें. ह्या परस्पर मालाच्या अदलाबदलीशिवाय दुसरा कोणताही फायदा एक-

---

* हिंदुस्थानांत राहणारे सर्व लोक जरी हिंदु नाहींत व इतर पुष्कळ जातींचे लोक तेथें आहेत, तरी प्रस्तुत विवेचनास सोइस्कर समजून हिंदु हाच शब्द हिंदुस्थानांत राहणाऱ्या सर्व प्रकारच्या लोकांस आह्मीं लाविला आहे. शब्दाचा एकदेशीय खरा अर्थ तेवढाच घेऊन चालूं नये.

मेकांस एकमेकांपासून होतो, असें अगदीं ह्मणतां येणार नाहीं. इंग्लंडचा विशेष फायदा अमेरिका आणि युरोप ह्यांजपासून होतो, व हिंदुस्थान अगदीं एका बाजूस असल्यामुळें त्यास परदेशापासून जर कांहीं फायदा असेल, तर तो अफगाणिस्थान, इराण, मध्यएशिया वगैरे देशांपासून होईल व ह्या देशांशीं इंग्लंडचें दळणवळण हिंदुस्थानच्या बाहेरून चालण्यास मार्ग नाहीं.

हिंदुस्थान जिंकतांना घडून आलेल्या गोष्टी जरी आमच्या मतें विशेष चमत्कारिक नाहींत, तरी स्पेनच्या लोकांनीं अमेरिकेंतील मुलूख जिंकिल्यामुळें जे विलक्षण परिणाम घडून आले, त्यांहूनही जास्त विलक्षण परिणाम इंग्लिश लोकांनीं हिंदुस्थान जिंकिल्यामुळें घडून आले आहेत. ह्याजबद्दल इंग्रज लोकांस समाधान वाटो अगर न वाटो. त्यांनीं हिंदुस्थान जिंकलें ही गोष्ट इंग्लंडच्या अर्वाचीन इतिहासांत फारच महत्वाची आहे, हें खरें आहे. ह्या गोष्टीस त्या इतिहासांत प्रधान स्थल मिळणें अगदीं अवश्य आहे. इंग्लंडच्या इतिहासकारांनीं ह्या गोष्टीकडे लांब नजर पोंचवून पाहिजे तितकें विवेचन केलें नाहीं, हें बरोबर नाहीं. ह्या गोष्टीचें महत्व किती आहे, हें केवळ तिच्या विलक्षण स्वरूपावरून समजून येणारें नाहीं. तिचा विस्तार समजेल, तरच महत्वही समजेल. हिंदुस्थान जिंकतांना केवढ्या प्रचंड कामास इंग्रज लोकांनीं हात घातला होता, ह्याजबद्दल पुष्कळ लिहिलें गेलें आहे; परंतु आश्चर्य हें कीं, त्या लिहिण्याचा व्हावा तसा परिणाम झालेला दिसत नाहीं. कांहीं एक अवधीच्या पलीकडे एखाद्या गोष्टीचा विस्तार केला, तर त्या विषयांत मति न चालतां ती कुंठित होते. इंग्लंडमध्यें तेथील राज्यव्यवस्थेसंबंधीं एखादा प्रश्न उद्भवला असतां, तो प्रश्न जितका मोठा असेल, तितकें लोकांचें मन तिकडे जास्त ओढलें जातें. परंतु हिंदुस्थानसंबंधीं

तर विपरीतच स्थिति दिसून येते. हिंदुस्थानसंबंधीं मोठमोठाले प्रश्न पुढें आले असतां, त्यांजबद्दल मति कुंठित होऊन, लोकांचीं मनें बेपर्वा होऊन राहतात. रोमन लोकांचें राज्य जेवढें पूर्वी एकदां अतिशय विस्तार पावलें होतें, तेवढेंच हल्लींचें हिंदुस्थानचें राज्य आहे, व एवढ्या मोठ्या राज्याची जबाबदारी इंग्लिश लोकांच्या माथ्यावर आहे, असें सांगितलें असतांही, तिकडे लोकांचें लक्ष लागत नाहीं, एवढाच काय तो त्या सांगण्याचा परिणाम होतो. न्यायानें जर 'असें कां' ह्मणून इंग्रज लोकांस प्रश्न केला, तर आपली वर्तणूक योग्य आहे, हें त्यांस सिद्ध करून देतां येईल काय? पृथ्वीवर इतर ठिकाणीं मोठमोठे प्रदेश असणें स्वाभाविक आहे. तर लहान व मोठा यांत फारसा फरक नाहीं, अशी तर इंग्रज लोकांची कल्पना होऊन गेली नसेलना? कारण, हिंदुस्थान मोठें आहे ह्मणून जर इंग्रज लोकांस सांगितलें, तर कानडा व आस्ट्रेलिया हे प्रत्येकी हिंदुस्थानापेक्षांही मोठे आहेत; व ह्यांजकडे जर आह्मी फारसें लक्ष देत नाहीं, तर हिंदुस्थानची काय कथा, असें उत्तर मिळेल. हें खरें आहे. परंतु असें ह्मणण्यांत कानडा, आस्ट्रेलिया आणि हिंदुस्थान यांच्यामधील एक ठळक भेद वरील बोलणारांच्या लक्षांत नसतो. कानडा आणि आस्ट्रेलिया यांतील प्रदेश जरी फार मोठा आहे, तरी त्या मानानें तेथील लोकसंख्या फार थोडी आहे, व हे दोन देश इंग्लंडपासून जसे दूर आहेत, तसेच युरोपच्या इतर बलाढ्य राष्ट्रांपासूनही दूर आहेत. ह्मणून त्या राष्ट्रांशीं ह्या देशांच्या संबंधानें इंग्लंडास लढाई करण्याचा प्रसंग येणें संभवत नाहीं. परंतु हिंदुस्थानची स्थिति याहून अगदीं भिन्न आहे. हिंदुस्थानची वस्ती युरोपच्या वस्तीइतकी दाट असून, कांहीं भागांत तर युरोपांतील अतिशय दाट वस्तीच्या भागांपेक्षांही जास्त आहे. 'हिंदुस्थानामध्यें

आजपर्यंत मोठमोठ्या लढाया करण्याचा प्रसंग इंग्रजांस आला. सन १८१८ या वर्षी लॉर्ड हेस्टिंग्स ह्यानें मराठ्यांबरोबर दुसरी लढाई चालू केली, तेव्हां त्यास एक लक्षाहून जास्त सैन्य लढाईस आणावें लागलें. तसेंच इंग्लंडपासून हिंदुस्थान जरी दूर आहे, तरी युरोपीय राज्यप्रकरणांपासून हिंदुस्थान अलिप्त आहे, असें नाहीं. उदाहरणार्थ, सर्व अठराव्या शतकभर हिंदुस्थानरूपी पटावर इंग्लंड आणि फ्रान्स हीं दोन राष्ट्रें मोठ्या कौशल्यानें बुद्धिबळें खेळत होतीं. आणि सुमारें १८३० पासून रशियाशीं जो इंग्लंडचा तंटा उपस्थित झाला आहे, त्याचें फक्त एकच कारण आहे, व तें हिंदुस्थान होय. त्या वेळेपासून हा हिंदुस्थानचा प्रश्न दर दिवस जास्त महत्वाचा होत चालला आहे.

ह्मणून हिंदुस्थानची तुलना करणें असेल तर आस्ट्रेलिया, कानडा, वगैरे विरळ वस्तीच्या देशांशीं न करितां, युरोपांतील इतर देशांशीं करणें रास्त होईल. ह्मणून हें हिंदुस्थानचें राष्ट्र केवढें मोठें आहे, ह्याचा क्षणभर विचार करूं, व अशाच प्रकारचीं इतर राष्ट्रें जीं सर्वांस माहीत असतील, त्यांच्याशीं त्याची तुलना करून पाहूं. प्रथमतः आपण रशियाखेरीज करून बाकीच्या युरोपाविषयीं विचार करूं. रशियाखेरीज बाकीचे युरोपांतील देश थोड्या शतकांपूर्वी अर्वाचीन इतिहासाचें केवळ नाटकगृहच बनून राहिले होते. रोमन महाराष्ट्रांत समावेश होणारे सर्व देश, जर्मनीचा सर्व भाग, स्लावोनिक देश* आणि स्कान्डिनेविया†, ह्या सर्वांचा आह्मी ह्मणतों यांत समावेश होतो. लोकसंख्या आणि विस्तार ह्यांच्या मानानें पाहतां, एकटा हिंदुस्थान देश या सर्व देशांच्या बरोबरीचा आहे. एवढ्या

---

* नीपर व डान या नद्यांच्या उगमाजवळचे प्रदेश.

† स्वीडन व नार्वे.

मोठ्या देशावर डौनिंग स्ट्रीटमधून* थोडेसे लोक येऊन राज्य करितात. ह्या राज्याच्या जमाखर्चाच्या हिशोबाचा वार्षिक तक्ता पसंत करितांना हाउस आफ् कॉमन्स सभेस त्याचा विलक्षण तिटकारा येतो. तर हें राष्ट्र नेपोलियनच्या त्या वेळच्या अतिविस्तृत राष्ट्रापेक्षांही जास्त मोठें आहे. इतकें असूनही हें राज्य दक्षिण अमेरिकेंतील स्पानिश राष्ट्रासारखें ओसाड नाहीं, तर अगदीं गच्च भरून गेलें आहे. प्राचीन सुधारणेचे परिणाम त्या ठिकाणीं अद्याप कायम आहेत. भिन्न भाषा, भिन्न धर्म, भिन्न तत्वज्ञान, व विद्याज्ञानावर असंख्यात भिन्न भिन्न ग्रंथ, हीं सर्व एकाच ठिकाणीं ह्या हिंदुस्थानांत उपलब्ध आहेत.

ह्या एवढ्या प्रचंड विषयाचे सोइस्कर भाग केले असतां, विचार करण्यास ठीक पडेल. सर्व युरोपची कल्पना मनांत आणिली असतां, आमच्या मनावर विशेष परिणाम होण्याचें कारण इतकेंच कीं, युरोप ह्मटल्याबरोबर एकदम सहा सात मोठीं राष्ट्रें मनांत येतात. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, आस्ट्रिया, इटली, स्पेन, ग्रीस, या सर्वांची कल्पना युरोप ह्मटल्याबरोबर मनांत येते. त्याचप्रमाणें हिंदुस्थानही अशा निरनिराळ्या मोठ्या राष्ट्रांनीं बनलेलें असतें, तर हिंदुस्थानाचाही परिणाम आमच्या मनावर युरोपप्रमाणेंच झाला असता. परंतु हिंदुस्थानचा एकच भाग घेतला, तरी फक्त त्या भागाची लोकसंख्या रशियाखेरीज युरोपांतील कोणत्याही एका राष्ट्रापेक्षां जास्त असून, युनायटेड् स्टेट्सच्या लोकसंख्येपेक्षांही जास्त आहे. हा भाग कोणता ह्मणाल तर बंगाल प्रांत होय. ह्या प्रांतावर एक लेफ्टेनंट गव्हर्नर अंमल करीत असतो. येथील लोकसंख्या सहा कोटी साठ लक्षांहूनही जास्त असून, ती फ्रान्स देशाच्या विस्तारा-

* लंडन शहरांत ज्या भागांत सर्व सरकारी कचेऱ्या आहेत, त्या भागास डौनिंग स्ट्रीट असें नांव आहे.

पेक्षांही कमी प्रदेशांत मावलेली आहे. दुसरे आणखी दोन प्रदेश आहेत, त्यांची तुलना युरोपीय राष्ट्रांशीं करतां येईल. एक वायव्येकडील प्रांत हा ऐर्लंड खेरीज करून ग्रेटब्रिटनएवढा मोठा आहे; व क्षेत्रफळ जरी त्याजपेक्षां थोडें कमी आहे, तरी लोकसंख्या ग्रेटब्रिटनपेक्षां जास्त आहे. दुसरा मद्रास इलाखा हा वरच्यापेक्षां मोठा असून, ऐर्लंडसहित बहुतेक ग्रेटब्रिटनच्या बरोबर होईल. तो लोकसंख्येनें थोडा कमी आहे. ह्याची लोकसंख्या इटलीच्या लोकसंख्येएवढी आहे. या वरील तीन भागांपैकीं प्रत्येक भागाची लोकसंख्या दोन कोटींहून जास्त आहे. नंतर दुसरे दोन भाग, पंजाब इलाखा आणि मुंबई इलाखा. ह्यांपैकीं प्रत्येकाची लोकसंख्या जवळ जवळ दोन कोटींची आहे. पंजाब हा लोकसंख्येनें स्पेनदेशापेक्षां थोडा मोठा आहे; व मुंबई इलाखा लोकसंख्येनें जरी ग्रेट ब्रिटन आणि ऐर्लंड ह्यांजपेक्षां थोडा लहान आहे, तरी क्षेत्रफळानें त्यांच्या बरोबरीचा आहे. तिसऱ्या वर्गांत औध आणि मध्यप्रांत हे येतात. औध हा बेलजियम आणि हॉलंड या दोहोंपेक्षांही मोठा असून, मध्यप्रांत हा ह्या दोहोंच्या बरोबरीचा आहे. येथपर्यंत सांगितलेले सर्व प्रांत व आणखी कांहीं लहानसहान प्रांत मिळून सर्व प्रत्यक्ष इंग्रज सरकारच्या अंमलाखालीं आहेत. परंतु वस्तुतः इंग्रज सरकारच्या ताब्यांतील मुलूख याहीपेक्षां जास्त आहे. नेपोलियनचें राज्य ह्मणून जेव्हां आपण बोलतों, तेव्हां त्याच्या कामदारांनीं प्रत्यक्ष अंमल केलेला मुलूख एवढाच आपण त्यांत धरितों असें नाहीं, तर इतर दुसरीं पुष्कळ राष्ट्रेंही धरतों; कारण तीं जरी बहुतेक अंशीं स्वतंत्र होतीं, तरी तीं नेपालियन ह्याचा आपल्यावर ताबा कबूल करीत असत. ऱ्हाईन नदीच्या आसपास एकोप्यानें राहणारीं कांहीं संस्थानें होतीं, त्यांनीं सर्वानुमतें नेपोलियन आपणां सर्वांवर मुख्य असून,

आपला संरक्षणकर्ता आहे असा ठराव केला होता. त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतही वरील प्रदेशाशिवाय कित्येक राज्यें आहेत, व तीं बहुतेक स्वतंत्र आहेत, तरी तीं आपल्यावर इंग्लिश सरकारचा ताबा कबूल करितात. अशा प्रकारच्या स्वतंत्र राज्यांची लोकसंख्या युनायटेड् स्टेट्सच्या लोकसंख्येपेक्षां जास्त आहे.

प्रत्यक्ष इंग्लंडमध्यें लोकसंख्या फारच वाढली आहे, ह्मणून स्वतःच्या राजनीतीचे प्रश्न फार बिकट झाले असतांही, बहुतेक युरोपएवढें दुसरें एक मोठें राज्य चालविण्याची विलक्षण जबाबदारी इंग्रज लोकांवर आहे, हें कोणास खरें वाटेल काय? ह्या राज्याविषयीं अगदीं ठळक ठळक माहितीसुद्धां इंग्रज लोकांस नसणें, निदान ती करून घेण्याची इच्छा तरी नसणें, शक्य आहे, असें कोणास वाटेल काय? आणि अशा प्रकारची माहिती मिळविण्याचे प्रयत्न करूनही, इतक्या दूरवरच्या भानगडीच्या राज्यव्यवस्थेविषयीं खरें मत प्रदर्शित करणें, शक्य होईल काय?

आजपर्यंत अशा प्रकारचीं पुष्कळ महाराष्ट्रें होऊन गेलीं व बहुधां अशा महाराष्ट्रांचीं राज्यसूत्रें प्रमित व कुशल गृहस्थांच्या हातांत होतीं. रोमचा राज्यकारभार शेवटीं एकट्या मुत्सद्याच्या माथ्यावर टाकून स्वस्थ बसणें, तेथील लोकांस भाग पडलें. नगरवासी ह्या नात्यानें त्याजबद्दल तो मुत्सद्दी कोणाही रोमन इसमास जबाबदार नव्हता. प्राचीन काळीं जी कांहीं स्वतंत्रता त्यांस होती, तीही ते ह्या वेळीं गमावून बसले होते. अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांत अफाट प्रदेशावर प्रजासत्ताक राज्य असून, तें सुरक्षितपणें चाललें आहे असें आपण पाहतों खरें; परंतु त्यांत विशेष फरक असा आहे, कीं सर्व प्रदेश अफाट आहे, तरी आटोपसर व एकास एक लागून आहे, आणि लोक-

संख्या कितीही मोठी असली, तरी ती बहुधा सजातीय आहे. ही स्थिति बदलून जर समुद्रविभागित दूर अंतरावरच्या एखाद्या राष्ट्राच्या ताब्यांत संयुक्त संस्थानांचा प्रदेश गेला, तर तेथील स्थितीमध्यें एकदम मोठा फेर पडेल. ह्या सर्व राष्ट्रांत व हिंदुस्थानच्या राज्यांत विशेष असाधारण फरक असा आहे कीं, इंग्लिश लोकांपासून हिंदु लोक फार दूर अंतरावर आहेत. ते त्यांजपासून फारच विजातीय आहेत. त्यांची विचारसरणि व रहाटी राज्यकर्त्यांच्याहून अगदीं भिन्न आहे. असें असतां, सार्वजनिक मतानुरूप थोड्याशा कुशल राज्यकरणधुरंधर पुरुषांकडून त्या देशावर राज्यकारभार करण्याचा प्रयत्न चालू आहे. आतां हें सार्वजनिक मत हिंदुस्थानांत कोणत्या प्रकारचें आहे, हें सांगितलें पाहिजे. थोड्या, प्रमुख व स्पष्ट अशा साध्या कल्पनांनीं सार्वजनिक मत बनलें असतें, ह्मणून देशाचें वास्तविक हित काय आहे, व तेथील राज्यपद्धति कोणत्या प्रकारची असावी, हें बिनचुक लोकांच्या मनांत भरलें असलें, ह्मणजे कितीही गहन प्रश्न आले, तरी सार्वजनिक मत वांकडें जाणार नाहीं. परंतु एके ठिकाणीं एक पद्धति चालू असली, तर दुसऱ्या ठिकाणीं दुसरीच चालणार; कोणत्याही दोन गोष्टींमध्यें साम्यता फारशी नसून, वैषम्य तर उघड आहे, व प्रत्येक ठिकाणीं घोटाळा दृष्टीस पडतो, अशी ज्या ठिकाणीं स्थिति असते, त्या ठिकाणीं लोकमत एकच ठाम असें कसें असूं शकेल? अशा प्रकारची भानगड हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत आहे. इंग्लंडचा राज्यकारभार व वसाहतींचा राज्यकारभार ह्या दोहोंहूनही हिंदुस्थानची राज्यपद्धति अगदीं निराळी आहे, ह्मणून तेथील लोकांना ती सुगम नाहीं. ज्या गोष्टी राज्यकर्त्यांकडून अमलांत येतात, त्या स्वस्थपणें ऐकून व पाहून लोकांना त्यांबद्दल राग आला, तरी राज्यकर्ते परजातीय असल्यामुळें त्यांस निराश होऊन

मनांत कुरकुर करीत स्वस्थ बसावें लागतें. राज्यकर्त्यांचे हातांत सर्व देशाची मालकी आहे. ह्या मालकीचा चिरस्थायीपणा लष्करी बळावर अवलंबून राहतो. रयतेकडून वसूल घेण्याची रीति युरोपच्या रीती-सारखी नाहीं. मीठ, अफू वगैरे जिनसांचे मक्ते पूर्णत्वानें राज्यकर्त्यां-कडेस असून, तेच जमिनींचे मालक असें समजून लोकांकडून वसूल घेतला जातो. असे शेंकडों फरक इंग्लंडच्या व हिंदुस्थानच्या राज्यपद्धतींत आहेत.

कोणी असा प्रश्न करतील कीं, हें सर्व कशाकरितां आहे? आह्मीं वर सांगितलेंच आहे कीं, इंग्लंडचा हिंदुस्थानाशीं संबंध राहिल्यानें इंग्लंडास प्रत्यक्ष कांहीं फायदा नाहीं. ह्मणून अप्रत्यक्ष फायदे कोणते आहेत, हें पाहिलें पाहिजे. हल्लीं असें आढळून येत आहे कीं, ह्या दोन देशांतील व्यापार हळू हळू फार वाढत आहे. हिंदुस्थान देश इं-ग्लिशांच्या ताब्यांतून गेला तर, अगर इंग्लिश व्यापाऱ्यांस हिंदुस्थानाशीं व्यापार करण्याची मनाई झाली तर, इंग्लिश व्यापारास दरसालचें नुक-सान सहा कोट पौंड होईल. हा जो फायदा इंग्लंडास आहे, त्याच-प्रमाणें हिंदुस्थानचें ओझेंही इंग्लंडावर फार आहे. हिंदुस्थान ताब्यांत असल्यामुळें इंग्लंडचा परराष्ट्रांशीं संबंध फार धोक्याचा झाला आहे.

लष्करी जोरानें एखादा मुलूख आपल्या ताब्यांत ठेवणें, ह्मणजे बुद्ध्या जात्याचा दगड स्वराष्ट्राच्या गळ्यांत अडकावून घेण्यासारखें आहे. स्वसंरक्षणाकरितां किंवा दुसऱ्या कांहीं कामाकरितां ज्या सैन्याचा उपयोग करितां येईल, तें सैन्य हा प्रदेश ताब्यांत ठेविल्यामुळें त्यांत विनाकारण कोंडून गेल्यासारखें होतें. आफ्रिका आणि आशिया खंडांत फ्रेंच न-वीन मुलूख जिंकण्याचे जे बेत करीत ते पाहून जर्मनींचे प्रसिद्ध मुत्सद्दी बिस्मार्क यांस फारच आनंद होत असे; कारण, नवीन मुलूख जिंकण्याचे

प्रयत्न केल्यामुळें फ्रेंचांचें सैन्य दुभागलें जाऊन, त्यांची शक्ति युरोपांत कमी होण्याचा संभव असे. ह्यावरून स्वतः लष्करी बाण्याचे नसूनही जर वीस कोटी लोक लष्करी जोरानें ताब्यांत ठेवणें इंग्रज लोकांस भाग पडलें असतें, तर हें ओझें इंग्लंडच्या शक्तीच्या बाहेरचें झालें असतें, ह्यांत शंका नाहीं. परंतु प्रस्तुतची स्थिति अशी नाहीं. कारण, इंग्रजांनीं हिंदुस्थान देश जिंकला, व हल्लींही तो त्यांच्या ताब्यांत आहे, तरी ह्या कृत्यास लागणारें सैन्य हिंदु लोकांचें असून त्याचा पगार हिंदुस्थानांतूनच दिला जातो, हें विशेष स्पष्टपणें पुढें सांगण्यांत येईल. हिंदुस्थानांत इंग्रजांचें सैन्य फक्त ६९ हजार आहे. इतकें सैन्य हिंदुस्थानांत गुंतून गेलें, एवढेंच इंग्लंडचें नुकसान ह्यामुळें झालें, असें नाहीं; तर हिंदुस्थान हातांत असल्यानें परराष्ट्राशीं इंग्लंडचे व्यवहार फारच कठिण झाले आहेत. कोणत्याही राष्ट्राचें विशेष सुख ह्मटलें ह्मणजे हें आहे कीं, त्यानें स्वतःचें ह्मणून जेवढें कांहीं असेल, तेवढ्यांत समाधान पावून दुसरीं राष्ट्रें काय करीत आहेत, हें पाहण्याची त्यास जरूर राहूं नये. वाशिंग्टन ह्मणून जो विख्यात गृहस्थ संयुक्त संस्थानांत होऊन गेला, त्यानें हेंच समाधानाचें तत्व आपल्या लोकांस विशेष शिकवून दिलें आहे. इंग्लंड देशाला हें सुख मिळणें कठिण आहे. हिंदुस्थान सोडून दिलें, तर कदाचित् जास्त सुख इंग्लंडाला मिळेल. इंग्लंडच्या वसाहती ज्या ज्या ठिकाणीं आहेत, त्या त्या ठिकाणीं जवळचीं राष्ट्रें बहुतेक शांत, गरीब, व रानटी स्थितींत आहेत, ह्मणून वसाहती ताब्यांत राहणें इंग्लंडास फारसें अनिष्ट नाहीं. तसेंच युरोपामध्यें परस्पर राष्ट्रांचीं भांडणें चाललीं असतां, पूर्वींप्रमाणें इंग्लंडास त्यांजबद्दल आतां फारशी काळजी करण्याचें कारण राहिलें नाहीं; तथापि आशिया खंडाच्या संबंधानें इंग्लंडास विशेष काळजी बाळगण्याचें कारण आहे. तुर्कस्थानांत कांहीं थोडीशी चलबिचल झाली;

ईजिप्टमध्यें कांहीं नवीन प्रकार उद्भवला; इराण, तुर्कस्थान, ब्रह्मदेश, किंवा अफगाणिस्थान, ह्यांजमध्यें कांहीं लहानशी हालचाल झाली; तरी डोळ्यांत तेल घालून इंग्लंडास आपलें लक्ष तिकडे पुरवावें लागतें. ह्या सर्वांचें कारण हिंदुस्थान होय. आशिया खंडाचे राष्ट्रांत इंग्लिश सत्तेला प्रधानत्व आलें आहे. ज्या ज्या देशांतून हिंदुस्थानांत येण्याचे मार्ग आहेत, त्या त्या देशांच्या कारभारांत इंग्लिश लोकांस विशेष महत्व वाटण्यास कारण आहे. ह्यामुळेंच इंग्लंडचें रशियाशीं आज पुष्कळ वर्षे वैर चालू आहे, व हें एकुणिसाव्या शतकांतलें वैर ह्मणजे यःकश्चित् लहानसें नसून, अठराव्या शतकांतील फ्रान्सबरोबर चाललेल्या अमेरिकेबद्दलच्या तंट्याप्रमाणेंच मोठें जबरदस्त आहे.

प्रस्तुत भागांत हिंदुस्थानसंबंधीं प्रश्न किती गहन आहेत, एवढेंच व्यक्त करून दाखवावयाचें आहे. प्रथमारंभींच ज्या गोष्टी सांगण्यांत आल्या आहेत, त्यांजवरून हिंदुस्थानसंबंधीं राज्यप्रकरणांत मन घालण्याची कदाचित् कोणास विशेष हुरूप येणार नाहीं. कारण, हिंदुस्थान ताब्यांत असल्यानें इंग्लंडचा फायदा आहेच, असें निश्चित नसून, विलक्षण कठिण घोटाळ्याचे प्रश्न पुढें येऊन जबरदस्त जबाबदारी मात्र इंग्लंडावर पडली आहे. हें खरें असेल तर, सहज कोणास असें वाटण्याचा संभव आहे कीं, व्यापारोद्देशानें आलेल्या थोड्याशा लोकांच्या हातीं बुद्धिप्रभावेंकरून शूरपुरुषाग्रगण्य क्लाईव्ह साहेबानें राजसत्ता आणून दिली, व सतत शंभर वर्षे लढाई चालू ठेवण्याचा दिव्य क्रम सुरू केला, हें फार अनिष्ट झालें. कित्येक नामांकित मुत्सद्यांनीं आपलें सर्व आयुष्य हिंदुस्थानच्या विषयांत घालून, शेवटीं असें मत बांधलें आहे कीं, हें राज्य क्षणिक असून, त्यांतून इंग्रज लोकांस लवकरच आपला पाय काढावा लागेल. परंतु इतकें निराश होण्यास आह्मांस कांहींच कारण दिसत नाहीं.

आणखी असें आहे कीं, या विषयाचें विवेचन करीत असतां, फार विद्वान लोकांचीही सहज चुकी होण्याचा संभव आहे. हिंदुस्थानांत इंग्रजांची सत्ता अमुक एका वेळीं स्थापन झाली, हें सांगणें जसें कठिण आहे, तसेंच तिचा लय केव्हां होईल, हें सांगणें फार कठिण आहे. इतिहासामध्यें अशासारखें दुसरें उदाहरण सांपडत नाहीं, कीं ज्याच्यावरून हिंदुस्थानाविषयीं कांहीं तरी अटकळ करितां येईल. बाह्य स्वरूपावरून पाहिलें असतां, दूर द्वीपांतून थोड्याशा लोकांनीं हिंदुस्थानांत येऊन, तेथें कायमची सत्ता चालविणें हें जसें अशक्य दिसतें, तसेंच हिंदुस्थान हातीं येईपर्यंत अशी गोष्ट घडेल, असें कोणासही वाटलें नव्हतें. निदान इतकें खरें कीं, ह्या राज्याचा जर अंत व्हावयाचा असेल, तर तो होण्यापूर्वी त्याचीं कारणें आह्मांस दाखवितां आलीं पाहिजेत. सुरक्षितपणें राज्य चालण्यास पुष्कळ हरकती आहेत, हें जरी सहज दाखवितां आलें, तरी ह्या राज्याचा नाश जवळ आला आहे, असें सिद्ध करण्यास साहजिक कारणें दिसत नाहींत. बरें, हिंदुस्थान ताब्यांत घेण्यास जे श्रम इंग्लंडास पडले आहेत, ते अद्यापि भरून आले नाहींत, हें आपण कबूल केलें तर, निदान हें नाकबूल तरी न केलें तर, ह्या कबूल करण्यापासून प्रस्तुत विवेचनास फारसा उपयोग होणार नाहीं. कारण, ही गोष्ट कबूल असली, तरी तिजमुळें ह्मणजे इंग्रज लोक आज हिंदुस्थान सोडून जातात, असें बिलकुल नाहीं.

हिंदुस्थानासारखें राज्य इंग्लंडच्या ताब्यांत नसतें तर, व इंग्रज लोक स्वस्थ राहून हल्लीं जसे चीन देशाशीं व्यापार करतात त्याप्रमाणेंच हिंदुस्थानाशीं व्यापार करते तर, इंग्लंडची स्थिति हल्लींच्यापेक्षां जास्त चांगली राहती, असें ह्मणण्यास जागा आहे. तरी इंग्लिश लोक हिंदुस्थान सोडून जातील, ही गोष्ट कधीं होणार नाहीं. कधीं तरी

हिंदुस्थान सोडून त्यांस जावें लागेल, असें ज्या गृहस्थांस वाटतें, तेही इंग्रजांनीं हिंदुस्थान आज सोडून जावें, असा सल्ला देणार नाहींत. कांहीं कृत्यें अशीं आहेत कीं, तीं घडलीं नसतीं तर बरें झालें असतें, असें मागून वाटतें. तथापि एकदां घडून आल्यावर तीं पूर्ववत् न घडून आल्यासारखीं करतां येणार नाहींत. इंग्रजांस हिंदुस्थान सोडून जाण्याचा समय कदाचित् पुढें येणार असला, तरी आपल्यास येथें कायमचें राज्य कर्तव्य आहे, असें समजूनच प्रस्तुत त्यांनीं चाललें पाहिजे. असें समजून चालण्यांत इंग्लंडचीच विशेष शोभा आहे, असें नाहीं. कित्येक असें ह्मणतात कीं, आपल्या वाडवडिलांनीं आपले प्राण खर्चून जो मुलूख कमाविला, व ज्याच्याबद्दल सर्व राष्ट्रांस आपल्या शूरत्वाविषयीं अभिमान वाटत आहे, तो आपण होऊन सोडून देणें आपणांस मोठें लांछन आहे. अशा प्रकारच्या कृत्यांत मानहानि मानणें आह्मांस फारच चुकीचें दिसतें. फार प्राचीन काळच्या ज्या कित्येक गांवढळ कल्पना आपणांस अवगत आहेत, त्यांपैकींच ह्या वरील कल्पना असून, आतां त्या फार क्वचित् दृष्टोत्पत्तीस येतात. राजसत्ता व एखाद्या मालमत्तेवरील आपली सत्ता या दोन शब्दांच्या अर्थांचा एकत्र घोटाळा होऊन वरील चुकीच्या कल्पनांचा आरंभीं उद्भव झाला. प्रस्तुत आपण मानहानि वगैरे सोडून देऊन इंग्लंड व हिंदुस्थान या उभयतांचें कल्याण कशांत आहे, हें पाहिलें पाहिजे, व त्यांतही विशेषेंकरून हिंदुस्थान देश इंग्लंडहून ज्यास्त मोठा व जास्त दरिद्री असल्यामुळें इंग्लंडपेक्षांही हिंदुस्थानचेंच कल्याण कोणतें, हें प्रथम पाहिलें पाहिजे. या तत्वास अनुसरून व हिंदुस्थानचें कल्याण ध्यानांत धरून, हिंदुस्थान सोडून जाण्याची कल्पना इंग्रज लोकांनीं मनांत आणणें, हें हिंदुस्थानास अपायकारक होईल. फक्त इंग्लंडचें कल्याण पाहूं लागलें असतां असें करणें, कदाचित् प्रशस्त वाटेल

पण प्रशस्त वाटलें तरी ही गोष्ट सोपी नाहीं. कारण, हल्लीं हिंदुस्थानाशीं इंग्लंडचा व्यापार फार वाढला असून, विशेषतः अलीकडील थोड्या वर्षांत इंग्रज लोकांनीं मोठमोठ्या भांडवलाच्या रकमा व्यापारांत घातल्या आहेत. तथापि हिंदुस्थानचेंच कल्याण पाहूं गेलें तर इंग्लिश लोकांनीं हिंदुस्थान देश सोडून जाणें अगदीं अशक्य आहे. मग हिंदुस्थानावर राज्य करण्याची इंग्रजांची पद्धति कितीही दुराचाराची असो, व लोकांना ती कितीही अयोग्य व व्यर्थ खर्चाची वाटो. आज हिंदुस्थान सोडून जाण्याजोगें असाधारण कृत्य करण्यानें हिंदुस्थानचें पुढें काय होईल, हा विचार मुख्यत्वेंकरून इंग्रजांच्या मनांत वागावा. मुसलमान लोक हिंदुस्थानांत राज्य करूं लागले, तेव्हांपासून ज्या ज्या लोकांचीं राज्यें हिंदुस्थानांत झालीं, त्या सर्वांत इंग्रजांचें राज्य चांगलें आहे, ही गोष्ट नाकबूल करणें फार साहसाचें आहे. इंग्रज सरकारचे राज्य करण्याचे यत्न अंतीं विफल झाल्यामुळें जी दुर्दशा हिंदुस्थानची होईल, ती पूर्वीं असलेल्या दुर्दशेपेक्षां कांहींच नाहीं, असें ह्मणावें लागेल. मुळींच व्यवस्थेशीर राज्यपद्धति नसण्यापेक्षां, साधारणपणें मध्यम तऱ्हेची व्यवस्था कायमची असणें फार चांगलें. कितीही जुलमी सरकार असलें, तरी देशांतून तें एकदम नाहींसें होणें, हें त्या देशाला फार अपायकारक होय. कांहीं देश असे मिळतील कीं, ज्यांतील राज्यपद्धति एकदम नाहींशी झाली असतांही, त्यांची सुस्थिति कायम राहून, दंगे धोपे होणार नाहींत. ज्या देशांत लोकवस्ती फार पातळ आहे, अगर ज्या देशांतील लोकांच्या अंगीं पुष्कळ दिवसांपासून स्वतंत्रतेनें काम करण्याची शक्ति आली आहे, ते जरूरीपुरती राज्यपद्धति एकदम नवीन शोधून काढतील. परंतु अशा प्रकारचा देश हिंदुस्थान आहे, असें ह्मणणें मोठें साहस होय. इंग्रजलोक हिंदुस्थानांत येऊं लागले, तेव्हां जी झोटिंगपाच्छाई सर्व देशभर माजली होती,

तशा प्रकारची अव्यवस्था युरोपांतील कोणत्याही भागांत कोणत्याही वेळीं नसेल. जे कांहीं राजे हिंदुस्थानांत राज्य करीत होते, ते फार जुलमी होते व तेही राज्य करण्याचे कामांत कुशल होते असें नसून, फक्त लढाईच्या जोरावर धाडस करून प्रमुखत्व पावले होते. बरें, तेही लुटारू लोकांवर अवलंबून राहत असत. सारांश, त्यांचें सर्व लष्कर लुटारू लोकांनीं भरलेलें असे. मराठे लोकांची सत्ता अशा प्रकारची होती. हिंदुस्थानचा बराच भाग त्यांच्या ताब्यांत होता. दिल्ली, कलकत्ता वगैरे ते काबीज करतील असा संभव होता. त्यांचे राजधानीचें शहर पुणें होतें. एवढे प्रबल असूनही मराठे लोक केवळ लुटारूपणावर प्रबल झाले होते. उत्तरेकडून परकीय राजांच्या स्वाऱ्या होतच होत्या. देशाची धूळधाणी करून टाकण्यास नादिरशहानें तैमुर्लंग किंवा एटिला* यांचाच कित्ता उचलिला होता. कदाचित् कोणी असें ह्मणतील कीं, मोंगलाई राज्य मोडकळीस आल्याचे हे सर्व परिणाम होत. असें ह्मणण्यांतच एखादी राज्यपद्धति एकदम नाहींशी होणें अपायकारक आहे, हें व्यक्त होत आहे. परंतु मोंगलाई राज्याचीसुद्धां जी कल्पना आह्मांस आहे, ती अतिशयोक्त नाहीं कशावरून ? मोंगलाई राज्याचा मोठेपणा अगदीं क्षणिक होता. दक्षिण हिंदुस्थानांत तर मोंगलांचा अंमल मुळींच बसला नव्हता, असें ह्मटलें तरी चालेल. लार्ड क्लाइव्ह आणि हेस्टिंग्स यांना जी अव्यवस्था हिंदुस्थानांत दृष्टीस पडली, ती

---

* एटिला:—हें नांव इंग्रजींत असें जरी लिहितात, तरी तें खरें नांव नव्हे. खरें नांव एलिट्टे (Alliette) हें होय. तें उलटें लिहिलें ह्मणजे एटिला असें होतें. ह्या नांवाचा मनुष्य अठराव्या शतकांत होऊन गेला. हा ज्योतिषी असे. ह्याच्यावर सर्व दैववादी लोकांचा बहुत विश्वास असे. १७८३ त ह्यानें एक पुस्तक लिहिलें. एकुणिसाव्या शतकाच्या आरंभीं पारिस शहरीं ह्याच्या नांवाचीं कांहीं भाकितांचीं पत्रकें छापण्यांत आलीं, तीं ब्रिटिश म्यूझियममध्यें राखून ठेविलेलीं आहेत.

ह्मणजे त्या वेळपुरतीच होती, असें समजूं नये. पूर्वीपेक्षां त्या वेळेस कदाचित् ती शिखरास पोंचली असेल; तरी गिझनीच्या महंमदानें स्वारी केल्यापासून हिंदुस्थानांत झोटिंगपाछाईच जिकडे तिकडे माजून राहिली होती. अकबर आणि शहाजहान यांनीं देशांत स्वस्थता केली, याचा अर्थ इतकाच कीं, केवळ उत्तर हिंदुस्थानांत ही अव्यवस्था थोडा वेळ तहकूब राहिली होती यापेक्षां जास्त नाहीं.

ह्यावरून असें दिसेल कीं, हिंदुस्थानांतील लोकांना स्वतःचें राज्य स्थापन करणें अगदीं अशक्य आहे. कदाचित् अशा प्रकारें स्वराज्य स्थापन करण्याची जी थोडीबहुत शक्ति हिंदु लोकांच्या अंगांत होती, तीसुद्धां हल्लींच्या इंग्रजी अमलानें नाहींशी केली असावी. हल्लींच्या इंग्रजी राज्यपद्धतीच्या योगानें, पूर्वीपासून जें थोडें राज्य चालविण्याचें बल व चातुर्य हिंदु लोकांच्या अंगीं असे, तें नाहींसें झालें आहे, यांत बिलकुल संशय नाहीं. पुरातनचीं राजघराणीं, सरदार लोक, व विशेषें-करून मोंगलाईच्या वेळीं राज्यकारभारांत प्रमुख असलेले मुसलमान लोक, या सर्वांस इंग्रजी अमलापासून फारच अपाय घडला असून, फायदा मात्र मुळींच झालेला नाहीं. हिंदुस्थानच्या राज्यपद्धतीची शोचनीय स्थिति ज्यांस संमत आहे, त्यांच्या ह्मणण्यांत वर सांगितलेल्या प्रकारचा हिंदु लोकांचा ऱ्हास हीच मुख्य गोष्ट आहे. परंतु हल्लींची राज्यपद्धति कायम राहण्याचें हें कारण नाहीं. तसेंच हा देश किती मोठा आहे, याचा क्षणभर विचार करावा. जो ब्राह्मणत्वाचा पगडा या देशावर आज कितीएक शतकेंपर्यंत जबरदस्त चालू होता, तो पाश्चिमात्य शास्त्र-प्रवेशामुळें एकाएकीं नाहींसा होऊन, नीति व धर्म ह्यांजविषयीं लोकांच्या मनांतील पुरातनच्या स्थायिक कल्पना ढासळून गेल्या आहेत. ही गोष्ट ध्यानांत घेतली ह्मणजे, आज हिंदुस्थान सोडून इंग्रज लोकांनीं जाणें फार

अपायाचें होईल. प्रत्येक गोष्टीमध्यें हिंदुस्थानचें राज्य इंग्रज लोकांवरच अवलंबून असून दुसरा कोणताही त्यास आधार नाहीं, असें ह्या इंग्रजी अमलानेंच करून टाकलें आहे. ह्मणून हा देश सोडून देऊन चालतें झाल्यानें जो अपराध इंग्रज लोकांकडून घडेल, तेवढ्या मोठ्या दुसऱ्या अक्षम्य अपराधाची कधीं कोणास कल्पनाही करतां येणार नाहीं. अशा गोष्टीनें जो विलक्षण अनर्थ हिंदुस्थानावर गुदरेल, तेवढा दुसरा अनर्थ कधीं कोणाच्या स्वप्नांतही एखाद्यावर येऊं शकणार नाहीं.

आजकालची हिंदुस्थानची स्थिति अशा प्रकारची असून, वर सांगितलेले प्रश्न तींत गोंवले गेले आहेत. असे प्रश्न उद्भवण्यास कोणतीं कारणें झालीं, अर्थात् एवढें प्रचंड राष्ट्र इंग्रजांचे ताब्यांत कोणत्या कारणांनीं आलें, हें पुढील प्रकरणीं पाहण्यांत येईल.

प्रकरण तिसरें.

इंग्रजांनीं हिंदुस्थान कसें जिंकलें?

मागील भागांत ज्या प्रश्नाचें आह्मीं विवेचन केलें आहे, त्या प्रकारचा हा वरील प्रश्न नाहीं. इंग्लंडांतून जे लोक वसाहत करण्याकरितां अमेरिकेंत गेले, त्यांनीं वसाहती केलेले मुलूख प्रथमतः बहुतेक ओसाड होते. त्यांना वसाहत करण्याच्या कृत्यांत ज्या अडचणी सोसाव्या लागल्या, त्या तेथील राहणाऱ्या लोकांपासून उद्भवलेल्या नव्हत्या, तर इतर युरोपीय राष्ट्रांशीं इंग्लंडची प्रतिस्पर्धा चालू होती ह्मणून त्या अडचणी उत्पन्न होत असत. या प्रतिस्पर्धी राष्ट्रांवर इंग्लंडानें आपला पगडा कोणत्या उपायांनीं कसकसा बसविला, ह्याजबद्दल बरेंच विवेचन मागील प्रकरणांत आह्मीं केलें आहे. त्या प्रकरणांत जो प्रश्न होता, त्याचें उत्तर जरी उघड नव्हतें, तरी तें मिळणें फारसें कठिण नव्हतें. परंतु हिंदुस्थानसंबंधीं वरील प्रश्न प्रथमारंभीं अतिशय अवघड दिसतो. हिंदुस्थानची लोकसंख्या फार दाट होती. तेथें पूर्वापार चालू असलेली सुधारणेची पद्धत प्राचीन सांप्रदायानें चालत आली होती. तरी इंग्लंडप्रमाणेंच ती भक्कम व अक्षय होती. युरोपीय इतिहासांतील उदाहरणांवरून असें कळून आलें आहे कीं, एखादें हुषार राष्ट्र जिंकण्याचें असेल, तर त्याची भाषा आणि धर्म हीं जिंकणाराची भाषा व धर्म यांपासून भिन्न असल्यास, तें राष्ट्र जिंकणें बहुतेक अशक्य ह्मटलें तरी चालेल. डच लोकांची वस्ती अगदीं पातळ होती, व त्यांस जिंकण्याविषयीं सर्व स्पेनच्या लोकांकडून ८० वर्षें सतत प्रयत्न चालले होते; तरी ते सफल झाले नाहींत. स्विस लोकांस जिंकण्याचे प्राचीन काळीं कित्येकांनीं पुष्कळ प्रयत्न केले, पण ते तडीस गेले नाहींत. नुकतेंच थोडे दिवसांपूर्वी ग्रीक

लोकांस जिंकण्याचे प्रयत्न* विफल झाले, हें महशूर असेलच. फार कशाला ? हिंदुस्थान देश जिंकण्यास सुरुवात झाली, त्याच वेळीं अमेरिकेमध्यें जे तीस लाख इंग्रज लोक राहत होते, त्यांस आपल्या ताब्यांत आणणें इंग्लंडास अशक्य वाटलें. शेवटीं त्या लोकांनीं आपणांवरील इंग्लंडचा ताबा झुगारून दिला. ह्यावरून ह्या दोन राष्ट्रांमध्यें केवढा बरें फरक आहे! अमेरिकेंत लढाई चालू असतां, जें मांद्य व निर्बलत्व इंग्रज लोकांच्या अंगीं दिसून आलें, तसें पूर्वीं कधीं आलें नसून, इतकेंही त्या वेळीं लोकांस वाटूं लागलें असावें कीं, इंग्लंड देशाच्या मोठेपणाचा कळस होऊन, त्यास आतां उतरती कळा लागली आहे. अशी स्थिति अमेरिकेंत होती, त्याच वेळेस इंग्रज लोक हिंदुस्थान जिंकण्यांत अपरिहार्य परिश्रम करीत होते; ह्मणून ते खरोखरी मोठे शूर योद्धे आहेत, असें त्यांच्या वर्तनावरून व्यक्त होण्याजोगें होतें. हा फरक कशामुळें पडला बरें ?

हा एवढा भेद कोणाच्या लक्षांत येत नाहीं, व कदाचित् आला तरी तो कां उद्भवला, ह्याजविषयीं विचार करणें एकीकडेस राहून, उलट " आमच्यांत कांहीं तरी पाणी आहे, " अशीच फुशारकी ते मारीत बसतात. याचें कारण इतिहासाचा अभ्यास कोणी मनापासून करीत नाहींत, हें होय. इतिहासापासून कांहीं उपयुक्त तत्वें शोधून काढण्याची कोणासही बिलकूल इच्छा होत नाहीं. वरील भेद कां पडला, हें सांगणें जरी कितीही कठिण असलें, तरी तो पडला यांत संशय नाहीं. हिंदुस्थानामध्यें प्लासी, आसई, व दुसऱ्या शेंकडों लढायांत संख्येनें

* ग्रीक लोक कांहीं दिवस तुर्क लोकांच्या अमलाखालीं होते. इ. स. १८२१ ह्या वर्षीं त्यांनीं स्वतंत्र होण्यासाठीं लढाई सुरू केली, व १८२८ या वर्षीं त्यांनीं तुर्क लोकांचा अंमल झुगारून दिला. येणेंप्रमाणें तुर्क लोकांस ग्रीक लोक आपल्या ताब्यांत ठेवतां आले नाहींत.

शेकडोंपट ज्यास्त अशा शत्रूंच्या सैन्याशीं इंग्रज लोक लढत असतां नेहमीं विजय पावत, ही गोष्ट वाचल्यानें स्वतःच्या कृत्यांबद्दल संतोष व अभिमान मानण्यास बिलकूल मर्यादा राहत नसून, उलट त्यांस असें वाटूं लागतें कीं, हिंदु लोकांच्या संबंधानें तरी आपण विलक्षण शूर व भयंकर लोक आहों, ह्यांत संशय नाहीं.

परंतु असें मानण्यानें खरोखरच्या प्रश्नाचा उलगडा होतो काय ? एक इंग्रज शिपाई दहा किंवा वीस हिंदु लोकांच्या बरोबरीचा आहे, असें जरी आपण मानिलें, तरी देखील हिंदुस्थान देश इंग्रज लोकांनीं जिंकिला, असें आपणांस ह्मणतां येईल काय ? हिंदुस्थान देश जिंकण्यास इंग्रज लोकांनीं सुरुवात केली, तेव्हां पृथ्वीच्या पाठीवर एक कोट वीस लक्षांपेक्षां जास्त संख्या इंग्रज लोकांची नव्हती, व त्या वेळीं ते लोक दुसऱ्या पुष्कळ लढाया करण्यांत गुंतले होते. क्लाईव्ह साहेबही हिंदुस्थानांत पराक्रम गाजवीत होता. त्या वेळीं युरोपांत ‘ सात वर्षांचें युद्ध ’ चालू होतें. तसेंच लॉर्ड वेल्स्ली साहेब हिंदुस्थानांत एकामागून एक मुलूख आपल्या राज्यास जोडीत असतां, इंग्रजांचें नेपोलियनबरोबर मोठें निकराचें युद्ध सुरू होतें. इंग्रज लोक ह्मणजे लढाईच्या कामांत फार कुशल व लष्करी बाण्याचे आहेत, असें नाहीं. केव्हांही एखादें मोठें सैन्य जमा करून शत्रूशीं टक्कर देण्यास उभें राहण्याचें सामर्थ्य त्यांच्या अंगीं नव्हतें; ह्मणून युरोपीय राष्ट्रांशीं लढाया चालू ठेवण्यासाठीं इंग्लंडास मुख्य आधार आरमाराचा होता. ज्या ज्या वेळीं ह्मणून जमिनीवर शत्रूशीं लढण्याचा प्रसंग येई, त्या त्या वेळीं तो इंग्लंडानें कोणत्या तरी युक्तीनें टाळलेला आहे. कोणत्याही युद्धप्रसंगांत ऑस्ट्रिया अगर प्रश्या ह्यांपैकीं एखाद्या राष्ट्राशीं इंग्लंडचें क्रमाक्रमानें सख्य व वैर असे. अशा प्रकारें जमिनीवर लढाई करण्याचें सामर्थ्य इंग्रजांच्या अंगांत नव्हतें, तर हिंदुस्थानचा

बहुतेक भाग त्यांनीं कसा जिंकला असावा बरें? हा भाग ह्मणजे लहानसा नव्हे. ह्याचें क्षेत्रफळ दहा लाख चौरस मैल असून, त्यांत लोकसंख्या वीस कोट होती. एवढें मोठें राष्ट्र जिंकण्यानें इंग्लंडच्या लष्करास केवढा मोठा धक्का बसला पाहिजे होता व तिजोरीस केवढी मोठी टांच लागली पाहिजे होती? तथापि हें नुकसान इंग्लंडास कधींही समजून आलें नाहीं. युरोपीय राष्ट्रांशीं लढाया मारल्यामुळें जें कर्ज इंग्लंडास झालें आहे, तें अद्यापिही फिटलें नाहीं. परंतु हिंदुस्थानाशीं लढाया केल्यानें, हें कर्ज वाढलें नाहीं. हिंदुस्थानांत जे जे श्रम इंग्रजांस पडले, त्यांचा मागें कांहींच पत्ता राहिला नाहीं.

ह्मणून इंग्लंडांतून थोडेसे लोक हिंदुस्थानांत आले, व ते केवळ बुद्धिमत्तेनें व शूरत्वानें भारी असल्यामुळें, त्यांनीं हिंदुस्थान देश जिंकून घेतला, असें जें लोकिकांत प्रसिद्ध आहे, त्या ह्मणण्यांत कांहीं तरी चुकी आहे. सन १८१८ ह्या वर्षी जी शेवटची मराठ्यांशीं लढाई झाली, तींत इंग्रज लोकांचें सैन्य सुमारें एक लक्षाहून थोडें जास्त होतें. हें कोणत्या वेळीं ह्मणाल तर नेपोलियनबरोबर तरवारबहादुरी मारून इंग्लिश राष्ट्र अगदीं दुर्बल व निःसत्व होऊन गेलें होतें त्या वेळीं. वाटर्लू* येथील मोठी लढाई झाल्यावर दोन वर्षांनीं एवढें मोठें सैन्य समरांगणीं आणून हिंदुस्थानांत असें प्रचंड युद्ध सुरू ठेवण्याची इंग्लंडची शक्ति त्या वेळेस होती काय? लार्ड वेलिंग्टन याच्या हाताखालींसुद्धां स्पेन देशांत इतकें सैन्य नव्हतें. हल्लीं इंग्रज लोकांचें हिंदुस्थानांत सैन्य दोन लक्षांपर्यंतच आहे. दोन लक्ष इंग्रज लोक!!! इतकें असतांही इंग्रज लोक लष्करी बाण्याचे नाहींत काय?

आमचे ह्मणण्याचा हेतु वाचकांस कळलाच असेल. हें जें एवढें मोठें

* टीप.—* पान ७५ पहा.

सैन्य हिंदुस्थानांत होतें व आहे, तें सर्व गोरे लोकांचें नसून, बहुतेक काळे लोकांचेंच आहे. दोन लक्षांपैकीं ६५,०००, ह्मणजे एकंदर सैन्याचा सुमारें फार तर एक तृतियांश, गोरे लोक आहेत, व इतके लोक तरी सन १८५७ सालच्या बंडापासूनच ठेविलेले आहेत. हें बंड झाल्यापासून इकडील काळे लोकांचें सैन्य कमी करण्यांत येऊन गोरे लोक वाढविण्यांत आले. बंडाच्या वेळीं इंग्रजांचे सैन्यांत ४५ हजार गोरे लोक असून, दोन लक्ष पसतीस हजार काळे लोक होते, ह्मणजे इंग्रज लोक एकंदर संख्येच्या सुमारें १/५ होते. इ. स. १८०८ या वर्षी गोरे लोक फक्त २५ हजार असून काळे लोक १,३०,००० होते. ह्मणजे १/५ पेक्षांही कमी होते. इ. स. १७७३ या वर्षी जेव्हां इंग्रजांची हिंदुस्थानांतील सत्ता कायम होऊन 'रेग्युलेटिंग आक्ट*' पसार झाला, त्या वेळीं ह्या सैन्यामध्यें वरचेंच प्रमाण होतें. ह्मणजे कंपनीच्या सैन्यांत ९ हजार गोरे व ४५ हजार काळे लोक होते. ह्याच्याही पूर्वी पाहूं

---

* धि रेग्युलेटिंग आक्ट.—हा आक्ट इंग्लंडांत इ. स. १७७३ त पास होऊन हिंदुस्थानांत १७७४ त अमलांत आला. १७७२ सालीं ईस्ट इंडिया कंपनीनें पार्लमेंटकडे कर्ज मागितलें. मद्रास इलाख्यांतील युद्धांनीं कंपनीची रोकड खलास झाली होती. त्यांतच १७७३ मध्यें बंगाल्यांत जबर दुष्काळ पडला. त्या वेळीं कंपनीनें अगदींच अव्यवस्था ठेविली, व पैसे अतिशय खर्च झाले. तेव्हां कंपनीनें कर्ज मागितलें. त्या वेळीं कांहीं तरी व्यवस्था कंपनीच्या कारभारांत व्हावी ह्मणून त्या वेळचे इंग्लंडचे प्रधान लार्ड नॉर्थ ह्यांनीं एक वरील कायद्याचा मसुदा करून तो पास करून घेतला. त्याप्रमाणें कंपनीला कर्जाऊ रकम दिली; वार्षिक रकम जी सरकारला कंपनीनें द्यावयाची असे तींतून तिला मुक्त केलें; चहा बाहेर पाठविण्याची परवानगी दिली. कर्ज फिटेपर्यंत सहा टक्के व्याज ठेवून पुढें आठ केलें जाईल, असें ठरविलें. इंग्लिश धर्तीवर एक वरिष्ठ कोर्ट नेमलें. बंगालच्या गव्हर्नराला गव्हर्नर जनरल असा किताब देऊन, त्याच्या हाताखालीं एक चार सभासदांचें कौन्सिल दिलें, व सर्व राज्याची व्यवस्था गव्हर्नर जनरलानें ह्या कौन्सिलाच्या मदतीनें ठेवावी अशी सत्ता त्याला दिली. ह्या कायद्याप्रमाणें वॉरेन् हेस्टिंग्स पहिला गव्हर्नर जनरल झाला.

गेलें, तर हें प्रमाण याहूनसुद्धां कमी होतें, ह्मणजे सुमारें एक सप्तमांश होतें, असें दिसतें; व त्याच्याही पूर्वी पाहूं गेलें, तर असें आढळतें कीं, इंग्रज लोकांचें सैन्य बहुतेक काळे लोकांचेंच होतें. हिंदुस्थानांतील सैन्याचा इतिहास लिहितांना कर्नल चेस्ने आरंभींच असें लिहितो कीं, "कंपनीनें हिंदुस्थानांत सैन्य ठेवण्यास प्रथम सुरवात सन १७४८ ह्या वर्षी केली. ह्या वर्षी फ्रेंचांचें उदाहरण पाहून इंग्रजांनीं थोडेसे काळे लोक मद्रासचे संरक्षणाकरितां आपल्या नोकरीस ठेविले. त्यावेळीं सैन्यांत गोरे लोकांची जरूर आहे असें दिसून आल्यावरून, किनाऱ्यावर असलेल्या कंपनीच्या गलबतांतून जितके लोक आणतां आले तितके, व इंग्लंडाहून कंपनीच्या गलबतावर फसवून आणलेले असे कित्येक लोक होते ते मिळून सर्व नोकरीस ठेवण्यांत आले."

अर्काट, प्लासी, बक्सार, वगैरे ठिकाणीं कंपनीच्या प्रथमारंभीं ज्या कित्येक लढाया झाल्या व ज्यांच्या योगानें कंपनीची सत्ता हिंदुस्थानांत कायम होऊं लागली, त्या सर्वांत कंपनीकडे गोरे लोकांपेक्षां काळे लोकच जास्त होते; व इतकेंही येथें सांगितलें पाहिजे कीं, लढायांमध्यें सर्व पुढारीपणा गोरे लोकांनींच घेतला होता, व काळे लोक कुशलतेनें लढत नव्हते, असेंही बिलकूल ऐकण्यांत आलें नाहीं. ह्या सर्व लढायांची हकीकत लिहितांना इंग्रज इतिहासकारांनीं स्वपराक्रमाबद्दल पोरकट स्वाभिमान पदोपदीं व्यक्त केला आहे, हें ध्यानांत घेतलें ह्मणजे त्या ग्रंथकारांनीं गोरे व काळे यांजमध्यें मुळींच भेद केला नाहीं, यांत आश्चर्य नाहीं. मेकाले यांनीं लिहिलेलें क्लाईव्हचें चरित्र पहा. त्यांत प्रत्येक ठिकाणीं 'राजकीय लष्कर,' 'शूर सागरपुत्र,' 'क्लाईव्ह आणि त्याजबरोबरचे इंग्रज लोक, यांजपुढें कोणाचाच टिकाव लागेना' वगैरे मजकूर आलेला आहे. परंतु काळे लोकांची संख्या गोरे लोकांच्या

संख्येपेक्षां नेहमीं जास्त असे. ते लढाईच्या कामांत कधींही मार्गे नसतां गोरे लोकांची बरोबरीच करीत होते. हें ध्यानांत ठेविलें, ह्मणजे एकट्या गोरे लोकांनींच काय पराक्रम केला, व इंग्रज लोकांस जयप्राप्ति होण्याचें कारण केवळ गोरे लोकांचेंच शूरत्व कीं काय, ह्याचा उलगडा एकदम होतो. ज्या ज्या लढायांत शत्रूंचें सैन्य इंग्रजांचे सैन्याचे दस-पट होतें, त्या त्या सर्व लढायांत एक गोरा शिपाई १० काळे शिपायां-बरोबर होता, असें मानलें, तरी प्रत्येक काळा शिपाईसुद्धां तितकाच होता, असें ह्मणणें भाग पडतें. काळा व गोरा ह्यांच्या कुशलतेंत अंतर नव्हतें, असें आमचें ह्मणणें नाहीं. परंतु तें अंतर युरोपीय व एतद्दे-शीय या प्रकारचें नव्हतें. तर लढाईचें शिक्षण व टापटीप हींच विशे-षतः गोरे लोकांचे अंगीं जास्त असून, शिवाय सर्व सैन्याचें अधिपतित्व बरोबर रीतीनें बजावलें गेल्यानेंही विशेष फरक पडला होता.

मिल्ल साहेबानें आपल्या इतिहासांत हिंदुस्थान कसें जिंकलें, ह्या-विषयीं जी थोडक्यांत हकीकत दिली आहे त्यांत, इंग्लिश लोकांचे कांहीं स्वाभाविक गुण असल्यामुळें एवढी मोठी गोष्ट घडून आली, असें तो बिलकूल ह्मणत नाहीं. तो असें लिहितो कीं, "हिंदुस्थान जिंकल्यावर दोन मुख्य गोष्टी दृष्टोत्पत्तीस आल्या. एक, युरोपियन लोकां-चें शिक्षण चांगलें असून, त्यांच्यापुढें काळे लोकांचीं सैन्यें अगदीं दुर्बल होऊन जात; दुसरी, जे काळे लोक युरोपियन सैन्यांत नोकरीस राहत, त्यांस हें शिक्षण फार लवकर देतां येत असे. ह्या दोनही गोष्टी फ्रेंच लोकांनीं उघडकीस आणिल्या."

काळे लोकांहून गोरे लोक जास्त चांगले लढत असत, आणि उभयतांनीं मिळून केलेल्या सर्व पराक्रमांत गोरे लोकांचें अंग जास्त असे, असें घेऊन चाललें, तरी गोरे लोकांनीं हिंदुस्थान जिंकिलें, हें ह्मणणें

अगदीं चुकीचें आहे. ज्या सैन्याकडून हिंदुस्थान जिंकलें गेलें, त्या सैन्यांत गोरे लोकांची संख्या सरासरीनें $\frac{1}{5}$ होती. असें असतांही सर्व कृत्यांमध्यें गोरे लोकांच्या पराक्रमाची अतिशयोक्ति केलेली आढळते; इतकेंच नाहीं, तर घडून आलेल्या गोष्टींचेंसुद्धां अगदीं मिथ्या वर्णन केलेलें असून, लोकांच्या मनांतही तें चुकीचें भरून गेलें आहे; कारण, सर्व सैन्यांत गोरे लोक फक्त $\frac{1}{5}$ होते, तर बाकीचे $\frac{4}{5}$ कोण होते ? अर्थात् काळे लोक होते. ह्यावरून परकीयांनीं हिंदुस्थान देश जिंकला, हें ह्मणणें व्यर्थ आहे. ह्यापेक्षां काळे लोकांनीं आपणच आपल्याला जिंकिलें, हें ह्मणणें जास्त शोभेल. इंग्लंड आणि फ्रान्स ह्यांजवर चेतनधर्मारोप करून ज्याप्रमाणें आपण बोलतों, त्याप्रमाणें हिंदुस्थानाविषयींही बोलूं लागलों, तर हिंदुस्थानाचा परकीय शत्रूनें पराभव केला, असें न म्हणतां हिंदुस्थानानें आपल्यावर एकाच धन्याची मालकी कबूल करून, पूर्वीं चालू असलेली व्यवस्था बदलून टाकण्याचा एक उपाय योजिला, मग ती मालकी जरी परकीयांची असली तरी त्याजबद्दल हिंदुस्थानास परवा वाटली नाहीं, असें ह्मणावें लागेल.

परंतु अशा प्रकारचें ह्मणणेंसुद्धां वरच्याप्रमाणेंच मिथ्या व चुकीचें होईल. हिंदुस्थानांत राज्यव्यवहारसंबंधीं ऐक्य होतें, हें ह्मणणें खरें नाहीं. वास्तविक गोष्ट अशी आहे कीं, राज्यव्यवहारप्रकरणींचसें काय, दुसऱ्या कोणत्याही संबंधांत हिंदुस्थानाला अस्तित्वच नव्हतें. हिंदुस्थान हा शब्द केवळ भूगोलिक असून, अमुक एक जमिनीच्या प्रदेशाला लाविला जात असे, ह्यापेक्षां जास्त अर्थ त्या शब्दांत नाहीं. असें होतें, ह्मणूनच तो देश सुलभ रीतीनें जिंकला गेला. इटली आणि जर्मनी हे देश त्याचप्रमाणें नेपोलियनकडून जिंकले गेले. ह्याचें कारण त्या दोहोंनाही त्या वेळीं अस्तित्व नसून लोकांमध्यें स्वराष्ट्राभिमानाचें वारेंही

नव्हतें. जर्मनीला अस्तित्व नव्हतें, ह्मणून निरानिराळ्या जर्मनींतील संस्थानांमध्यें कलह उत्पन्न करून, नेपोलियन यानें आपला हेतु साधून घेतला. आस्ट्रियाशीं व प्रश्याशीं लढाई करतांना जर्मनींतील बव्हेरिया व वर्टेंबर्ग या दोनही संस्थानांशीं नेपोलियनचें सख्य होतें. ज्याप्रमाणें मध्य युरोपामध्यें अशा प्रकारची युक्ति नेपोलियन ह्याला करतां आली, त्याचप्रमाणें फ्रेंच लोकांचा मुत्सद्दी जो दुप्ली, त्यालाही प्रथमारंभीं असें वाटलें कीं, एखादें युरोपियन राष्ट्र हिंदुस्थानांत व्यापार करूं लागलें तर त्याला तेथील प्रदेश सहज आपल्या ताब्यांत आणतां येईल. हिंदुस्थानांतील निरनिराळ्या राज्यांत पुष्कळ दिवस कलह माजले होते. आणि दुप्लीला असें दिसून आलें कीं, परकीय लोक मध्यें पडले असतां, त्यांना हे कलह लवकर मिटवितां येतील. ह्या त्याच्या विचाराप्रमाणें त्यानें आपला उद्योगही चालविला होता, व ह्याच गोष्टीला अनुसरून हिंदुस्थानांतील युरोपिय कारकीर्दीच्या इतिहासास आरंभ झाला. इ. स. १७४८ या वर्षी निजाम उल्मुलुख मरण पावल्यावर, त्याच्या गादीच्या वारसाविषयीं तंटे उत्पन्न होऊन, त्या तंट्यांत फ्रेंच लोकांनीं हात घातला, हीच गोष्ट वरील इतिहासाचा आरंभ होय.

या सर्व गोष्टींचें तत्व असें होतें कीं, हिंदुस्थानाला अस्तित्व नव्हतें. अर्थात् राष्ट्रीय अभिमान त्याच्यांत नव्हता. ह्मणून, परकीय लोक आले असतां, त्यांच्याशीं परकीयपणा वाटण्याला जागा नव्हती. जेथें स्वत्वच नाहीं, तेथें परकीयत्व कोठून असणार? व परकीयांशीं स्पर्धा तरी कोण करणार? ह्या गोष्टीशीं साम्यता पावतील अशीं उदाहरणें युरोपीय इतिहासांत आहेत. ८० वर्षांपूर्वी जर्मनीमध्यें जी स्थिति होती तिच्यापेक्षां हिंदुस्थानामध्यें राजकीय प्रकरणांत फारच मोठा अंधार झाला होता, असें समजलें, तरच काळे लोकांच्या साहाय्यानें इंग्रजांनीं हिंदुस्थान देश जिंकला,

ही गोष्ट सहज समजेल. सर्व जर्मनीभर जरी स्वराष्ट्राभिमान नव्हता, तरी जर्मनींतील निरनिराळ्या भागांत थोडाबहुत स्वतःचा अभिमान असे. प्रश्या, आस्ट्रिया, बव्हेरिया, सेबिया, हीं सर्व निरनिराळीं संस्थानें असून, आपापल्या पुरता तरी त्यांना अभिमान वाटत असे. ह्मणून बव्हेरियाचें आस्ट्रियाबरोबर अगर बव्हेरिया व आस्ट्रिया यांचें प्रश्याबरोबर नेपोलियन याला भांडण लावून देतां आलें. तरी बव्हेरिया, आस्ट्रिया, प्रश्या, यांपैकीं प्रत्येकाचें स्वतःबरोबरच भांडण लावतां येणें कठिण होतें. नेपोलियन यानें जे तह या राष्ट्रांशीं करून घेतले, त्यांत असें ठरलें होतें कीं, आस्ट्रियाशीं लढाई करतांना नेपोलियनच्या सैन्याला बव्हेरियाच्या इलेक्टरानें मदत करावी. परंतु स्वतःचा पगार देऊन जर्मन लोक नोकरीस ठेवून त्यांना जर्मन लोकांशींच लढाईला लावण्याचा प्रयत्न नेपोलियन यानें केला नाहीं. असा प्रयत्न सफळ झाला असता, तर जर्मनी व हिंदुस्थान यांचीं पूर्णपणें साम्यता झाली असती. ज्या सैन्यानें हिंदुस्थान जिंकिलें, त्यापैकीं $\frac{1}{5}$ गोरे लोक असून $\frac{4}{5}$ काळे लोक होते. ह्या गोष्टीशीं साम्यता करणें असेल, तर आपण अशी कल्पना करूं कीं, इंग्रजांनीं फ्रान्स देशावर स्वारी केली, व चांगला पगार देऊन फ्रेंच लोकांचें एक सैन्य तयार केलें, व त्याच्या योगानें फ्रान्स देश जिंकला. अशा प्रकारची कल्पनाच असंभवनीय दिसते. आमचे वाचक तेव्हांच ह्मणतील कीं, फ्रेंच लोक आपला देश जिंकून दुसऱ्याच्या ताब्यांत देण्यास उद्युक्त झाले, ही गोष्ट कशी संभवेल? आणि विचार केला तर अनुमानानें पाहतां ह्या गोष्टींत कांहीं अशक्य दिसत नाहीं. फ्रान्स देशाचा पूर्वीचा वृत्तांत निराळ्या तऱ्हेचा असता, तर अशी गोष्ट घडून आली असती. फ्रेंच लोकांच्या मनांत स्वाभिमानाचें तत्व उत्पन्न झालें नाहीं, अशी कल्पना करितां येईल व अशा प्रकारची स्थिति बाराव्या शतकामध्यें प्रत्यक्ष फ्रान्समध्येंच

होती. पारिस शहरामध्यें जो राजा राज्य करीत असे, त्याच्या रूएन येथील राजाबरोबर लढाया चालू असत. आणखी आपण ज्यास्त अशी कल्पना करूं कीं, फ्रान्स देशांतील निरनिराळ्या भागांत निरनिराळीं राज्यें असून, तीं सर्व परकीय होतीं. अर्थात् तो देश पूर्वींच जिंकला गेला असून अद्यापिही परकीयांच्या हातांत चालत होता. अशा प्रकारें परकीयांमध्यें विभक्त झालेल्या देशांत प्रत्येक गोष्टींत अस्वस्थता आणि अव्यवस्था असणें, लढाई करणें ह्मणजे एक प्रकारचा पैसा मिळण्याचा धंदा असेंच लोकांनीं समजणें, ह्या गोष्टी साहजिकच आहेत. अशा देशांत स्वतःबरोबर अथवा परकीयांबरोबर लढाई करण्यास पाहिजे त्या राजाला जाऊन मिळणारे व पाहिजे त्या राजावर उठणारे लोक मिळतील, यांत नवल तें काय?

अशी स्थिति हिंदुस्थानची होती. हिंदुस्थानांत परकीय अमलाचा प्रवेश इंग्रजांनींच केला, असें नाहीं; कारण परकीय अमल इंग्रज येण्यापूर्वींच तेथें चालू होता. वास्तविक पाहतां ह्याच विषयासंबंधीं आमच्या कल्पना आह्मीं चुकीच्या करून घेतल्या आहेत. एकजातीय समाज अमुक एका प्रदेशांत वाढलेला असणें, ह्मणजे त्या देशांत एकराष्ट्रीयत्व असणें, हें जरी आह्मांस अगदीं स्वाभाविक असें वाटूं लागलें आहे, तरी ही गोष्ट सामान्य नव्हे. अशा प्रकारें समाजाची एकजातीयता जमेस धरूनच स्वाभिमान व लोकांचें सद्वर्तन ह्याजविषयीं आमच्या कल्पना बनून गेल्या आहेत. हिंदुस्थानामध्यें राष्ट्रीयत्वाची कल्पना फार घोटाळ्याची आहे. स्वत्व व परकीयत्व ह्यांमधील अंतर निवून गेल्यासारखें झालें आहे. अकराव्या शतकापासूनच परकीय मुसलमान लोक हिंदुस्थानांत आले असें नसून, अगदीं फार प्राचीन काळींसुद्धां हिंदुस्थानामध्यें परकीय लोक येऊन रहात होते, व एकमेकांवर आपला अमल

बसवीत होते. ही गोष्ट सत्य आहे. संस्कृत भाषा बोलणारे आर्य लोक ज्यांनीं ब्राह्मणी धर्माची स्थापना करून हिंदुस्थान देशास थोडें-बहुत ऐक्य आणिलें, तेही आरंभीं हिंदुस्थानावर स्वारी करूनच तेथें आले होते, व ज्यांनीं ज्यांनीं ह्मणून ह्या देशावर स्वाऱ्या केल्या, त्यांनीं तेथील मूळच्या लोकांस अगदीं जेरीस आणून नाहींसें केलें, ही गोष्ट निर्विवाद आहे. हल्लींच्या युरोपीय लोकांचे मूळ पूर्वज आशिया खंडांतून पश्चिमेकडे गेले. त्यांच्यापूर्वी, जे लोक युरोपांत होते, ते युरोपांतून आतां अगदीं नाहींसे झाले आहेत. निदान हल्लीं चालत असलेल्या युरोपीय भाषांत तरी त्यांचा कांहीं मागमूस राहिला नाहीं. परंतु एशिया खंडाच्या मध्यभागांतून आर्य लोक हिंदुस्थानांत येण्याचेपूर्वी जे मूळचे लोक तेथें राहत होते, त्या लोकांचें आस्तित्व हिंदुस्थानांत जिकडे तिकडे दृष्टोत्पत्तीस येतें. हल्लीं ज्या भाषा हिंदुस्थानांत चालत आहेत, त्या केवळ संस्कृत भाषेपासूनच निघाल्या आहेत, असें नाहीं. तर संस्कृत भाषेपासून अगदीं भिन्न असलेल्या अशा जुन्या भाषांचेंही मिश्रण हल्लींच्या हिंदुस्थानच्या भाषांत आढळतें व दक्षिणेंतील भाषांस तर संस्कृत भाषेचा गंधही नाहीं. ब्राह्मण धर्म ह्मणून जो सर्वसाधारण आहे, असें आपणांस वाटतें, तोही सूक्ष्मावलोकन केल्यावर अगदीं अस्पष्ट व घोटाळ्याचा असा दिसून येईल. एकमेकांशीं विरुद्ध व असंबद्ध असे जे धर्मभोळेपणाचे वेडे वेडे प्रकार चालत होते, त्या सर्वांचें बाह्यतः एकीकरण होऊन, हा ब्राह्मणी धर्म बनलेला आहे. जी मुख्य गोष्ट गृहीत धरून युरोपांतील सर्व राजनीतिशास्त्र रचलेलें आहे, तें तत्व हिंदुस्थानांत गृहीत घेतां येत नाहीं. समाजैक्यता हिंदुस्थानांत नाहीं. ही समाजैक्यता ज्या ठिकाणीं असेल, त्यालाच राष्ट्र अशी [illegible]

संबंधीं आमचें वरील ह्या [illegible]

इतकें फार प्राचीन काळापर्यंत लांब जाण्यास नको. गिजनीच्या महंमदानें स्वारी केल्यापासून हिंदुस्थानावर मुसलमानांच्या स्वाऱ्या वारंवार होऊं लागल्या होत्या. सोळाव्या शतकामध्यें मोंगल लोक हिंदुस्थानांत आले. त्यांच्यापूर्वी पुष्कळ दिवसपर्यंत हिंदुस्थानांत बहुतेक राज्यें मुसलमानीच होतीं. तर या वेळेपासूनच हिंदु राज्यांतील स्वराष्ट्रीयत्व नाहींसें झालें होतें. आपलें राज्य आपले ताब्यांत असण्याचा हक्क सर्वांच्या मनांतून निघून गेला होता. इतकें झाल्यावर अर्थात्‌च स्वराष्ट्राभिमान लोकांत वसणार नाहीं.

ही सर्व स्थिति लक्षांत घेतली ह्मणजे इंग्रज लोक हिंदू लोकांपेक्षां फार वरचढ होते, ह्मणून त्यांनीं हिंदुस्थान जिंकलें, असें मानण्याचें कारण नाहीं. कारण इतर युरोपीय राष्ट्रांपेक्षां इंग्रज लोक आपल्याला जास्त वरचढ मानीत नाहींत. परकीय शत्रु देश जिंकण्यास आला असतां त्याच्याशीं लढाई करून स्वदेशाचें संरक्षण करणें, हें तद्देशीय लोकांचें कर्तव्यकर्म आहे, असें आह्मीं समजतों. परंतु स्वदेश याचा अर्थ काय? अगदीं मुळाशीं जाऊन “ स्वदेश ” या शब्दाचा अर्थ पाहूं गेलें तर असें समजून येईल कीं सर्व लोक मिळून एक मोठें कुटुंब असें समजून ज्या देशांतील प्रत्येक मनुष्य ह्या कुटुंबरूपी समाजांत वाढलेला असेल, तो देश त्या प्रत्येक मनुष्यास आपल्या प्रत्यक्ष मातोश्रीप्रमाणें वाटेल. परंतु समाजच जर कुटुंबरचनेचा नसून, एकमेकांचे शत्रु असलेल्या अशा दोन चार जातींनीं बनलेला असेल, तर सर्व देशाबद्दल अभिमान लोकांत असणें शक्य नाहीं. फार झालें तर प्रत्येक खेडेगांवाबद्दल मात्र मनुष्यास अभिमान वाटेल व अशा वेळेस फार तर ग्रामाभिमान दृष्टीस पडेल. प्रथमतःच परकीय शत्रूस आपले देशांत जागा

देणें, ही गोष्ट निराळी, व एक परकीय शत्रु राज्य करीत असतां त्यास सोडून दुसऱ्या परकीयांस आंत येऊं देणें, ही गोष्ट निराळी.'

आह्मीं वर असें ह्मटलें आहे कीं, हिंदुस्थान देश जिंकण्याच्या बाबतींत आश्चर्यकारक गोष्ट तो देश जिंकला गेला ही नाहीं; तर तो इतक्या थोड्या श्रमांनीं व सुलभ रीतीनें जिंकला गेला, ही होय. हिंदुस्थानांतील लढाईसाठीं पैसा जमविण्याकरितां इंग्लंडांतील लोकांवर जास्त कर वगैरे बसले नाहींत. इंग्लिश सरकारानें कर्जाऊ पैसेही कोणापासून घेतले नाहींत. हिंदुस्थानांत पुष्कळ इंग्रज लोक गुंतून गेल्यामुळें इंग्लंडांत लोकांची कमतरताही पडली नाहीं. फ्रान्स वगैरे युरोपांतील कित्येक देशांत लढाईचा प्रसंग आला, ह्मणजे अमुक एक वयावरील सर्व लोकांस लढाईंत व आरमारांत नोकरी केलीच पाहिजे, असा कायदा केला जात असे. तशा प्रकारचा कायदाही इंग्लंडांत करण्याची कधीं जरूर पडली नाहीं. बरें, युरोपच्या एवढी लोकसंख्या जिंकण्याचे प्रयत्न हिंदुस्थानांत चालू असतां, त्याच वेळीं दुसऱ्या लढाया इंग्लंडास बंद ठेवाव्या लागल्या नाहींत. हें प्रथम दर्शनीं असंभवनीय दिसतें. परंतु ह्याचा उलगडा आह्मीं इतका वेळ दिलाच आहे. आतां या सर्व लढायांचा खर्च कसा चालत असे, हा प्रश्न सोडविणें राहिलें आहे. तोही कठिण नाहीं. लढाईंत ज्याला यश येतें, त्याजवर लढाईच्या खर्चाचा बोजा बिलकूल पडत नाहीं, हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. सर्व खर्च जिंकलेल्या राष्ट्रावर पडतो. नेपोलियन याला खर्चाची पंचाईत कधीं पडली नाहीं, कारण त्यानें चालविलेल्या लढायांत ज्या राष्ट्रांचा पराभव होई त्यांजवर नेपोलियनचा सर्व खर्च बसे. त्याचप्रमाणें हिंदुस्थान देश जिंकण्याचा सर्व खर्च हिंदुस्थानाव

असा आतां फक्त एकच प्रश्न आ

टून जमा केलें? परंतु इंग्लिशांच्या सैन्यांत ४/५ लोक काळे होते, हें ध्यानांत घेतलें ह्मणजे हा प्रश्नही सहज सुटतो.

ही गोष्ट ध्यानांत ठेवून पाहिलें असतां असें समजून येईल कीं, ईस्ट इंडिया कंपनीच्या ताब्यांत हिंदुस्थानाची मालकी आली, याचा अर्थ हिंदुस्थान देश इंग्रजांनीं जिंकला, असा करणें बरोबर नाहीं. हें वर अनेक वेळां सांगण्यांत आलें आहे. "जिंकलेला मुलुख" हे शब्द हिंदुस्थानास लावणें असेल, तर त्या शब्दांस निराळाच अर्थ दिला पाहिजे. एका शब्दास पुष्कळ अर्थ असूं शकतील. ज्या ज्या ठिकाणीं एका राष्ट्राकडून दुसऱ्या राष्ट्रास कांहीं अपाय घडला असेल, त्याच ठिकाणीं हा शब्द वापरतां येईल. उदाहरणार्थ, असें समजा कीं, दोन राष्ट्रांमध्यें लढाई सुरू आहे; एका राष्ट्राच्या सैन्यानें दुसऱ्यावर चाल करून तें सर केलें, किंवा निदान त्याजकडून असा तह करून घेतला, कीं वस्तुतः त्या राष्ट्राचें सर्व स्वातंत्र्य नष्ट झालें. जेव्हां व्यवहारांत जिंकणें हा शब्द आपण लावतों, तेव्हां दोन देशांमध्यें असा कांहीं प्रकार घडून आलेला असला पाहिजे. अलेक्झांडर बादशाहानें जेव्हां इराणचें राज्य जिंकलें, तेव्हां त्या दोन राज्यांमध्यें पूर्वी वैमनस्य असून उघड भांडण झालें. तेव्हां इराणी लोकांस हार जावें लागलें. साझिर यानें गाल* देश जिंकला, तेव्हां तो रोमन लोकांचा सेनापति होता, व सेनेट सभेच्या हुकुमानें रोमन लोक गाल देशांत नेऊन त्यानें तो देश सर केला. परंतु ह्यांपैकीं कांहींच प्रकार हिंदुस्थानांत घडून आला नाहीं. इंग्लंडच्या राजानें मोंगलाबरोबर, एखाद्या नबाबाबरोबर किंवा दुसऱ्या एखाद्या राजाबरोबर लढाई करण्याचा आपला उद्देश कधींच प्रसिद्ध

* हल्लीं यास फ्रान्स ह्मणतात

केला नव्हता. हिंदुस्थानांतील मुलूख आपल्या ताब्यांत घेण्याची अव्वल-पासून अखेरपर्यंत इंग्रज लोकांस मुळींच पर्वा वाटली नाहीं.' त्यांस विशेष काळजी फ्रेंच लोकांविषयीं होती. हिंदुस्थानांत फ्रेंचांचा मुलूख बराच वाढल्यानंतर फ्रान्स देशाबरोबर इंग्लिश लोकांच्या पांच वेळ निरानिराळ्या लढाया सुरू झाल्या. ह्या लढाया अंशतः हिंदुस्थानांतही चालू होत्या, व ईस्ट इंडिया कंपनी व हिंदुस्थानचे त्या वेळचे राजे ह्यांच्या ज्या लढाया झाल्या, त्यांतच फ्रेंचांच्या लढाया गुंतून गेल्या होत्या. हा सर्व प्रकार कसा होता हें नीट समजलें पाहिजे असेल, तर एतद्देशीय राजांबरोबर जाहलेल्या लढाया केवळ आकस्मिक असून जमेस धरण्याजोग्या नव्हत्या, व ह्मणून वस्तुतः देश जिंकण्यामध्यें जे प्रकार घडून येतात, ते हिंदुस्थानांत घडून आले नाहींत असें समजलें पाहिजे. खरा प्रकार खालीं लिहिल्याप्रमाणें होता. हिंदुस्थानांत समुद्रकिनाऱ्यावरील कांहीं बंदरांवर व्यापारी लोक राहत होते. मोंगलाई राज्याचा शेवट होऊन देशांत अव्यवस्था झाली, हें त्यांनीं पाहिलें. तेव्हां त्या व्यापाऱ्यांस स्वरक्षणासाठीं थोडासा लष्करी बाणा ठेवणें भाग पडलें. त्यांनीं थोडेसे शिपाई लोक आपल्या नोकरींत ठेविले, व प्रथम थोडथोडा मुलूख त्यांनीं आपल्या ताब्यांत घेतल्यानें शेवटीं सर्व देश त्यांच्याच ताब्यांत आला. हे व्यापारी जातीनें इंग्रज लोक असून, त्यांनीं जें सैन्य समरांगणीं आणिलें होतें त्यांत कांहीं गोरे लोकही होते.

ह्या प्रकाराला परकीय लोकांनीं हिंदुस्थान जिंकलें, असें ह्मणतां येणार नाहीं; ही एक अंतस्थ राज्यक्रांतिच झाली, असें ह्मटल्यास जास्त शोभेल. कोणत्याही देशांतील राज्यव्यवस्था नाहींशी होऊन अव्यवस्था होते, तेव्हां असा नियम आहे कीं, त्या देशांत असलेल्या कांहीं बलाढ्य लोकांमध्यें लढाया सुरू होतात, व त्यांत ज्यास यश येईल, तो सर्व देशा-

वर मुख्य राजा होऊन बसतो. इ. स. १७९२ त फ्रान्स देशामध्यें बुर्बो* घराण्याचा मोड झाला, व पारिस येथील म्युनिसिपालिटीचें वजन वाढून तिच्या योगानें एक नवीन राज्यव्यवस्था सुरू झाली. पुढें थोड्याच वर्षांनीं ही राज्यव्यवस्था मोडून जाऊन बोनापार्ट यानें नवीनच एक लष्करी राज्यव्यवस्था स्थापन केली. इ. स. १७०७ या वर्षीं औरंगजेब बादशहा वारल्यापासून मोंगलाई राज्यास उतरती कळा लागली होती. पुढें इ. स. १७५० या वर्षाचे सुमारास सर्व देशभर झोटिंगपाछाई माजली. मोंगलांचा अंमल बिलकुल कोणी जुमानीत नसे. अर्थात् वर सांगितलेल्या नियमांचा पूर्णपणें अंमल होऊं लागला. जीं लहान लहान राज्यें त्या वेळीं हयात होतीं, त्या सर्वांचा सार्वभौमपदप्राप्तीकरितां आपसांत झगडा सरू झाला. हे राजे ह्मणजे विशेष महत्वाचे होते, असें नाहीं. लोकांचें सैन्य भाड्यानें आणून ते लढाई करीत असत. मोंगलाई राज्यामध्यें निरानिराळ्या प्रांतांची व्यवस्था करण्याकरितां जे अंमलदार नेमलेले होते, तेच आपापला प्रांत बळकावून बसले. क्वचित् एखादा गृहस्थ धाडस करून आपल्या सभोंवतीं थोडेसे लोक जमवून दंगे सुरू करी. केव्हां केव्हां असेंही घडे कीं, जे राजे मोंगलांकडून पूर्णपणें जिंकले गेले नव्हते, तेच पुढें येऊन सार्वभौमत्व प्राप्त करून घेण्याविषयीं खटपट करूं लागले. वर जे निरनिराळ्या तऱ्हेचे अंमलदार आपसांत भांडू लागले ह्मणून सांगितलें, त्याचीं उदाहरणें पहा. निजाम ह्मणून मोंगलांचा एक मुख्य अंमलदार होता, तो हैद्राबादचें संस्थान बळकावून बसला. हैदरअली ह्मणून एक सरदार स्वतः शूर असल्यामुळें धाडस करून पुढें आला व त्यानें ह्मैसूरचें राज्य आपल्या धन्यापासून बळकावून

* टीप.—* पान ५७ पहा.

घेतलें. पेशवे ह्मणून दक्षिणेमध्यें ब्राह्मण राजे होते, ते मराठ्यांचें राज्य चालवीत असत. ते मोठे बलाढ्य असून मोंगलांकडून जिंकले गेले नव्हते. या सर्वांपाशीं भाड्यानें आणलेलें सैन्य असे. आपसांमध्यें नेहमीं लढाई व लुटालूट चालू असे. हे दंगे इतके जबरदस्त असत कीं, सर्व युरोपामध्येंसुद्धां असे दंगे फक्त एकदां, कारोलिंजियन* राज्य मोडकळीस आलें त्या वेळेसच घडून आले असतील. दुसऱ्या कोणत्याही वेळीं अशा प्रकारची अंदाधुंदी युरोपांत नव्हती.

अशा प्रकारची अव्यवस्था देशांत असणें, हें नवीन राज्यस्थापनेस विशेष उपयोगाचें आहे. अशी स्थिति ज्या ठिकाणीं नसेल, ते देश जिंकण्यास फारच प्रयास पडतील; व ते जिंकणाराच्या अंगीं शक्तिही फारच विलक्षण असली पाहिजे. ज्या राजाची शक्ति व सैन्य मोठें नसेल, त्याच्या हातून ते देश जिंकले जाणार नाहींत. परंतु हिंदुस्थानची गोष्ट तशी नव्हती. हैदरअलीला मदत केवळ त्याच्या बाहुबळाची व बुद्धीची होती. तेवढ्या बळावरच तो म्हैसूरचा सुलतान झाला. भाड्यानें सैन्य पाहिजे तिकडे मिळत असे. ज्याच्याकडून पैसा मिळे, किंवा ज्याची छाप लोकांवर बसे, त्याचा पक्ष घेण्यास पाहिजे तितके लोक तत्पर असत. अशा प्रकारचें भाड्याचें सैन्य जमविलें असतां कोणी गृहस्थ पाहिजे तितका शक्तिमान होऊं शके; कारण, मुख्य राज्यव्यवस्था मोडून गेल्यावर लोकांमध्यें शक्ति लष्कराची मात्र राहते.

अशा विशिष्ट प्रसंगीं जे लोक हिंदुस्थानामध्यें प्रबल झाले, व ज्यांच्या हातून राज्यस्थापना होईल असा सुमार होता, असे लोक फक्त व्यापारी होते. ते समुद्रकांठावर जीं बंदरें असत, त्या ठिकाणीं

* मध्य युरोपांत फ्रांक लोकांचें एक मोठें राष्ट्र होतें.

राहून व्यापार चालवीत असत. ते जरी परजातीय होते, तरी परजातित्व हें हिंदुस्थानांत हरकतीसारखें नव्हतें, हें वर सांगण्यांत आलेंच आहे. हिंदुस्थानांतील बहुतेक राजे प्रथमारंभीं परकीयच होते. मोंगल राजेसुद्धां परदेशांतून येऊनच हिंदुस्थानांत राहिले होते. ईस्ट इंडिया कंपनीला हिंदुस्थानामध्यें अशा प्रकारचा जो आकस्मिक फायदा झाला, त्याचें वर्णन करितांना पुष्कळ ग्रंथकारांनीं आपलें वाक्पांडित्य खर्च केलें आहे. अशा प्रकारचा फायदा इतक्या सुलभ रीतीनें पूर्वी कोणासही झाला नाहीं, ही गोष्ट खरी; ह्मणून हा फायदा होईल, असें पूर्वीच भविष्य करून ठेवणें अशक्य झालें असतें. परंतु हा फायदा आकस्मिक असें जेव्हां आपण ह्मणतों, तेव्हां त्या शब्दाचा अर्थ काय? एखादी गोष्ट कशी घडली व तिचें कारण काय, हें ज्या ठिकाणीं दाखवितां येत नाहीं, त्या ठिकाणीं आकस्मिक हा शब्द लावतां येईल. परंतु वरील गोष्ट तशी नाहीं. ईस्ट इंडिया कंपनी स्थापन झाली, तेव्हां त्यांनीं कांहीं थोडेंसें भांडवल खर्चीं घातलें होतें. त्यांच्या हातांत पैसा पुष्कळ असे. दोन तीन किल्ले त्यांच्या ताब्यांत असत. समुद्रावरही त्यांचा अंमल होता. ते सर्व एका जुटीचे होते व त्यांची व्यवस्था एकाच अंमलदाराच्या हातांत नसल्यामुळें लढाईमध्यें अगर आजारानें मरून जाऊन त्यांच्यांत अव्यवस्था होणारी नव्हती. कोणी एखादा गृहस्थ स्वतःचा धंदा चालवीत असतांना हर प्रयत्न करून अफाट प्रदेशावर आपला अमल बसवितो, याजबद्दल आह्मांस फारसें आश्चर्य वाटत नाहीं. वास्तविक पाहतां हीच गोष्ट जास्त अद्भुत आहे. कॉर्सिकामध्यें राहणाऱ्या एका गरीब सरदाराच्या लाहानशा मुलानें (नेपोलियन बोनापार्ट) सर्व युरोपावर जबरीनें आपला अंमल बसवावा, ही गोष्ट खरोखरी जितकी अद्भुत आहे, तितकी ईस्ट इंडिया कंपनीनें हिंदुस्थान काबीज केलें,

ही नाहीं. कारण नेपोलियन यानें एवढ्या अचाट कृत्यास आरंभ केला, तेव्हां त्यास कोणी स्नेही नव्हते, साथीदार नव्हते, खिशांत एकही पैसा नव्हता, व त्यानें अवाढव्य राज्यसत्ता स्थापन केली, एवढेंच नाहीं, तर ती वीस वर्षांचे आंतच गमावूनही टाकिली. तद्वतच हैदर अली, शिंदे, होळकर यांनीं स्वतंत्र राज्यस्थापना केली, ही गोष्ट जास्त चमत्कारिक असून विशेष वर्णनीय आहे. तितकी ईस्ट इंडिया कंपनीनें हिंदुस्थान काबीज केलें, ही गोष्ट नाहीं, हें सांगण्यांत आमचा हेतु इतकाच आहे कीं, ईस्ट इंडिया कंपनीनें हिंदुस्थानांत राज्यस्थापना करणें, ही गोष्ट व वरील गोष्टी एका वर्गांतल्या नाहींत. एका राष्ट्रानें दुसरें राष्ट्र काबीज केलें, असें यांत घडून आलेलें नाहीं. निदान प्रत्यक्ष तरी दोन राष्ट्रांचा या गोष्टींत संबंध झालेला नाहीं. "परराज्यसंबंधीं खातें" या नांवाची इंग्लंडांतील इंग्लिश राज्यव्यवस्थेची एक शाखा आहे. परराज्यांशीं सर्व प्रकारच्या व्यवहारांचा निकाल या खात्यांतून होत असतो. हिंदुस्थान देश जिंकण्यासंबंधीं वाटाघाट या खात्यांतून झालेली नाहीं. हिंदु समाजांत मात्र ह्या गोष्टीच्या योगानें एक अंतस्थ संक्रमण घडून आलें. कधीं कधीं कांहीं विलक्षण आकस्मिक गोष्टी घडून येऊन, अगर एकदम एखादी व्यवस्था अमलांत येऊन, त्यांच्या योगानें समाजांतील अव्यवस्थेचा शेवट होतो. तशा प्रकारचेंच हें वरील संक्रमण आहे. ज्या व्यापाऱ्यांनीं हिंदुस्थान काबीज केलें, ते परकीय नव्हते. अशी थोडा वेळ कल्पना केल्यानें पुढील घडून आलेल्या गोष्टींत कांहीं फरक पडला नसता. आपण अशी कल्पना करूं कीं, कांहीं पारशी लोक मुंबईत व्यापार करीत असतां, त्यांच्या व्यापारास देशांतील अंतर्व्यवस्थेनें फार अडथळा येत असे. ह्मणून सर्वत्रांनीं वर्गणी करून कांहीं किल्ले वगैरे बांधिले व सैन्य नोकरीस ठेविलें. तसेंच त्यांस सैन्यामध्यें कुशल

व शूर कामगार सुदैवानें मिळाले. असें झालें असतें, तर त्यांनींही प्लासी, बक्सारसारख्या लढाया मारिल्या असत्या. त्यांनीं मोंगल बादशहाकडून एखाद्या परगण्याचा दिवाणी अगर मुलकी कारभार मिळविला असता. असें करतां करतां एका लहानशा राज्याचा पाया घातला जाऊन शेवटीं त्यांचें राज्य सर्व हिंदुस्थानभर पसरलें असतें. इंग्रज लोकांच्या संबंधानें ज्या गोष्टी घडून आल्या, त्या सर्व पारशी लोकांच्या संबंधानेंही तशाच घडून आल्या असत्या. विशेष हा झाला असता कीं, त्या जशाच्या तशाच स्पष्टपणें सर्वांचे लक्षांत आल्या असत्या. सर्व देशभर झोटिंगपाछाई झाल्यामुळें, जिकडे तिकडे दंगे-धोपे व नासाडी चालली होती, ती बंद करण्यास प्रत्येक समाजाकडून जसे स्वाभाविक प्रयत्न घडतात, त्यांपैकींच हा वरील एक प्रयत्न आहे, या प्रयत्नाचे योगानें ही एक राज्यक्रान्तिच घडून आली, असें समजून आपलें समाधान झालें असतें.

अशा प्रकारच्या गोष्टींत कांहीं अद्भुत चमत्कार आहे, असें कोणास वाटलें नसतें. तथापि ईस्ट इंडिया कंपनीस इतका जय प्राप्त झाला, ही गोष्ट सर्वांस फारच अद्भुत वाटली. ती इतकी वाटण्याचें मुळींच कारण नव्हतें. कारण ह्या कंपनीचा युरोपाशीं निकट संबंध होता. युरोपांतील लष्कराचें शिक्षण व तत्संबंधीं शास्त्रीय शोध हिंदुस्थानांतल्या-पेक्षां फार चांगले असल्यामुळें त्यांचा उपयोग त्या कंपनीस चांगला करून घेतां आला. ज्या महापुरुषास हिंदुस्थान सहज जिंकतां येईल असें प्रथम वाटलें तो डुप्ली ह्मणून फ्रेंचांचा सरदार होता; त्यास असें दिसलें कीं, हिंदु लोकांचा युरोपियन लोकांबरोबर लढाईंत टिकाव लागणार नाहीं, तरी युरोपियन लोकांच्या इतकें कसब त्यांस चांगले रीतीनें शिकवून त्यांचे अंगीं सहज आणतां येईल. ईस्ट इंडिया कंपनीचें सर्व मंत्रसा-

मर्थ्य ह्यांतच होतें. ह्या मंत्रसामर्थ्याचे योगानें त्या कंपनीचा हिंदुस्थानांतील इतर राजांबरोबर टिकाव लागला इतकेंच नाहीं, तर त्या सर्वांवर तिचें वर्चस्व बसलें. युरोपियन लोकांमध्यें हिंदु लोकांनीं ग्रहण करण्यास अशक्य असा बाह्य किंवा आंतर दुसरा कोणताही गुण नव्हता. लष्कराची व्यवस्था व शिक्षण हीं मात्र हिंदु लोकांच्यापेक्षां त्यांच्यांत ज्यास्त असून, तीं त्यांस सहज शिकवितां येण्याजोगीं होतीं.

ह्याशिवाय त्या कंपनीस दुसरी एक गोष्ट साहाय्यभूत होती. हिंदुस्थानसंबंधीं इंग्लिश कारभाराची सर्व मुखत्यारी जरी कंपनीला इंग्लिश सरकाराकडून दिलेली नव्हती, तरी तिचा इंग्लंडशीं जो खरा संबंध होता, तो तिला फार उपयोगाचा असे. हिंदुस्थान जिंकण्यास जें सैन्य व पैसा लागला, तो मात्र तीस मिळवावा लागत असे. तरी हिंदुस्थान आणि चीन या देशांशीं व्यापार करण्याची पूर्ण परवानगी इंग्लंडकडून ह्या कंपनीस मिळाली असल्यामुळें सर्व इंग्लिश राष्ट्रास व पार्लमेंटास ह्या कंपनीचा मोठा अभिमान वाटत असे. ज्या लढायांच्या योगानें हिंदुस्थानांतील मुलूख कंपनीच्या ताब्यांत येत गेला, त्या लढाया बरेच वेळां इंग्लिश आणि फ्रेंच ह्यांच्यामध्यें चालू आहेत, असें वाटल्यावरून त्या चालू ठेवण्याबद्दल इंग्लिश राष्ट्राची पूर्ण संमति कंपनीला असे. ही गोष्ट फारच महत्वाची आहे. तरी ती फारशी कोणाचे लक्षांत येत नाहीं. कंपनी व हिंदु राजे ह्यांजमध्यें प्रथम भांडणें झालीं, हें हिंदुस्थान देश कंपनीच्या ताब्यांत येण्याचें मूळ कारण नव्हे; तर फ्रेंचांनीं सर्व दक्षिणहिंदुस्थान आपल्या ताब्यांत आणण्याचे जे भगीरथ प्रयत्न चालविले व विशेषेंकरून हैदराबादचे गादीचे तंट्यांत पडून मद्रास आणि मुंबई येथें असलेल्या इंग्रेजांच्या वसाहती नाहींशा करण्याकरितां जे उपाय त्यांनीं केले, तेच हिंदुस्थानांतील मुलूख इंग्रजांचे ताब्यांत येण्यास

प्रथमतः कारण झाले. आरंभींचे इंग्रजांचे प्रयत्न फक्त फ्रेंचांपासून आपलें संरक्षण करण्यापुरतेच होते. आणि ह्या वेळेपासून पुढें सुमारें सत्तर वर्षेपर्यंत ह्मणजे नेपोलियनाशीं चाललेल्या लढाईची समाप्ति होई-पर्यंत हिंदुस्थानामध्यें इंग्रजांनीं चालू ठेवलेल्या सर्व लढायांचा उद्देश कमजास्त प्रमाणानें फ्रेंचांपासून आपलें संरक्षण करण्यापुरताच होता. जरी ह्या लढाया प्रत्यक्ष इंग्लिश राष्ट्रानें स्वखर्चानें चालविलेल्या नव्हत्या, तरी त्यांचा परिणाम असा झाला, कीं त्या सर्व राष्ट्रीय लढाया असें सर्वांस वाटून त्यांजविषयीं सर्व इंग्लंड राष्ट्रास एकसारखी फार काळजी वाटत होती. ह्मणून बऱ्याच अंशीं कंपनीच्या सैन्यास इंग्लिश राष्ट्रा-कडून मदत होत असे. सन १७८९ या वर्षी राजकीय व लष्करी प्रकरणांचा बंदोबस्त उत्तम रीतीनें रहावा, ह्मणून त्या कृत्यास योग्य असा मुत्सद्दी लार्ड कॉर्नवालीस ह्यास ब्रिटिश सरकारानें गव्हर्नर जन-रल नेमून हिंदुस्थानांत पाठविलें. कंपनीच्या गैरवागणुकीबद्दल पार्ल-मेंटांतून तिजवर मोठा ठपका आला. लार्ड क्लाईव्ह ह्याजबद्दल पार्लमेंट सभेनें आपली इतराजी लिहून ठेविली. वारन हेस्टिंग्स ह्यानें केलेल्या अपराधांची चौकशी सुरू झाली. कंपनीनें हिंदुस्थानांत ठेवण्याच्या व्यवस्थेला नियम लावून देण्याकरितां निरनिराळ्या प्रधानांनीं निरनिराळे मसुदे तयार करून पार्लमेंट सभेंत आणिले. ह्या मसुद्यांपैकीं एकानें* इ. स. १७८३ या वर्षी इंग्लंड देशांतील राज्यकरणविचारी सर्व मुत्सद्यांस अगदीं अस्वस्थ करून सोडिलें होतें. अशा व आणखी कित्येक प्रका-रांनीं हिंदुस्थानच्या बाबतींत इंग्लिश राष्ट्राला मध्यस्थीपणा करावा लागला. ह्यावरून हिंदुस्थानांत झालेल्या लढाया प्रत्यक्ष इंग्लिश राष्ट्राच्याच आहेत असें लोकांस वाटूं लागलें, व कंपनी व इंग्लिश राष्ट्र यांजमध्यें

* पिट साहेबांचें हिंदुस्थानसंबंधीं बिल.

अभेद मानण्याचा प्रघात पडला. युरोपामध्यें इंग्लंड हें राष्ट्र पहिल्या वर्गात गणलें जात असून, त्याची पत व कीर्ति मोठी असल्यामुळें ह्या गोष्टीचा त्या कंपनीस फारच उपयोग झाला. तरी ज्यां लढायांच्या योगानें कंपनीच्या हातांत हिंदुस्थानांतील मुलूख आला, त्या लढाया चालविण्यास इंग्लिश राष्ट्राकडून वर सांगितल्याखेरीज दुसरी प्रत्यक्ष मदत मुळींच मिळत नसे.

'अद्भुत', 'चमत्कारिक' हे शब्द कित्येक मोठमोठ्या ऐतिहासिक गोष्टींस लावण्यांत येतात, व हिंदुस्थान देश इंग्लिशांनीं जिंकला ह्या गोष्टीस जितके निर्भीडपणानें हे शब्द लावले जात आहेत, तितके दुसरीकडे कोठेंही लावले जात नसतील. ज्या गोष्टीचीं कारणें सांगण्यास कठिण आहेत, तिलाच हे शब्द लावले जावे, असें नाहीं. तर एखादी गोष्ट घडून येण्यास काय कारणें झालीं, हें सांगणें कठिण नसतांही त्या गोष्टीस असे शब्द लावले जाण्यास हरकत नाहीं. असें आहे तर हिंदुस्थान देश जिंकला गेला, ही गोष्ट अद्भुत झाली, अशा ह्मणण्याचा अर्थ इतकाच आहे कीं, अशा प्रकारची दुसरी गोष्ट पूर्वी कधीं घडून आलेली नव्हती; व ह्मणूनच ज्या मंडळीच्या हातांत ईस्ट इंडिया कंपनीचीं सूत्रें होतीं, त्यांजलाही सुमारें १९० वर्षेपर्यंत हिंदुस्थानांत असा कांहीं प्रकार घडून येईल, असा अंदाज करतां आला नसता. जॉब चारनॉक, जोशिया चाइल्ड, अगर मद्रासचा गव्हर्नर पिट्ट (लार्ड चाथाम ह्मणून जो मोठा मुत्सद्दी होऊन गेला, त्याचा आजा), व कदाचित् मेजर लॉरेन्स वगैरे मोठमोठ्या शहाण्या गृहस्थांनीं हिंदुस्थानांत कार्यें केलीं. परंतु पेशव्यांची अगर मराठ्यांची अगर मोंगलांची सत्ता कमी होऊन त्या ठिकाणीं आपली सत्ता चालू होईल, असें ह्यांपैकीं एकाच्याही स्वप्नांत आलें नसेल. परंतु ज्या कारणांनीं अशी ही गोष्ट घडून

आली, तीं कारणें दाखविणें फार कठिण आहे, असा वरील 'अद्भुत' अगर 'चमत्कारिक' या शब्दांचा अर्थ कराक्याचा नाहीं. मोंगलाई राज्याचा न्हास होऊन हिंदुस्थानचें स्वामित्व धन्याची वाट पहात जमिनीवर पडून राहिलें होतें. जो कोणी येऊन तें जमिनीवरून उचलून घेईल, त्यास तें मिळणारें होतें. त्या वेळीं सर्व हिंदुस्थानभर साहसी व शूर गृहस्थ राज्यस्थापनेच्या नादीं लागलेले होते. हें ध्यानांत घेतलें ह्मणजे थोड्याशा व्यापारी गृहस्थांनीं, सैन्य जमविण्यास जवळ पैसा असल्यामुळें, इतर प्रबळ होत असलेल्या लोकांबरोबर टक्कर मारून, पाश्चिमात्य लष्करी शोधांचा पूर्ण उपयोग करून, योग्य सरदारांच्या हातीं सेनाधिपतित्व देऊन, व इंग्लंडसारख्या राष्ट्राच्या शक्तीचा व कीर्तीचा, तसेंच इंग्लिश मुत्सद्यांच्या शहाणपणाचा, वारंवार उपयोग करून, त्या लोकांचा पूर्णपणें मोड केला, व त्यांजकडून सर्व सत्ता हिरावून आपले हातांत घेतली, यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहींच नाहीं.

इतक्या वेळच्या लिहिण्याचें तात्पर्य एवढेंच आहे, कीं " जिंकलेला प्रदेश" हे शब्द खऱ्या अर्थानें हिंदुस्थानास लागू पडत नाहींत; कारण, ह्या कृत्यांत सर्व राष्ट्राचें अंग नसून त्या कामीं राष्ट्राचें सैन्य व पैसा ह्यांचाही व्यय झालेला नव्हता; अशा सांगण्यानें वाचकांची एक मोठी शंका दूर व्हावी. हिंदुस्थान देश इंग्लंडापासून हजारों मैलांच्या अंतरावर आहे; तेथील लोकसंख्या बहुतेक युरोपच्या एवढी आहे; इंग्लंड देश तरी लष्करी बाण्यामध्यें फार अग्रगण्य नाहीं; असें असूनही विशेष खर्च व श्रम न पडतां एवढा मोठा देश जिंकला गेला, ह्या ह्मणण्यांत खरोखरच एक मोठी अडचण वाचकांस पडणारी आहे, ही अडचण आतां दूर झाली असेल. ती अशी निरसन होईल कीं, हिंदुस्थान देश इंग्लिशांनीं जिंकला, यांत जिंकला या शब्दाचा

नेहमींचा खरा अर्थ येथें उपयुक्त नाहीं. मोंगलाई सत्तेचा ऱ्हास होत असतां सहजगत्या कांहीं इंग्लिश व्यापारी लोक हिंदुस्थानांत व्यापार करीत होते, ते हैदर अली अगर रणजितसिंग ह्यांच्याप्रमाणेंच सुदैवानें मोठी सत्ता बळकाविण्यास समर्थ झाले; इतकाच ह्याचा अर्थ समजावयाचा आहे.

तथापि ह्या गोष्टीचे सर्व प्रत्यक्ष परिणाम जिंकलेल्या राष्ट्राप्रमाणेंच हिंदुस्थानावर घडून आले आहेत. कारण, ज्या रीतीनें हा देश इंग्रजांनीं काबीज केला, तिची आतां समाप्ति होऊन, कंपनीच्या हातांतून सर्व सत्ता काढून घेऊन व्हिक्टोरिया महाराणी साहेब हिंदुस्थानच्या तक्ताधिपति झाल्या आहेत. इंग्लिश प्रधानमंडळांत हिंदुस्थानसंबंधीं एक सेक्रेटरी असून, तो पार्लमेंट सभेचा सभासद आहे. हिंदुस्थानच्या हरएक राज्यकारभारसंबंधीं तो जबाबदार आहे. इंग्लिशांनीं आपण होऊन जरी हिंदुस्थान देश मिळविला नाहीं, तरी हिंदुस्थान देश आपण होऊन इंग्लंडचे ताब्यांत गेला आहे. कोलंबसाच्या वेळेपासून ज्या नियमांस अनुसरून युरोपीय लोकांनीं परदेशांत वसाहती केल्या ह्मणून मागें सांगण्यांत आलें आहे, त्याच नियमांचें वरील हिंदुस्थानची राज्यक्रान्ति हें एक आणखी उदाहरण आहे. युरोपियन लोक कितीही दूर गेले, त्यांस तिकडे कितीही अद्भुत यश प्राप्त झालें, तरी त्यांचें युरोपीय नगरवासित्व प्रथमारंभींच झुगारून देण्यास ते कधींही समर्थ झाले नाहींत. कॉर्टेझ* आणि पिझारो* ह्यांजला अमेरिकेंत जीं मूळचीं राज्यें दिसून आलीं, तीं त्यांनीं अगदीं धुळीस मिळविलीं. ज्या ज्या ठिकाणीं ते गेले, त्या त्या ठिकाणीं विशेष प्रयास न पडतां ते सत्ताधीश झाले. जरी मेक्सिको देशाच्या मांटीझूमा राजाचा पराभव करून त्यां-

* टीप.—* पान ८८ पहा.

नीं तेथें स्वराज्य स्थापन केलें, तरी स्पेन देशाच्या पांचव्या चार्लस राजाची सत्ता झुगारून देण्याचें त्यांचे अंगीं सामर्थ्य नव्हतें. ह्याचा परिणाम असा झाला कीं, दुसऱ्यांनीं मदत केल्याशिवाय स्वपराक्रमानें फार श्रम करून जे जे प्रदेश त्यांनीं जिंकिले, ते ते सर्व अंशतः स्पेनच्या राज्यासच जोडले गेले. सारांश, बाहेर गेलेले लोक स्वतंत्र राज्य स्थापूं शकले नाहींत. अशीच स्थिति हिंदुस्थानांतील इंग्लिश राज्याची झाली. इ. स. १७६९ नंतर मोंगलांच्या अमलाखालीं कंपनीच्या हातांत नांवाची तरी बरीच मोठी सत्ता होती. तेव्हांच इंग्लंडामध्यें पार्लमेंटांत असा ठराव झाला कीं, कंपनीकडून जे जे प्रदेश स्वसत्तेखालीं आणले जातील, त्या सर्वांवर पूर्ण मालकी पार्लमेंटाची आहे. त्या वेळीं जे वाद-विवाद होत, त्यांजमध्यें मोंगलाचें नांव बहुधा मुळींच निघत नसे. बंगाल, बहार, ओरिसा, वगैरे प्रांतांची राज्यव्यवस्था परकीयांनीं करणें मोंगलांस संमत आहे किंवा नाहीं, हा प्रश्नच मुळीं पार्लमेंटांत निघालेला नाहीं. कंपनीचीं कृत्यें दोन भिन्न राष्ट्रांमध्यें विभक्त झालेलीं होतीं. इंग्लंडच्या राजाकडून कंपनीस सनद होती, व मोंगलांकडून त्यांस दिवाणी* मिळाली होती. परंतु ज्याप्रमाणें कोर्टेझ यानें मांटीझूमा राजाचा पराभव केला, त्याचप्रमाणें मोंगलांचा नाश कंपनीनें केला. तसेंच जे जे अफाट प्रदेश कंपनीनें काबीज केले, ते ते सर्व त्यांनीं निमुटपणें इंग्लंडच्या ताब्यांत दिले. सरते शेवटीं ह्मणजे प्लासीची लढाई झाल्यावर सुमारें १०० वर्षांनीं ही कंपनी मोडली जाऊन, सर्व हिंदुस्थानची मालकी इंग्लंडच्या ताब्यांत गेली.

---

* दिवाणी ह्मणजे एखाद्या प्रांताची व्यवस्था करण्याची मुखत्यारी अथवा सुभेदारी.

प्रकरण चवथें.

हिंदुस्थानांतील इंग्लिशांची राज्यव्यवस्था.

हिंदुस्थानाचा इंग्लंडाशीं कोणत्या प्रकारचा संबंध आहे, व हा संबंध घडून येण्यांत अद्भुतता किती आहे, हें येथपर्यंत सांगण्यांत आलें. आतां आपण आणखी जरा पुढें जाऊन, ज्याप्रमाणें हा संबंध अगदीं साहजिकपणें घडून आला, त्याप्रमाणें हा साहजिकपणें पुढें टिकेल किंवा नाहीं, व हिंदुस्थानामध्यें इंग्लिशांचा अंमल केवळ अद्भुत चमत्काराप्रमाणें असून फार दिवस टिकणारा नाहीं हें ह्मणणें खरें आहे कीं काय, हें आतां आपण पाहूं. कारण, हिंदुस्थानाचा इतिहास वाचतांना तो नीटपणें समजण्यास जी एक मोठी अडचण वाचकांस वारंवार पडते, ती ही कीं, कित्येक विलक्षण प्रकारच्या गोष्टी घडत असून, त्या एकमेकींपासून अगदीं भिन्न व चमत्कारिक असतां, त्यांचा परिणामही विलक्षण व तिसराच घडून आला असें वाचकांस वाटून, त्यांची अशी समजूत होते कीं, नेहमींचा सामान्य कार्यकारणभाव हिंदुस्थानच्या हकीकतीस लागू पडत नसून, येथें सर्वच प्रकार विलक्षण आहे. इतिहासांत कित्येक वेळां ज्या अलंकारिक भाषेचा उपयोग करण्यांत येतो, तिच्या योगानें ह्या वरील चुकीस पुष्टीकरण होतें. हिंदुस्थानचें राज्य जिंकतांना जें जें ह्मणून चमत्कारिक व अद्भुत असें इतिहासकारांस दिसेल, तें तें कसें घडून आलें, हें कार्यकारणभावानें स्पष्ट करून न दाखवितां, उलट मूळीं असेल त्यापेक्षां जास्त अद्भुतता त्या सर्व गोष्टींस आणण्यांतच इतिहासकारांस अभिमान वाटत असता.

ह्याप्रमाणें हिंदुस्थानांत इंग्रजी सत्तेची स्थापना होणें ही गोष्ट नेहमींच्या नियमांस अपवादक किंवा राजनीतिशास्त्रांत अखंड अनुपपन्न

अशी असून, इंग्रज लोकांच्या अंगीं पराक्रम व राज्य चालविण्याचें विलक्षण शहाणपण आहे, ह्मणूनच ती घडली, असें सर्वत्रांस वाटूं लागतें. जोंपर्यंत आमच्या लोकांचें असें मत आहे, तोंपर्यंत हें राज्य पुढें किती दिवस टिकेल ह्याजबद्दल त्यांस कांहींच अंदाज बांधतां येणार नाहीं. आरंभींच ह्या गोष्टींत जें अद्भूतत्व मानलें जात आहे, तें अखेरपर्यंत तसेंच कायम राहील. नेहमींचे सृष्टिक्रमाचे नियम जर एकदां बंद पडले, तर ते पुढें किती कालपर्यंत तसेच बंद राहतील, हें कोण सांगेल? परंतु वर आह्मीं शांतपणें ह्या राज्यस्थापनेचा विचार केला आहे. हिंदुस्थान कसें जिंकलें गेलें ह्याजबद्दल साधकबाधक गोष्टींचा विचार करून शेवटीं आह्मीं असा निष्कर्ष काढिला आहे कीं, ही गोष्ट अद्भुत आहे, ह्मणजे तशी दुसरी गोष्ट पूर्वीं कधींही घडून आलेली नाहीं; अर्थात् एशियांतील समाजांत जें उत्क्रमण होईल, तें युरोपाच्या समाजाहून भिन्न असणारच. परंतु ही कशी घडली, हें सांगतां येण्यासारखें नाहीं, किंवा निदान तें सांगतां येण्यास कठिण आहे, असा ह्या अद्भुततेचा अर्थ समजावयाचा नाहीं. याच विचारसरणीचें अवलंबन करून जें राज्य काबीज करण्यांत अद्भुतता नव्हती, असें आह्मीं ठरविलें आहे, तें राज्य चालविण्यांत तरी ती आहे किंवा काय, ह्याचा आतां विचार कर्तव्य आहे.

हिंदुस्थान देश जिंकला गेला व जिंकणारे लोक इंग्रज होते असें आपण एकदां गृहीत घेतलें, ह्मणजे वरील प्रश्न सुटणार नाहीं. कारण, जिंकलेल्या लोकांचें असमाधान नाहींसें करणें फार कठिण आहे, हें कोणास माहीत नाहीं? ज्या ठिकाणीं जिंकणारे लोकांची संख्या जास्त व लढण्याची कुशलताही जास्त होती, त्या ठिकाणींसुद्धां वर सांगितलेलें असमाधान दूर करणें अगदींच अशक्य होतें, अशीं उदाहरणें

पुष्कळच आहेत. हालंड व बेल्जिअम ह्यांजमध्यें स्पानिश लोकांना माघार घ्यावी लागली, त्या वेळीं स्पानिश लोक कमी मर्द नव्हते. त्यांची संख्या सर्व ख्रिस्ती राष्ट्रांपेक्षां ज्यास्त असून, ते चांगले शूरही होते. तथापि जिंकलेल्या सर्व लोकांमध्यें एकराष्ट्रीयतेचा संबंध दृढ असून, त्यांचा धर्म भिन्न असला ह्मणजे मग कितीही शूर व सुशिक्षित सैन्याशीं टक्कर देण्यास ते मागेंपुढें पाहत नाहींत; कारण येथें धर्मैक्य व एकराष्ट्रीयता हे गुण, फक्त लढाईत उभे राहणाऱ्या लोकांमध्येंच केवळ नसून, देशांतील सर्व लोकांत सारखे वसत होते. दुसरें उदाहरण घेऊन हें पुन्हां व्यक्त करून आपण दाखवूं. युरोपाच्या नकाशांत जसा इटली देश आहे, तसा एशियाचे नकाशांत हिंदुस्थान आहे. दोन्ही द्वीपकल्पेंच असून, दक्षिणेकडे समुद्रांत गेलेले आहेत. दोहोंच्याही उत्तरेस मोठे पर्वत असून त्यांच्याखालीं एक मोठी नदी पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहात आहे. आणखीही ह्या दोन देशांमध्यें एक साम्य आहे. पुष्कळ शतकेंपर्यंत दोनही देशांवर परकीयांकडून स्वाऱ्या होत होत्या. नुकताच इटली देश आस्ट्रियाच्या ताब्यांत होता. आस्ट्रियापेक्षां इटलींतले लोक कमी शूर असून त्यांच्यांत लढाईची कुशलताही आस्ट्रियापेक्षां कमी होती, आणि आस्ट्रिया देश इटलीला अगदीं लागून आहे. इतकी अडचण असतांही, इटालियन लोकांनीं आस्ट्रियाबरोबर लढून आपलें स्वातंत्र्य पुनः मिळविलें. समरांगणामध्यें बहुतकरून इटलीचा पराभव होई. तरी त्यांच्यामध्यें आपसांत इतकी जबरदस्त एकी व बाहेरच्या लोकांत इतकी मोठी कळकळ होती, कीं इटालियन लोकांनीं सरते शेवटीं स्वतंत्रतेचा मार्ग शोधून काढून परकीयांपासून स्वसत्ता परत घेतली. हिंदुस्थान देश इंग्लंडच्या संबंधानें इटलीपेक्षां ज्यास्त सुस्थित आहे. इंग्लंडच्या सुमारें आठपट ज्यास्त लोकसंख्या हिंदुस्था-

नची आहे. दोहोंमध्यें अंतर अर्ध्या पृथ्वीइतकें आहे. इंग्रज लोक स्वभावानें फारसे लष्करी बाण्याचे नाहींत, तरी अंततः इंग्रजांच्या ताब्यांत हिंदुस्थान असून बंडें वगैरे कांहीं होत नाहींत. हिंदुस्थानचें राज्य चालविण्यांत अडचणी येतात खऱ्या, पण त्या विशेषेंकरून जमाखर्च व पैशाच्या संबंधाच्या आहेत. इटलीच्या संबंधानें आस्ट्रियाला एक मोठी अडचण होती. जिंकलेल्या इटालियन लोकांचें असमाधान दूर करणें फार कठिण होतें. पण ती अडचण हिंदुस्थानामध्यें इंग्रजांस पडत नाहीं. हें आश्चर्य नव्हे काय? सृष्टिक्रमाचे नियम बंद पडतील, असें ह्यांत होत नाहीं काय? ह्यावरून एखाद्याला असें वाटेल कीं, हिंदु लोकांच्या विनीततेला आणि इंग्रज लोकांच्या राज्यकरणकुशलतेला मर्यादाच नाहीं.

ह्या आमच्या ह्मणण्यावरून वरील प्रश्नास कोणतें उत्तर देण्याचा आमचा इरादा आहे, हें अंशतः वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. वरील समजांत दोन गोष्टी गृहीत घेतलेल्या दिसतात. पहिली, हिंदुस्थानांतील लोकांत एकराष्ट्रीयतेचा संबंध कायम आहे. दुसरी, हा संबंध कायम असतांनाच इंग्रज लोकांनीं हिंदुस्थान जिंकलें. ह्या दोनही गोष्टी अगदीं चुकीच्या आहेत.

हिंदु लोकांमध्यें एकराष्ट्रीयतेचें तत्व कायम आहे, असें ह्मणण्यांत साधारणतः लोकांकडून एक चूक करण्यांत येते. ही चूक काढून टाकण्याचें काम विशेषेंकरून राजनीतिशास्त्राचें आहे. युरोपच्या नकाशाकडे पाहिलें, ह्मणजे निरनिराळे देश विभागलेले दिसतात. प्रत्येक देशामध्यें निरनिराळ्या जातींचे लोक राहत असून भाषाही भिन्न आहेत. ह्यावरून हिंदुस्थानाविषयीं युरोपियन लोकांचा समज सहज चुकीचा होण्याचा संभव आहे. त्यांस असें वाटेल कीं, युरोपमध्यें

अथवा युरोपच्या बाहेर ज्या ज्या ठिकाणीं ह्मणून स्वतंत्र नामधारी देश आहेत, त्या त्या ठिकाणीं राहणारे लोक एकजातीयच आहेत. असें ह्मणतांना एकजातीयत्वाचा अर्थ बरोबर समजून घेण्याची लोक खटपट करीत नाहींत. इतकें मात्र खचित आहे कीं इंग्लंडावर फ्रेंच लोकांनीं अंमल करणें हें त्या लोकांस फार अप्रिय वाटेल. ह्या उदाहरणावरून इंग्रज लोकांनीं हिंदुस्थानावर राज्य करणें हें हिंदु लोकांस फारच अप्रशस्त वाटत असेल, अशा प्रकारचा समज होण्यास मूळ कारण वस्तुस्थिति समजून घेण्याकडे दुर्लक्ष करणें हें होय. प्रत्येक देशांतल्या लोकांमध्यें जात्यैक्य आहे, असें मानण्यांत चुकी आहे, हें उघड आहे. इंग्रज लोक अगर फ्रेंच लोक हे केवळ एकाच देशांतील लोक इतकेंच नसून, त्यांच्यामध्यें आपआपसांत एक निकट संबंध आहे, व तो फार दृढ आहे. आतां हे एकीकरणाचे संबंध कोणकोणते आहेत, हें पाहूं,–ह्मणजे ते हिंदुस्थानांतील लोकांत वसत आहेत किंवा नाहींत, तें सहज समजेल.

पहिला संबंध एकजातीयत्व. हें हिंदुस्थानांत राहणाऱ्या सर्व लोकांत कायम आहे, असा सर्वत्र ग्रह दिसतो. हा संबंध विस्तृत झाला ह्मणजे त्यालाच एकभाषात्व असेंही ह्मणतां येईल. इंग्रज लोक ह्मणजे इंग्रजी भाषा बोलतात ते; फ्रेंच लोक ह्मणजे फ्रेंच भाषा बोलतात ते; एतद्वत् हिंदुस्थानचे सर्व लोक एकच भाषा बोलतात काय? नाहीं. जर सर्व युरोपखंडांतले लोक एकच भाषा बोलत असतील, तर कदाचित् हिंदुस्थानचे लोक एकच भाषा बोलतात, असें ह्मणतां येईल. संस्कृत भाषा व तिचा इतर देशी भाषांशीं असलेला निकट संबंध, ह्यांजविषयीं शब्दशास्त्रवेत्त्यांनीं फारच वर्णन केलें असल्यामुळें आह्मांस येथें असें सांगितलें पाहिजे कीं, एक भाषा समजत असून तिच्याच साह्यानें जर दुसरी भाषा

समजत असेल, तर त्या दोनही भाषा एकाच वर्गातल्या निकटसंबद्ध आहेत, असें समजावें. केवळ वर्णोच्चारसाम्यता दोनही भाषांतील शब्दांत अंतस्थ दिसली ह्मणून त्या भाषा निकटसंबद्ध आहेत, असें समजतां नये. इटालियन लोकांना आस्ट्रियन लोक परकीय वाटण्याचें कारण त्यांजला जर्मन भाषा समजत नव्हती हें होय. जरी जर्मन आणि इटालियन या दोनही भाषा शब्दशास्त्रवेत्त्यांनीं 'इंडो युरोपीअन' नांवाच्या एकाच वर्गांत गणिल्या आहेत, तरी एक भाषा समजल्यानें दुसरी समजत नसल्यामुळें शब्दशास्त्रवेत्त्यांनीं करून दिलेल्या माहितीनें आस्ट्रियन लोकांविषयीं इटालिअन लोकांचें परकीयत्व कमी झालें नाहीं. ह्याप्रमाणें जसा युरोपांतील निरनिराळ्या भाषांमध्यें वर्णोच्चारसाम्यतेचा संबंध आहे, त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतील कित्येक भाषांमध्येंही आहे. कारण त्या सर्व प्रत्येकीं एकाच पुरातन भाषेपासून उत्पन्न झालेल्या आहेत. परंतु बंगाली, मराठी व गुजराथी, यांजमधील परस्परसंबंध कितीही निकट असला, तरी त्या भाषा बोलणाऱ्या लोकांमध्यें एकराष्ट्रीयत्व उत्पन्न होत नाहीं. मुसलमान लोकांचा प्रवेश हिंदुस्थानांत झाल्यापासून त्यांच्या फारशी भाषेचा व त्या वेळच्या हिंदुस्थानांतील देशी हिंदी भाषेचा मिलाफ होऊन एक निराळीच भाषा उत्पन्न झाली, तिला हल्लीं हिंदुस्थानी असें ह्मणतात. परंतु दक्षिणहिंदुस्थानाविषयीं विचार केला, ह्मणजे युरोपापेक्षांही जास्त विपरीत भाव हिंदुस्थानांत दृष्टीस पडतो. तामील, तेलगु, कानडी वगैरे दक्षिणेंतील प्रसिद्ध भाषा इंडो युरोपीअन शाखेच्या बिलकुल नसून त्या बोलणारे लोकही युरोपांतील फिन्स* माज्यार्स* वगैरे

* हे युरोपांतील मूळचे रहिवासी लोक. ह्यांची संख्या फार थोडी असून हल्लीं हे कित्येक ठिकाणीं आढळतात.

लोकांपेक्षां संख्येनें शेंकडोंपट जास्त आहेत. फिन्‍.
ज्या भाषा युरोपांत बोलतात, त्या ईंडो युरोपीयन वर्गांत.

यावरून हें उघड आहे, कीं इंग्लंड अगर फ्रान्स हीं वर्गांत येतील, त्या वर्गांत हिंदुस्थान हें नांव येणार नाहीं. फ्रान्स वगैरे प्रत्येकीं निरनिराळीं राष्ट्रें आहेत. ज्याप्रमाणें युरोपां अनेक राष्ट्रें आहेत, त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतही आहेत, ह्मणून हिंदुस्थान हें युरोपच्या वर्गांत येईल. ज्याप्रमाणें भूगोलस्थितीस अनुसरून युरोप हें नांव एका विशिष्ट प्रदेशास मिळालें आहे, त्याचप्रमाणें हिंदुस्थान हें-ही नांव एका विशिष्ट प्रदेशास प्राप्त झालें आहे. 'अमुक एका विशिष्ट प्रदेशाचें नांव' यापलीकडे त्यांत कांहीं अर्थ आहे, असें समजूं नये. ह्मणून युरोपाप्रमाणें हिंदुस्थान याचा अर्थ फक्त भूगोलिक समजावा; असें समजूनही युरोप व हिंदुस्थान या दोन शब्दांच्या उपयोगांत फरक आहेच. प्रसिद्ध ग्रीक इतिहासकार हिरॉडोटस् ह्याच्या वेळेपासून युरोप हें नांव एकाच अर्थानें एकाच प्रदेशाचें वाचक झालें आहे. परंतु हिंदुस्थान हें नांव नेहमीं एकाच अर्थाचें वाचक आहे असें नाहीं. उत्तरेस हिमालय पर्वत व पश्चिमेस सुलेमान पर्वत यांनीं आशिया खंडांतून विभक्त केलेला जो सर्व प्रदेश त्यास एकच नांव हिंदुस्थान हें असणें इंग्रज लोकांस साहजिक दिसतें. परंतु असा प्रघात मात्र आजपर्यंत नाहीं. ग्रीक लोकांची हिंदुस्थानाविषयीं कल्पना कांहीं वेगळी होती. मूळ धातूवरून हिंदुस्थान हें नांव सिंधु नदाच्या कांठच्या प्रदेशास लागतें असाच अर्थ ग्रीक लोक सर्व व्यावहारिक कामांत समजत असत. जेव्हां अलेक्झांडर यानें हिंदुस्थानावर स्वारी केली ह्मणून ग्रीक लोक ह्मणत, तेव्हां ते हिंदुस्थान ह्मणजे पंजाब असें समजत. पुढें कित्येक वर्षांनीं गंगथडीची माहिती ग्रीक लोकांस झाली. तरी

दक्षिणहिंदुस्थानसंबंधी त्यांस कांहींच माहिती नव्हती. तसेंच हिंदुस्थानांतही सर्व प्रदेशांस एकच नांव असणें लोकांस फारसें सोईचें वाटलें नव्हतें. कारण, उत्तर भाग व दक्षिण भाग ह्यांत महदंतर आहे. संस्कृत बोलणारे व ब्राह्मणी धर्म स्थापन करणारे आर्य लोक जेव्हां हिंदुस्थानांत आले, तेव्हां प्रथम पंजाबांत व नंतर गंगथडीकडे ते पसरले. प्रथमतः दक्षिणेंत त्यांचा बिलकुल प्रवेश नव्हता. ह्मणून हिंदुस्थान हें नांव विशेषेंकरून उत्तरप्रदेशास लावलें जात आहे. दक्षिणेंतील द्वीपकल्पाच्या भागांत जरी अशा ब्राह्मणी धर्माचा पसार झाला आहे, तरी तेथें अनार्य लोक राहत असून अनार्य भाषाही चालू आहेत. मोंगलांचें राज्य अतिशय भरभराटींत होतें, त्या वेळेसही तें ह्या दक्षिणेंत फारसें पसरलें नव्हतें.

ह्यावरून हिंदुस्थान हें नांव राजकीय संस्थेच्या संबंधानें दिलेलें नसून, युरोप अगर आफ्रिका ह्याप्रमाणें भूगोलसंबंधींचेंच केवळ आहे. एकजातीय लोकांनीं वसलेला व एक भाषा चालू असलेला प्रदेश असा या नांवाचा अर्थ होत नाहीं, तर अनेकजातीय लोकांनीं वसलेला व अनेक भाषा चालू असलेला विशिष्ट मर्यादान्तर्गत प्रदेश असा ह्याचा अर्थ आहे. हाच इटली वगैरे देश आणि हिंदुस्थान ह्यांजमधील विशिष्ट फरक होय. इटलीसारख्या देशांत राष्ट्रीयत्वाचें तत्व कायम आहे. हिंदुस्थान व इटली ह्या दोनही देशांत निरनिराळीं स्वतंत्र राज्यें असत, ह्मणून परकीयांस त्यांजवर हल्ला करण्यास सुलभ पडे. परंतु राज्यव्यवस्थेचे संबंधानें इटली देश जरी असा विभक्त होता, तरी राष्ट्रीयत्वानें विभक्त नसून तो एकच होता. सर्व देशभर एकच भाषा चालू असे. या भाषेमध्यें अनेक उपयुक्त ग्रंथ झाले असून, त्यांजवर सर्व देशाची सारखी मालकी असे. परंतु ज्याप्रमाणें युरोपांत एकभाषात्व असणें अशक्य, तद्वतच तें हिंदुस्थानांतही अशक्य आहे.

परंतु एकराष्ट्रीयत्वाचीं भाषेशिवाय आणखीही अंगें आहेत. सर्व लोकांचें हित एकाच प्रकारच्या व्यवहारांत असणें व सर्वांनीं मिळून एकमतानें आपली राज्यव्यवस्था चालविणें, हें त्याचें दुसरें अंग होय. या अंगाचा जरी संपूर्ण अभाव हिंदुस्थानांत नसला, तरी तें फारच कमी आहे. हें अंग पूर्णपणें वसण्यास हा देश फारच मोठा दिसतो. इतकें असूनही पुष्कळ दिवसांपासून हिंदुस्थान हें नांव कमी जास्त अर्थानें एकाच प्रदेशाचें वाचक होत आलें आहे. याचें कारण हिंदुस्थानच्या मर्यादाच सृष्टिरचनेनें फार भक्कम ठरवून दिलेल्या आहेत. एकीकडे समुद्र व दुसरीकडे प्रचंड पर्वत, मिळून ह्या मर्यादा अनुल्लंघनीय झाल्या आहेत. तशा दुसऱ्या मर्यादा हिंदुस्थानचे पोटांत नाहींत. गिझनीच्या महंमदाचे पूर्वींचा जो थोडाबहुत दंतकथायुक्त हिंदुस्थानचा इतिहास उपलब्ध आहे, त्यांतसुद्धां प्रत्येक राजा सर्व हिंदुस्थानचा मालक होता, असें लिहिलेलें आढळतें. मुसलमानी अंमलाच्या आरंभीं जे राजे हिंदुस्थानांत राज्य करीत होते, त्यांचीं व पुढें मोंगलाई राजांचीं राज्यें बहुतेक सर्व हिंदुस्थानभर होतीं, असें लिहिलेलें आहे. तथापि ज्याप्रमाणें रोमन लोकांचें राष्ट्र सर्व युरोपभर पसरलें होतें, त्याच-प्रमाणें मोंगल लोकांचें राज्यही सर्व हिंदुस्थानभर अफाट झालें होतें, असें समजणें अतिशयोक्ति होय. मोंगल लोकांचें राज्य किती क्षणिक होतें पहा. इ. स. १५२४ हाच त्या राज्याचा मूळ आरंभ होय. ह्या वर्षी बाबर यानें लाहोर शहर हस्तगत केलें. ह्मणजे ही गोष्ट इंग्लंडांत आठवा हेन्री राजा राज्य करीत असतां झाली. वास्कोडिगामा हिंदुस्थानांत आला त्या वेळीं मोंगलाई राज्यास नुकता प्रारंभ झाला होता. इ. स. १७०७ या वर्षी ह्मणजे आन राणीच्या कारकीर्दीत त्या राज्यास स्पष्टपणें उतरती कळा लागली होती. वर सांगितलेल्या दोन सनांमधील अंतर दोन

शतकापेक्षां कमीच आहे. तरीही बाबर हिंदुस्थानांत आल्यापासून मोंगलाई राज्य सुरू झालें, असें ह्मणतां येत नाहीं. वास्तविक ह्या राज्याचा प्रारंभ तें राज्य वृद्धि पावलें, तेव्हां झाला. इ. स. १५५९ त अकबर बादशहा राज्यावर बसला, त्या वेळीं ह्मणजे एलिझाबेथ राणीच्या कारकीर्दीच्या आरंभीं मोंगलाई राज्यामध्यें फक्त पंजाब व दिल्ली आणि आग्रा ह्या समोंवतालचे प्रदेश इतकेच मोडत होते. अकबर यानें बंगाल प्रांत १५७६ या वर्षीं जिंकून घेतला. सिंध आणि गुजराथ हे प्रांत सन १५९४ ह्या सालच्या दरम्यान त्यानें जिंकून घेतले. तेव्हां मात्र मोंगलाई राज्य बरेंच वाढलें, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. परंतु मोंगलाई राज्याच्या आरंभाचें वर्ष १५२४ न धरितां १५९४ हें धरिलें ह्मणजे तें राज्य फक्त एक शतकाहून थोडेंसें जास्त टिकलें इतकेंच काय तें ह्मणतां येईल.

परंतु ह्या वेळींही सर्व हिंदुस्थान देश ह्या राज्यांत मोडत नव्हता. १५९९ पर्यंत अकबरच्या राज्याची दक्षिण सीमा नर्मदा नदी होती. ह्या वेळेपर्यंत अकबरानें दक्षिणेंत पाऊल ठेविलें नव्हतें. हिंदुस्थान ह्या शब्दाचा विशिष्ट अर्थ उत्तर व मध्य भाग इतकाच होय. एवढ्याच भागाचा अकबर बादशहा होता, असें ह्मणतां येईल. त्यानें आपल्या कारकीर्दीच्या अखेरीस दक्षिणेंत स्वारी केली; त्या वेळेपासून मोंगलांचा दक्षिणहिंदुस्थानांत प्रथम प्रवेश झाला. परंतु इ. स. १६८३ या वर्षी अवरंगजेब बादशहानें दक्षिणेवर मोठी स्वारी केली; त्या वर्षापर्यंत दक्षिण देश मोंगलांनीं जिंकला होता, असें मुळींच ह्मणतां येत नाहीं. त्या वेळेपासून मात्र मोंगलांचा अंमल दक्षिणेंतही सुरू झाला, असें पाहिजे तर ह्मणावें; कारण, ह्याच वेळेस सर्व हिंदुस्थान मोंगलांच्या ताब्यांत आलें, हें ह्मणणें रास्त होईल. तथापि दक्षिण देश केवळ नांवानें मात्र मोंगलांच्या ताब्यांत होता. कारण मराठ्यांची सत्ता त्या वेळीं फार वृद्धिंगत होत

चालली होती, हें ध्यानांत घेतलें ह्मणजे मोंगलांची सत्ता सर्व हिंदुस्थानभर केवळ क्षणिक होती, असेंच ह्मणावें लागतें. कारण मोंगलांनीं आपलें राज्य वाढविण्याची जी अतोनात इच्छा धरली, त्यामुळें त्यांच्या राष्ट्राचा मात्र समूळ नाश झाला. सुमारें २४ वर्षांच्या आंतच ऱ्हास होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. आमच्या मतें असें होण्याचें कारण, वरील अवरंगजेबानें राष्ट्रविस्ताराकरितां केलेली दक्षिणेंतील स्वारी होय. ह्या राज्याला आधारस्तंभ आरंभापासून नव्हते, व तें अवाढव्य वाढविण्याचे जे मूर्खपणाचे यत्न त्या वेळीं करण्यांत आले, त्यांजमुळें त्या राष्ट्राचे शक्तीस मोठीच हानि झाली.

ह्या सर्व गोष्टींचा निष्कर्ष इतकाच निघतो कीं, सर्व हिंदुस्थानभर एकचक्री सार्वभौम अंमल इंग्रज लोकांचे पूर्वीं कधींही नव्हता. इंग्रज लोकांचेंही एकचक्री राज्य लॉर्ड डलहौसीचे कारकीर्दीच्या पूर्वीं सर्व हिंदुस्थानभर होतें, असें ह्मणतां येत नाहीं. सुमारें ३०।४० वर्षांपूर्वीं नागपूर, औंध, आणि पंजाब हे प्रांत ब्रिटिश राज्यास जोडले गेल्यामुळें त्यास सार्वभौमत्व प्राप्त झालें.

राष्ट्रीयत्वाचें दुसरें अंग धर्मैक्यता. या अंगाचा मात्र पूर्ण अभाव हिंदुस्थानांत आहे, असें ह्मणतां येत नाहीं. सर्व हिंदुस्थानभर ब्राह्मण धर्म चालू आहे. आतां हा एकच धर्म हिंदुस्थानांत आहे असें मात्र ह्मणतां येत नाहीं. मुसलमानांची लोकसंख्या पांच कोटींची आहे, ह्मणजे युरोपांतील तुर्कस्थानचे लोकसंख्येपेक्षां फारच जास्त आहे. शीख ह्मणून दुसरे एक लोक आहेत, त्यांचा धर्म मुसलमानी व ब्राह्मणी या दोहोंचा मिलाफ होऊन उत्पन्न झालेला आहे. ख्रिस्ती लोकांचीही थोडीशी वस्ती हिंदुस्थानांत असून, सीलोन व नेपाळ येथें बौद्ध धर्म सुरू आहे. तथापि ब्राह्मणधर्म मात्र बहुतेक लोकांत कायम असून तो इतका भक्कम आहे कीं,

कित्येक वेळां प्रचंड उच्छेद झाला असतांही तो टिकाव धरून राहिला आहे. नवीन धर्मस्थापनेनें पुष्कळ लोकांस त्यांच्या मूळ धर्मापासून भ्रष्ट करून आपल्याकडे ओढून घेतलें, असा एक बौद्ध धर्म होय. तो मूळ हिंदुस्थानांतच उत्पन्न झाला व चारही दिशांकडे अफाट पसरला. ख्रिस्ती शतकापूर्वी दोनशें वर्षांच्या वेळेस तो धर्म हिंदुस्थानांत जारीनें सुरू होता. त्याचप्रमाणें ख्रिस्ती शतकानंतर सातव्या शतकांतही तो तितक्याच जारीनें चालू होता, अशाबद्दल पुरावा आहे. तथापि त्याजवर ब्राह्मणधर्माचा पगडा चालून तो एशिया खंडांतील बहुतेक देशांत जरी हल्लीं हयात आहे, तरी ज्या हिंदुस्थान देशांत तो उत्पन्न जाहला, त्या ठिकाणीं मात्र त्याची फारशी प्रवृत्ति नाहीं. बौद्ध धर्मरूपी एका शत्रूचा पाडाव करून त्याजवर जय मिळविल्यानंतर ब्राह्मण धर्माला दुसरा एक बलाढ्य शत्रु उत्पन्न जाहला. ब्राह्मण धर्माबरोबर सामन्यासाठीं येण्याचे पूर्वीं त्या शत्रूनें पारशी धर्माचा पराभव करून ख्रिस्ती धर्मासही एशिया खंडांतून कांहीं पावलें मागें हटविलें होतें. तो शत्रु ह्मणजे महंमदी धर्म होय. तो हिंदुस्थानांत शिरून तेथें आश्रय मिळवून राहिला. मुसलमानी राज्यस्थापना हिंदुस्थानांत झाल्यामुळें ह्या धर्मास पाठबळ आलें. तरी पण हिंदुस्थानांतील फारसे लोक स्वधर्म टाकून मुसलमानी धर्मास जाऊन मिळाले नाहींत.

राष्ट्रीयत्वाचीं जीं अनेक अंगें आहेत, त्यांजमध्यें धर्म हें फार भक्कम व महत्वाचें अंग आहे. हें अंग हिंदुस्थानांत कायम आहे. हिंदुस्थानाची तुलना फ्रान्स व इंग्लंड या देशांशीं न करितां युरोपाशीं आपण करतों, त्या वेळेस आपण असें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, ख्रिस्ती धर्माच्या योगानें सर्व युरोपाला एक प्रकारचें ऐक्य प्राप्त झालें आहे, व सर्व युरोपाला जर एकदम एखादें संकट प्राप्त होईल, तर हें

ऐक्य एकदम स्पष्ट दिसूं लागेल. मध्ययुगांत असें कित्येक वेळां झालेंही होतें. ज्या वेळेस रानटी परधर्मी लोकांनीं युरोपावर स्वाऱ्या केल्या, त्या वेळेस त्यांजबरोबर लढण्यास युरोपांतील सर्व लोक तयार झाले. तद्वतच ब्राह्मण धर्म हें एक हिंदुस्थानांतील एकीचें बीज असून त्याजपासून मागें पुढें राष्ट्रीयत्व उत्पन्न होण्याचा संभव आहे, व कदाचित् असें होईल ही. तथापि अशा प्रकारें एकी घडून येणारी असती, तर ती आजपर्यंत थोडीशी तरी घडून आली नाहीं हा एक प्रश्नच आहे. परकीय शत्रु येतो, त्या वेळेसच धर्मरूपी बीजापासून हें राष्ट्रीयत्व उत्पन्न होतें. आज कित्येक शतकेंपर्यंत मुसलमान लोकांनीं शेंकडों स्वाऱ्या हिंदुस्थानावर केल्या असतांही वरील नियमास अनुसरून राष्ट्रीयत्व उत्पन्न झालें नाहीं. शत्रूशीं सामना करण्याकरितां सर्व हिंदु लोकांचीं अंतःकरणें एकवट करून त्यांच्या ठायीं स्वाभिमानाची स्फूर्ति उत्पन्न न करितां केवळ स्वसंरक्षण करूनच हा ब्राह्मण धर्म स्वस्थ बसला आहे, ह्याचें कारण काय असेल तें असो. कदाचित् तो स्वस्थ बसला नसावा. ब्राह्मण धर्मी राजे पुढें आले नाहींत, असें नाहीं. सतराव्या शतकाच्या मध्यभागीं शिवाजी नांवाचा कोणी एक सरदार प्रसिद्धीस आला. त्यानें मुंबईनजीक घांटावरील एक दोन डोंगरी किल्ले हस्तगत करून मराठ्यांची गादी स्थापन केली. हीच केवळ असंकीर्ण स्वदेशी राज्याची स्थापना होय. त्याची सत्ता जसजशी वाढत गेली, तसतशी ती ब्राह्मण जातीच्याच मंडळीच्या हातांत जास्त राहूं लागली. मोंगलाई राज्याचा ऱ्हास, हेंही सत्ता प्रबळ होण्याचें कारण होय. असें होतां होतां अठराव्या शतकाचे मध्याचे सुमारास मराठी सत्तेच्या शाखा बहुतेक सर्व हिंदुस्थानभर पसरल्या. ह्या सत्तेमध्यें हिंदु राष्ट्रीयत्व कायम असून इतर धर्मांनीं आपापल्या राष्ट्रांस जें पुष्टीकरण आणून दिलें आहे, तेंच ब्राह्मण धर्मानें हिंदु लोकांस त्या वेळीं आणून दिलें, असें कित्येकांस वाटेल; परंतु तशा

प्रकारचें कांहीं घडून आलें नाहीं. ब्राह्मणी धर्मानें तद्धर्मी लोकांच्या मनांत स्वराष्ट्राभिमान उत्पन्न केला नाहीं. खरोखरी पाहतां ब्राह्मणी धर्म हा निराळा धर्म नसून केवळ कित्येक धर्मांचीं तत्वें एक ठिकाणीं करून बनलेलें एक मिश्रण असावें. त्याजमुळें त्या धर्माचा तिखटपणा जाऊन सुलभतेनें सर्वत्रांचा आपल्यांत समावेश करण्याची त्याची शक्ति वाढली; ह्मणून स्वानुयायी लोकांचें एकीकरण करण्याची त्याची शक्ति कमी झाली असावी. कसेंही असलें तरी ही गोष्ट निर्विवाद आहे कीं, मराठ्यांच्या सत्तेमध्यें स्वाभिमानाचें अत्युच्च तत्व कधींही नव्हतें. अव्वलपासून अखेरपर्यंत मराठ्यांची सत्ता ह्मणजे लुटारूपणावर स्थापन झालेली एक संस्था होती.

ज्या बीजांपासून सर्व हिंदुस्थानभर राष्ट्रीयत्व उत्पन्न होईल, अशीं कांहीं बीजें जरी हिंदुस्थानांत जागृत आहेत, तरी राष्ट्रीयत्व अद्यापि उत्पन्न झालें नाहीं. हिंदुस्थानामध्यें इंग्रजांचा अंमल स्थापन होण्यास ह्या राष्ट्रीयत्वाचा अभाव हेंच मुख्य कारण असून, इंग्लिश लोकांच्या अंगीं कांहीं जास्त कुशलता होती, हें नव्हे. इटलीमध्यें हें राष्ट्रीयत्व उत्पन्न करण्यासाठीं जशी चळवळ सुरू होती, तशीच हिंदुस्थानामध्यें चळवळ सुरू होईल, तर आस्ट्रियन लोकांनीं इटालियन लोकांशीं जितका टिकाव धरला, तितकासुद्धां इंग्रजांच्यानें हिंदुस्थानांत धरवणार नाहीं; तर त्यांचा एकदम नाश होईल. कारण, पंचवीस कोटी लोकसंख्या जर एकदम इंग्रज लोकांवर उठली, तर त्यांचें बंड मोडण्यापुरती अशी कोणती शक्ति इंग्रज लोकांमध्यें आहे? तशांत इंग्रज लोक ह्या ईच्या कामांत फार कुशल आहेत असेंही नाहीं. ज्याप्रमा हिंदु लोक जिकले गेले, तसेंच राष्ट्रीयत्व उत्पन्न जाहल्यावर कले जातील, अशा ह्मणण्यांत अर्थ नाहीं. कारण, इंग्रजांनीं

कांस एकवारही जिंकलें नाहीं, हें वर दाखविलें आहे. तेथें असें सांगण्यांत आलें आहे कीं, ज्या सैन्यानें हिंदुस्थान जिंकिलें, त्यापैकीं ⅘ हिंदु लोक होते; अशा प्रकारें एवढें मोठें काळे लोकांनें सैन्य इंग्रज लोकांस पैसे देऊन मिळालें, ह्याचें कारण तरी ह्या राष्ट्रीयत्वाचा अभाव हेंच होय. जर कां एकदां अंशतः तरी हें तत्व हिंदु लोकांच्या मनांत बिंबू लागलें, तर परकीय लोकांना आपल्या देशांतून हांकून देण्याइतकी तर इच्छा नकोच; पण केवळ परकीयांनीं ह्या देशावर आपला अंमल बजाविण्यांत त्यांस आपण मदत देऊं नये, इतकें जरी केवळ त्यांच्या मनांत आलें, तरी त्या दिवसापासून इंग्लिश अंमलाचा लय झाला, असें समजा. कारण, हल्लीं ह्या राज्याच्या संरक्षणार्थ ठेविलेल्या सैन्यापैकीं ⅔ लोक काळे आहेत. ऑस्ट्रियाच्या सरकारानें इटली देश राखण्यासाठीं आपल्या सैन्यांत इटालियन लोकच नोकर ठेविले असते, तर इटालियन लोकांना आपल्या शत्रूस स्वदेशांतून हांकून लावणें किती सोपें झालें असतें, त्याचा वाचकांनींच विचार करावा. काळे लोकांचे सैन्यानें बंड करणें तर लांबच; परंतु इंग्रजांची नोकरी ते पतकरीनातसे झाले, इतकीच कल्पना वाचकांनीं करावी, ह्मणजे एक क्षणभरही हिंदुस्थान इंग्रजांच्या ताब्यांत राहणें अशक्य आहे, हें व्यक्त होईल. कारण, हिंदुस्थानांतील इंग्रजी अंमलाची अशी कांहीं चमत्कारिक खुबी आहे कीं, तो चालू ठेवण्यास आयास पडत नाहींत. ज्याप्रमाणें हिंदुस्थानचें राज्य विशेष श्रम न पडतां इंग्रजांच्या हातीं आलें, त्याचप्रमाणें तें राखलें जाईल. मिळविलेल्या देशाचें रक्षण करण्याकरितां कोट्यावधि लोकांशीं टक्कर देण्यास इंग्लंडाहून कोट्यावधि इंग्लिश सैन्य आणण्याचें इंग्रजाचें सामर्थ्य नाहीं.

वर कल्पना केल्याप्रमाणें जर का हिंदुस्थानाची स्थिति खरो-

खरी तशी झाली, तर तत्क्षणींच हिंदुस्थान देश इंग्रजांच्या ताब्यांतून गेला, असें समजलें पाहिजे. ह्याप्रमाणें सूक्ष्म अवलोकनानें प्रत्येक गोष्ट तपासून पाहिल्यावर हें एवढें अवाढव्य राष्ट्र थोडक्या वेळांत परकीयांच्या हातांत आलें, ह्याजबद्दल जो कांहीं अचंबा व आश्चर्य वाटत होतें, तें सर्व लयास जाईल. जरी इंग्रज लोक हिंदुस्थानावर अंमल करीत आहेत, तरी पराक्रमाधिक्यानें हिंदुस्थान देश त्यांनीं जिंकून घेतला आहे, असें नाहीं. हिंदुस्थानावर इंग्रजांनीं अंमल करण्यास हिंदु लोकांची खुषी नाहीं, ह्यावरून त्यांची त्या गोष्टीस नाखुषी आहे, असें पाक्षिकपणानें युरोपियन लोकांनीं गृहीत घेणें चुकीचें आहे. हें समजलें ह्मणजे सर्व अद्भुतता एकदम नाहींशी होते. कोणतें एकादें राष्ट्र स्वतंत्रताप्रिय आहे, असें ह्मणणें ह्मणजे राजकीय व्यवहार चांगले रीतीनें त्यांस समजतात, असा अर्थ होतो. परंतु स्वतंत्रतेची रुचि जोंपर्यंत लोकांस नाहीं, तोंपर्यंत परकीय अंमलाविषयीं ते अगदीं बेपर्वा राहतील. अशा प्रकारचा परकीय अंमल फार दिवस चालण्यास कांहीं हरकत नसून त्यामध्यें ह्मणजे कांहीं असाधारण चातुर्य आहे असें नाहीं. जो देश अनेक वेळां अनेक राष्ट्रांकडून जिंकला गेला आहे, त्या देशांतील लोकांस परकीय अंमलाविषयीं पर्वा न करण्याची संवय लागून जाते. अतिशय जुलमी राजेसुद्धां कित्येक शतकेंपर्यंत परदेशावर राज्य करूं शकले होते, ह्याचें कारण, लोकांनीं बंड केलें असतां तें मोडून टाकण्याचें सामर्थ्य त्यांचे अंगीं होतें, असें नसून, केवळ त्या लोकांना बंड करण्याची संवय नव्हती व ते नेहमीं परकीयांच्या हुकुमांत वागणारे होते, हें होय. रशियांतील झार राजांचा सोळाव्या शतकाचा इतिहास वाचून पहा. आयव्हान् धि टेरिबल्* ह्मणून जो क्रूर राजा झाला, तो

* चवथा आयव्हान् हा सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धांत सुमारें पंनास वर्षे-

मर्जीस वाटेल त्याप्रमाणें वागत असतांही लोक त्याचा क्रूरपणा निमुटपणें कां बरें सहन करीत होते? ह्याचें उत्तर अगदीं उघड आहे कीं, पूर्वी दोन वर्षेंपर्यंत रशियन लोकांची तातीर लोकांकडून अगदीं पायमल्ली होऊन गेली होती व तितक्या वेळामध्यें पाहिजे तो हुकुम निमुटपणें सोसून घेण्याची त्या लोकांस संवय पडून गेली होती. अशा प्रकारचीं हिंदुस्थानांतील लोकांचीं मनें असणें, हें अगदीं साहजिकच नाहीं काय? हिंदुस्थानच्या इतिहासांत अगर पुराणांत त्या देशाच्या कोणत्याही भागांत लोकांना स्वतंत्रता होती, अगर लोकांनीं स्थापना केलेल्या संस्था होत्या, असा मुळींच पुरावा मिळत नाहीं. इटलीमध्यें चौदाव्या शतकांत बडे लोकांकडून जेव्हां प्रजेवर फार जुलूम होऊं लागला, तेव्हां रीन्झी* ह्मणून प्रसिद्ध गृहस्थ लोकांना व्याख्यानें वगैरे देऊन त्यांचीं मनें बडे लोकांविरुद्ध क्षुब्ध करूं लागला. परंतु रोमन लोकांचे पूर्वी प्रजासत्ताक राज्य होतें, त्याबद्दल सर्वत्रांस अभिमान वाटत असे. लिव्हीसारख्या† स्वदेशाभिमानी इतिहासकारांचे ग्रंथ हयात होते, तेच ग्रंथ लोकांस वाचून दाखवून रिन्झी यास नवीन राज्य स्थापन करण्याची युक्ति करितां आली.

अशा प्रकारें लोकांच्या मनांत उत्साहबुद्धि उत्पन्न करण्याविषयीं हिंदुस्थानामध्यें कोणाही स्वराष्ट्रभिमानी पुरुषाचे ग्रंथ उपलब्ध नाहींत.

पर्यंत रशियाचा राजा होता. हा फार क्रूर असल्यामुळें 'भयंकर' हें टोपण नांव त्यास मिळालें आहे. हा पहिला झार होय. झार हें नांव सीझर ह्या नांवापासून रशियन भाषेंत घेतलेलें आहे. रशियांतील निरनिराळे प्रांत काबीज करून सर्व देशभर एकचक्री अमल प्रथमतः ह्यानेंच सुरू केला.

* रीन्झी—हा सेनेट सभेचा सभासद होता. त्याचीं सर्व कृत्यें इ. स. १३४२ पासून १३५५ पर्यंत घडलीं आहेत. पुढें हा लोकांस अप्रिय होऊन मारला गेला.

† लिव्ही—(ख्रिस्ती शकाचे पूर्वी ५९ पासून ख्रिस्ती शके १७ पर्यंत.) हा रोमचा फार मोठा इतिहासकार होता.

कोणीही प्रमुख गृहस्थ गांवगन्ना फिरून लोकांस उत्तेजन देण्याविषयीं पुढें आला नाहीं. इंग्रज लोक हिंदुस्थानांत येण्यापूर्वी हिंदु लोकांवर जुलमी राजे राज्य करीत होते, इतकेंच नाहीं, तर परकीय जुलमी राजे अमल करीत होते. सरकार हें लोकांच्या उपयोगाकरितां असून, तें लोकांवर अवलंबून आहे; सरकारच्या कृत्यांवर बरी वाईट टीका लोकांनीं करावी; जरूरीप्रमाणें चालू असलेल्या सरकारचा पाडाव करावा किंवा निदान त्याच्या विरुद्ध बंड तरी करावें; अशा प्रकारचे विचार हिंदुस्थाना-सारख्या भव्य देशामध्यें जर सुदैवेंकरून उत्पन्न झाले असते, तर हिंदु-स्थानची स्थिति खरोखरच फार चमत्कारिक झाली असती. राष्ट्राचे सांधे जणूं काय फार दृढ बसविलेले असतात; त्यांना अपरिचित असें नवीन चलन करणें त्याजकडून सहज घडत नाहीं. वाडवडिलांनीं जें केलें तेंच सर्व लोक करीत जातात, व असें करीत असतांही ते आपल्यास फार कल्पक व नवीन गोष्टी करणारे असे समजतात. फ्रान्स देशामध्यें जी राज्यक्रान्ति झाली तिचा इतिहास फ्रान्स देशांतील पूर्वीच्या कित्येक गोष्टींशीं विलक्षण रीतीनें जमतो, असें दाखविण्यांत आलेलें आहे. इटली देशांत राष्ट्रीयत्व उत्पन्न होऊन जें लोकांनीं बंड उभारलें, तशा प्रकारचें बंड इटालियन लोकांनीं पूर्वी एकदां डान्टी* कवि होऊन गेल्यानंतर खरो-खरीच उभारलेलें होतें. ह्या नियमास अनुसरूनच हिंदुस्थानांतील लोक निमुटपणें पाहिजे त्या राजाच्या अमलाखालीं वागतात. मग तें राज्य इंग्रज लोकांप्रमाणें परकीय असो वा नसो, तसेंच तें निर्दयपणें जुलमानें चालविलेलें असो वा नसो. तशांत इंग्रज सरकारचा अमल अशा प्रकारचा जुलुमी व निर्दयी नाहीं.

इंग्रजांनीं हिंदुस्थानावर राज्य करणें ही गोष्ट दोन रीतींनीं लोकांस चमत्कारिक वाटली असती. एक जर हिंदु लोकांस स्वकीय अमलाखालीं

---

* टीप.—* पान ९ पहा.